
# भारतदीप



REFBK-0011953

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. 1 ५२५

ज. म. गोखले बी. ए.

तेजल प्रकाशन, पुणे

REFBK-0011953

REFBK-0011953

।। श्रीसमर्थ प्रसन्न ।।

# भारत-दीप



सहकार्यानें जीवन फुलवूं आर्यसंस्कृतींत ।
करूं प्रार्थना अखंड लक्ष्मी वसो भारतांत ।।

॥ श्रीसमर्थ प्रसन्न ॥

आत्मोन्नति व राष्ट्रोन्नति यांचीं आधुनिक तत्त्वें विशद करणारा धार्मिक पार्श्वभूमीवरील ओवीबद्ध ग्रंथ

# भारत-दीप


लेखक : ज. म. गोखले, बी. ए., ( चित्रकार )

आशीर्वाद : गुरुवर्य महामहोपाध्याय द. वा. पोतदार, बी. ए.

प्रस्तावना : डॉ. मो. ना. नातू; बी. एस्सी., एम्. बी. बी. एस्.



दीपावलि शके १८८२

रुपये 2.50

प्रकाशिका : सौ. इंदिराबाई महाजन,
तेजल प्रकाशन,
६८९/७, सदाशिव, नातूबाग, पुणें २.

[ सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन ]

मुद्रक : ना. के. महाजन,
नवहिंद मुद्रणालय,
८२५, सदाशिव, पुणें २.

आचार्यदेवो भव ।

गुरुवर्य महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार
यांचा 'भारत-दीप' ग्रंथास

# आशीर्वाद

माझे एका काळचे विद्यार्थी श्री. ज. म. गोखले यांनीं लिहिलेला 'भारत-दीप' नांवाचा ११ अध्यायांचा ओवीबद्ध ग्रंथ त्यांनीं मजकडे अभिप्रायार्थ पाठविला. सांप्रत हा ग्रंथ हस्तलिखितच आहे. मुद्रणसंस्कार होण्यापूर्वीं चार जाणत्यांच्या दृष्टीखालून जावा ही लेखकाची इच्छा असली तर ती स्वाभाविकच होय ! त्यांतून लेखक आज अनेक वर्षें रुग्णावस्थेंत पडून आहेत. अशा स्थितींत परमेश्वरावर दृढ श्रद्धा ठेवून हें लेखन त्यांनीं केलें आहे हें त्यांस खरोखरच अत्यंत श्रेयस्कर होय यांत शंकाच नाहीं.

या ग्रंथांतील पुष्कळसा भाग मीं कांहीं अधून मधून आणि कांहीं अध्याय संपूर्ण वाचले त्यावरून, तरुण पिढीला कळकळीनें आपलें उपदेशपर ऐकवावें आणि त्यांना मार्गदर्शन करावें अशी लेखकाची तळमळ स्पष्ट होते.

ग्रंथांत जीवनविषयक सर्व महत्त्वाच्या समस्यांचा लेखकानें आपल्या दृष्टिकोनांतून उलगडा करण्याचा प्रयत्न केला आहे. शिक्षण, शील, विवाह, परमेश्वरपूजन, वानप्रस्थाश्रम, समाजसेवा, कुटुंबपोषण वगैरे विषयांवर विवेचन या ग्रंथांत सर्व छान केलें आहे. तें सर्व वाचनालायक व मननीय आहे.

येवढ्या सर्व विषयांवर सर्वांचें एकमतच होईल ही अपेक्षा आजच्या मतप्रधान युगांत कोणी करणार नाहीं. लेखकाचा कल प्राचीन सांस्कृतिक मूल्यांकडे झुकणारा आणि त्यांविषयीं आत्मीयता

प्रकट करणारा आहे. तथापि, कालोचित नवविचार व आचार यांचाहि आदर त्यानें समावेशपूर्वक केलेला आहे.

सर्वत्र शिक्षण, शिस्त, पावित्र्य, मांगल्य, श्रद्धा यांचें
पोषण व्हावें अशी लेखकाची बीजभावना त्यानें गृहित
केली आहे. त्याबरोबरच दंभ, लुच्चाई, ढोंग यांवर त्यानें
कोरडे ओढले आहेत. त्यांचा स्पर्श न व्हावा म्हणून
जागृत व दक्ष कसें राहावें याचें दिग्दर्शन केलें आहे.

आज विचारांचें युग आहे; परंतु तो सद्विचार असावा. नवीन सुधारणांच्या आभासिक प्रकाशानें तात्काल मोहित होऊन भलत्या मार्गाचा अवलंब घाईनें करूं नये; असा धोक्याचा कंदीलहि ग्रंथकारानें पेटविला आहे.

एकंदरीनें पाहतां हा ग्रंथ आणि त्यांतील विचार सर्वांस माननीय वाटतील आणि त्यांतील पुष्कळ अनुकरणीय आहेत असें मला वाटतें. हा ग्रंथ वाचल्यानें पुष्कळांची वृत्ति स्थिरावेल, चळणार नाहीं; विचारपूर्वक वागण्याची सवय वाढीस लागेल असेंहि मला वाटतें. मग लेखकाचीं सर्वच मतें न पटलीं तरी चिंता नाहीं. ज्यानें त्यानें आपलें मत बनवून सत्यास जागावें आणि आंतरात्म्यास साक्षी ठेवून वागावें. एवढें झालें तरी पुष्कळ साधलें असें म्हणतां येईल.

ओवीरचना सुबोध आणि धावती आहे; क्लिष्ट नाहीं. भक्ति,
श्रद्धा, कळकळ यांचेमुळें वाचकाच्या मनाचें वातावरण
प्रसन्न राहील; संयम आणि विचार यांना पोषण मिळेल.

हा ग्रंथ सर्व समाजकल्याणेच्छूंनीं एकवार मन:पूर्वक वाचावा असा साधला आहे असें मला निश्चितपणें वाटतें.

'लोककल्याण'
शनवार पेठ, पुणें २.

—दत्तो वामन पोतदार

# विषयानुक्रमणिका

[ आंकडे पृष्ठांक दर्शविणारे आहेत ]

## अध्याय १–विषयप्रवेश

ओवीसंख्या–६०


श्रीमंगलमूर्तिवंदन १७
लेखनस्थान १७
ग्रंथविषय १८
रामजन्मोत्सवदृष्टान्त १९
आचार्यदर्शन १९
आश्रम-प्रवचन २०
राष्ट्रोदयआश्रम-परिचय २०
'भारत-दीप' ग्रंथनाम-विवेचन २१


## अध्याय २–मानव-देहरक्षण

ओवीसंख्या–१५६


मानवदेह-अपूर्वता २३
अन्नमयः पुरुषः २३
जीवनसत्त्वरक्षण २४
नाना धान्य-फल-पुष्प-परिचय २४
निःसत्त्वशर्करा २४
सत्त्वयुक्त गूळ २४
दुग्धपान २५
जलपान २५
जीवनसत्त्वयुक्त पदार्थ २५
राजस-तामस-सात्त्विक आहार २५
शाकाहारव्रतइष्टता २६
आरोग्यप्राप्ति २६
तेजबलरक्षण २६
व्यसनें २७-२८
दुष्कर्माचरण २७
मदिरापान २८
चहा-कॉफी २९
अनिष्ट मांसाहार २९
अफू-भांग-गांजा-तंबाखू इ.विषें २८-३०-३१-३२
अतिरेकी आहार ३२
अल्प आहार सुयोग्यता ३३

## अध्याय ३–दुष्काळ-निवारण

ओवीसंख्या–१०२


राष्ट्रोन्नति-संदेश ३४-३५
महात्मा-संदेश ३५
दुष्काळ-इतिहास ३६
सरकारी उपाययोजना ३७
शेतीविकास ३७-३८
प्रजाकर्तव्य ३८-३९
नियंत्रित मिताहार ३८
दीनसेवा ३९
परराष्ट्रीय शेती-उत्पादन ३९
उपोषण-माहात्म्य ४०
धान्यनियंत्रण ४०
कुटुंबनियोजन ४१


## अध्याय ४–आर्यसंस्कृतिमहिमा

ओवीसंख्या–१६७


ॐकाररूपी सूर्यनारायण ४३-४४
ग्रहमालिका ४४
पृथ्वीचा जन्म ४४
सजीवता-लक्षण ४४
पौराणिक काल-दशावतारी जीवनविकास ४४
पाश्चात्य संशोधन ४५
पाषाणयुग ४५
सिंधुतटाकीं आर्यांचें आगमन ४५
आर्य शब्दोत्पत्ति ४५
आर्यसंस्कृति ४५
गंगातीर ४६
वेदनिर्मिति ४६
'भारत' शब्दोत्पत्ति ४६
महाभारत-रामायण-भगवद्गीतामहती ४७-४८
चार आश्रम-विभागणी ४८
चार वर्ण ४८
समाज-विभाजन ४८
हिंसकवृत्ति भ्रष्टता ४९
गौतमबुद्ध ४९
बौद्ध धर्म ४९
महावीर ४९
जैनधर्म ४९
सम्राट् अशोक ४९
कुमारिल भट्ट ५०

| | | | |
|---|---|---|---|
| शंकराचार्य | ५० | आंग्ल-सत्ता | ५३ |
| हिंदुधर्म पुनरुज्जीवन | ५०-५१ | भारताची दुर्दशा | ५३ |
| समुद्रगुप्त | ५१ | भारतीय क्रांति | ५४ |
| चंद्रगुप्त | ५१ | क्रांतीचे जनक | ५४ |
| सुवर्णयुग | ५१ | देशभक्त | ५४ |
| यवनराज्यस्थापना | ५२ | महात्माजींचा कायदेभंग | ५४ |
| जुलूम | ५२ | चले जाव घोषणा | ५४ |
| संस्कृतिनाश | ५२ | १५ ऑगस्ट १९४७ स्वातंत्र्यप्राप्ति | ५४ |
| स्वातंत्र्य-रवि-उदय | ५२ | लोकशाही स्थापना | ५४ |
| श्रीछत्रपति शिवाजी-महाराज | ५२ | भारतीय राज्यशासनाचीं उच्च तत्त्वें | ५४-५५ |
| हिंदुराज्यस्थापना | ५२-५३ | सत्यपद-प्राप्ति | ५५ |
| संतमालिका | ५३ | | |
| पेशवाई | ५३ | | |


## अध्याय ५—भारतीय महोत्सवमहिमा

ओवीसंख्या—२५०


| | | | |
|---|---|---|---|
| संस्कृति सुवर्ण-धन | ५६ | रथसप्तमी | ६३ |
| विजयादशमी | ५७ | महाशिवरात्र-कथा | ६३ |
| सुवर्णलुटीची कथा | ५८ | होळी | ६४ |
| विजयोत्सवकर्तव्यें | ५८-५९ | गुढीपाडवा | ६५ |
| दीपावालि | ६०-६१ | रामनवमी | ६५ |
| देवदिवाळी | ६१ | हनुमानजयंती | ६६ |
| दत्तजयंती | ६२ | गौरीपूजन | ६७ |
| मकरसंक्रांत | ६२ | परशुरामजयंती | ६७ |

अक्षय्यतृतीया ६७
शंकराचार्यजयंती ६८
गंगोत्सव ६९
आषाढी एकादशी ६९
चातुर्मास्य-माहात्म्य ७०
वटपौर्णिमा ७०
नागपंचमी ७१
नारळी पौर्णिमा ७१-७२
श्रावणी ७२
गोकुळ अष्टमी ७२-७३
गणेशचतुर्थी ७३
महोत्सव-समारोप ७४-७५

## अध्याय ६—राष्ट्रीय सुवर्णदिन

ओवीसंख्या—२२८

प्रास्ताविक ७६
भारतीय स्वातंत्र्यदिन ७७
प्रजासत्ताक दिन ८०
प्रजाकर्तव्य ८०-८१
हरिजनदिन ८२
अस्पृश्योद्धार ८३-८४
बालदिन ८५-८६
वनमहोत्सव ८७
पशुसंवर्धनदिन ८८-८९
राष्ट्रसंघ (यूनो) दिन ९०-९२
राष्ट्रीय सण ९२-९३

## अध्याय ७—राष्ट्रबोधचिन्ह-विवेचन

ओवीसंख्या—२८७

टागोरदिन ९५
गीतांजलि ९५
राष्ट्रीय भावना ९६
'जनगणमन' राष्ट्रगीत ९६-९७
वंदे मातरम् गीत ९९
आनंदकंद ऐसा ९९
राष्ट्रध्वज १००
भगवा झेंडा १००
भारतीय तिरंगी ध्वज १०१
बोधचिन्ह—अशोकचक्र १०१
वनराजालंकृत राष्ट्रबोध-चिन्ह १०२
राष्ट्रभाषा १०२
हिंदी भाषा-महत्त्व १०३
आंग्ल भाषा-महत्त्व १०४
राष्ट्रीय ग्रंथ १०५

महाभारत १०५-१०७
व्यासमुनि इतिहास-
कथा १०५-१०६
भगवद्गीता ग्रंथ १०८
गीतातत्त्वविवेचन १०८-११३
रामायण ११३
पंचशील तत्त्वें ११४-११५

## अध्याय ८–भारतरत्नस्तवनामृत

ओवीसंख्या–२७८

संतमहिमा ११७-११८
हिंदुधर्माधार
सत्पुरुष ११८-११९
पाश्चात्य संशोधक–
संशोधन १२०-१२१
विज्ञानशास्त्रमहति १२२-१२३
भारतरत्न-नामावलि-
स्तवन (ऐतिहासिक
व आधुनिक) १२४-१३०
वैवस्वतमन्वन्तर १३१
विविध धर्म-संस्थापक १३१
थोर संत विभूति १३२-१३३-
१३४
प्रसिद्ध महाराष्ट्रीय
लोकनाट्यकार १३४
आधुनिक थोर कवि–
नाटककार-कादंबरी-
कार-गायक-गायिका-
वाद्यवादक-नर्तक-
चित्रकार-उद्योगपति
इत्यादि १३५-१३७

## अध्याय ९–भारत सद्धर्मसाधन

ओवीसंख्या–२३९

अष्टविनायक-स्थळ-
निर्देशन १३९
बाराज्योतिर्लिंग-नाम-
निर्देशन १३९
नवधर्म-आचरण १४०
राजकीय तत्त्वें १४०
समाजवाद १४१
विश्वधार्मिकता १४१
मानवजीवोत्पत्ति १४२
बाल्यावस्था १४२

मातृकर्तव्य १४३
शिशुशिक्षण १४४
ब्रह्मचर्याश्रम-अध्ययन
विभाग १४४
बालवीर सुवृत्तसंघटन
१४५-१४६
विद्यार्थीधर्म १४७-१४८
मातृपितृदेवता-महत्त्व १४८
आचार्यदेवो भव-
राष्ट्रदेवो भव १४९
भ्रष्ट विद्यार्थी-जीवन
१४९-१५०
महाविद्यालयीन शिक्षण १५१
तारुण्यावस्था १५२
विलास-मोह १५२-१५३
बेशिस्त १५२
राजकारण–छंद १५३
शिष्टाचार-कर्तव्य १५४
मानवी पराक्रम १५४-१५५
जगांतील सात आश्चर्यें
कोहिनूर-ताजमहाल-
चीन तटबंदी, पिरॅमिडस्
इ. १५४
आदर्श कर्तव्याचार १५५-१५६

## अध्याय १०–गृहस्थाश्रम-वानप्रस्थाश्रम

ओवीसंख्या–३२२

आधुनिक आचार-महत्त्व १५७
शिक्षणक्रम-वाद १५८
विद्यार्थी-विद्यार्थिनी भिन्न
शिक्षणक्रम १५८-१५९
प्रणयभावना १५९-१६०
पाशवी प्रणय १६०
सात्त्विक प्रेमपूजन १६०
वधूसंशोधन १६१
विवाहविधि १६१-१६२
गृहलक्ष्मीपूजन १६२
गृहस्थाश्रम-प्राप्ति १६३
आधुनिक स्त्री १६३-१६४
गृहदेवतापद प्राप्ति १६४
एकत्र कुटुंबपद्धति-
गुणदर्शन १६३
स्त्रीधर्म १६५
पतिपत्नी-कर्तव्य १६५-१६६
कुटुंबरक्षण १६७
गृहशोभावर्धन १६८
नागरी धर्म १६९

| | | | |
|---|---|---|---|
| ज्योतिषभ्रम | १७० | संसारनिवृत्ति | १७६ |
| मूर्खलक्षण | १७१ | सौभाग्य-विच्छेदन | १७७ |
| देशसेवा-धर्म | १७२ | वृद्ध मातापिताधर्म | १७७ |
| विधुरावस्था | १७३ | ऋषितुल्य सदाचार | १७८ |
| द्वितीय विवाह | १७४ | आधुनिक थोर महर्षि | १७९-८० |
| वैधव्यावस्था | १७५ | वानप्रस्थाश्रम-कर्तव्य | १८१ |
| वानप्रस्थाश्रम | १७३-१७६ | फलनिरपेक्ष कर्मयोग | १८२ |


## अध्याय ११—संन्यासाश्रम पुरुषोत्तमपदप्राप्तियोग

ओवीसंख्या—१३९


| | | | |
|---|---|---|---|
| मुख्याचार्य | १८३ | दांभिक संन्यासी | १८९ |
| 'भारत दीप' लेखक संवाद | १८४ | यज्ञकृत्य | १९० |
| अगम्य ब्रह्मज्ञान | १८५ | अंतकाळ-कर्तव्य | १९१ |
| ब्रह्मस्वरूप-निरूपण | १८५-१८६ | ॐतत्सत् ब्रह्मार्पणमस्तु | १९२ |
| मूर्तिपूजामहिमा | १८६-१८७ | परमपद-प्राप्ति | १९२ |
| आध्यात्मिक पूर्णता | १८८ | भारतदीप ग्रंथ राष्ट्रार्पण | १९३ |
| अतिवृद्धावस्था | १८८ | | |

---

आतां वाचकां सांगणें एक १९४


---

गुरुवर्य डॉ. **मो. ना. नातू**, बी.एस्सी.,एम्.बी.बी.एस्.

यांच्या शब्दांत 'भारत-दीप'

# प्रास्ताविक

श्री. जनुभाऊ गोखले यांनीं लिहिलेला ओवीबद्ध 'भारत-दीप' हा ग्रंथ वाचला. ११ अध्याय व २२४० ओव्या असलेला हा ग्रंथ अनेक दृष्टींनीं उपयुक्त व उद्बोधक झाला आहे. लहानांना सहज समजेल अशा सोप्या भाषेंत भारतीय संस्कृतीच्या अनेक मूल्यांचें दर्शन या ग्रंथानें झालें आहे. कांहीं गोष्टी पाठांतरानें मनावर चांगल्या ठसतात व पाठांतर हें गद्यापेक्षां पद्यांत करणें सुलभ असतें या दृष्टीनें लहानांना सहज ध्यानांत ठेवतां येतील अशा अनेक ओव्या पाठ करून घेऊन मुलांचे मनावर महत्त्वाचे उपयुक्त संस्कार करविणें या ओव्यांमुळें सहज साधतां येणार आहे. आपला आहार, भारतीय उत्सव-परंपरा, आधुनिक राष्ट्रीय दिन, भारतीय संतमहिमा, भारतीय आश्रम-कल्पना, याविषयीं सन्मार्गदर्शक व स्फूर्तिदायक, अशी अनेक प्रकारची माहिती या ग्रंथांत असल्यामुळें लहानांना व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या प्रौढांना हा ग्रंथ उत्तम उपयुक्त वाटेल असा विश्वास वाटतो. ग्रंथ विचारपूर्वक वाचल्यास नवीन दृष्टीहि लाभावी अशी लेखकाची अपेक्षा योग्य आहे. ग्रंथांतील ओव्यांची रचना सुगम व प्रासादिक असल्यानें, ग्रंथ वाचतांना मन रमतें व पुढें पुढें वाचत राहाण्याची इच्छा निर्माण होते. आजवर अनेक मासिकांतून त्यांचें लेखन, काव्य, चित्रकला इत्यादि विविध साहित्य प्रसिद्ध झालें आहे.

श्री. गोखले यांना मी त्यांच्या लहानपणापासून ओळखतों. स्काउट चळवळींत असतांना त्यांनीं अनेक तऱ्हेचें कार्य केलें. तेव्हां-पासून सतत उद्योग व कष्ट करून लोकांना अनेक तऱ्हेचें साहाय्य करण्याची त्यांची प्रवृत्ति मी पाहात आहे. लहानपणापासूनच अंगीं असलेल्या थोड्या अधूपणाचें रूपांतर दुर्दैवानें संपूर्ण अपंगता येण्यांत झालें व परस्वाधीनता त्यांना प्राप्त झाली. तरीसुद्धां त्यांच्या कष्टांत व उद्योगांत कमतरता आली नाहीं; मनाची उमेद तर कधींहि कमी झाली नाहीं. 'स्काउट सदा आनंदी वृत्तीचा असतो' या स्काउट नियमाचा तर ते आदर्श आहेत. केव्हांहि त्यांचेकडे गेलें तर ते आनंदी व हसतमुख आढळतात. अशा अवस्थेंतहि त्यांनीं एवढा मोठा ओवीबद्ध ग्रंथ लिहिला याबद्दल त्यांचें कौतुक व अभिनंदन करावें तेवढें थोडेंच आहे. नित्य उद्योगांत या महान् उद्योगाची भर टाकून त्यांनीं सर्वांकरितां—विशेषतः लहानांकरितां फार मोठें कार्य केलें आहे. ईश्वर त्यांना आयुरारोग्य देवो व त्यांचे हातून अशीच अधिक उपयुक्त कृति घडो हीच प्रार्थना.

४१८, शनवार पेठ, पुणें २. } —मोरेश्वर नारायण नातू

वन्दे मातरम् ।

परमपूज्य मातापिता ।
वंद्य गुरुजीही तत्वता ।
धन्य माझी भारतमाता ।
तयां ग्रंथ हा समर्पण ।।

दीपावलि
शके १८८२

—ज. म. गोखले



आमुच्या या आश्रमांत । प्रवचनें चालती अविश्रांत ।
ऐकोनि होई निश्चित । ईश्वरप्राप्ति येथ असे ।। अ. १-४२

|| श्रीसमर्थ प्रसन्न ||

# भारत-दीप

अध्याय पहिला



विषयप्रवेश

११९५३

ॐ श्रीगणेशाय नमः ।

श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुदेवाय नमः ।
मातृपितृदेवताभ्यां नमः । मातृभूम्यै नमः ॥१

ऐसें मंगलमूर्ति स्तवन । ऐसें विद्यादेवी वंदन ।
तैसेंच गुरुदेव अभिवादन । ग्रंथारंभीं भक्तीचें ॥२

मातृपितृदेवतांचें पूजन । स्वराष्ट्रासी नमन ।
आणि रसिकां आवाहन । प्रथमारंभीं केलें असे ॥३

ऐशी प्रथम वंदनाची शिकवण । असें सुसंस्कृतीचें वाण ।
भारतीय कृतीची खूण । येथ विलसे सुतेजानें ॥४

येथ मिळे आत्मसमाधान । ग्रंथपूर्तीला आशीर्वचन ।
जगन्नियंत्याचें अधिष्ठान । कार्यारंभीं मिळतसे ॥५

आतां प्रार्थना श्रीगुरुसी । पूर्ण ग्रंथलेखनासी ।
बुद्धि, आयुरारोग्यासी । मजसी द्यावें कृपेनें ॥६

आतां ऐका **लेखनस्थान** । येथ प्रभातीं सूर्यदर्शन ।
समोर मूर्ती गजानन । देत अखंड स्फूर्तीला ॥७

आमुचें हें पुण्यनगर । तुळशीबाग मंदिर शेजार ।
विभाग नाम शुक्रवार । शताधिक सहा गृहांक हा ॥८

भोंवतीं भिंतीचें आवरण । तेणें हें लहान दालन ।
येथ जाई सारें जीवन । अनारोग्या कारणें ।।९
वीणादेवी प्रतिमा सान । कलाकृतीची सांठवण
छायाचित्रांचें प्रदर्शन । येथ हेंही सुशोभित ।।१०
इथेंच केलें विद्यापठण । इथेंच केलें विद्यादान ।
ब्रह्मानंदाचेही क्षण । इथेंच तेंही अनुभविले ।।११
इथें काढलीं साप्ताहिकें । इथें चालविलीं मासिकें ।
इथें लिहिलीं कथानकें । संतोषविण्या मन्मन ।।१२
**हा ग्रंथ** नव्हे काव्यस्फूर्तीचा । हा ग्रंथ नोहे विद्वत्तेचा ।
वाग्विलासाचा, प्रतिभासाधनाचा । हा ग्रंथ नोहे खास ।।१३
हा ग्रंथ नव्हे वैराग्याचा । हा ग्रंथ नसे जीवनमुक्तीचा ।
संशोधनाचा, कलाकौशल्याचा । हा ग्रंथ न योजिला ।।१४
आतां रसिकां सांगणें एक । नव्हे मी विख्यात लेखक ।
परी सरस्वतीचा पाईक । भाषाभिमानी खास असे ।।१५
नसे मुळीं हा प्रचंड ग्रंथ । लेखक नव्हे सन्त-महंत ।
या कारणें नसे खंत । मज टीकाकारांची ।।१६
लिहिला नाहीं कीर्तीसाठीं । लिहिला नाहीं स्पर्धेसाठीं ।
नसे धन प्राप्तीसाठीं । ऐसा हाचि ग्रंथ असे ।।१७
वाटलें लिहाव्या अखंड ओळी । असंख्य पानें वेळोवेळीं ।
दिवसारात्रीं सर्वकाळीं । ग्रंथ हाचि लिहावा ।।१८
परी ग्रंथ असावा लहान । अंगीकारावें संक्षिप्तपण ।
रसिकां न द्यावा शीण । ऐसें मनीं उपजलें ।।१९
जगीं जें जें अनुभविलें । बरेंवाईट म्यां देखिलें ।
त्यावरुनी निष्कर्ष काढिले । कल्याणकारी सुबोधाचे ।।२०
जें केलें थोडें वाचन । जें केलें दीर्घ निरीक्षण ।
तेणें उपजलें जें ज्ञान । तें सर्व येथ असे ।।२१

अनेक नीतितत्त्वांचें विवरण । नागरी व्यवहारांचें ज्ञान ।
हो उज्ज्वल जेणें जीवन । तें सर्व येथ दिलें ।।२२
ऐका अपूर्व नवल झालें । जें जें माझ्या मनीं आलें ।
तें तें स्वप्नीं म्यां देखिलें । रामजन्मोत्सवदिनीं ।।२३
हा **स्वप्नींचा साक्षात्कार** । वाटला दृष्टान्त खरोखर ।
केला असे येथ साकार । याच ग्रंथीं लिहूनियां ।।२४
अठराशें एक्यायशीं संवत्सर । चैत्रनवमी उत्सव थोर ।
रामनामाचा चाले गजर । पुण्यनगरीं दुमदुमली ।।२५
ऐशा रामजन्म–सोहळ्यांत । श्रीरामनामाच्या उच्चारांत ।
परमसुख शान्ततेंत । रात्रीं निद्रित जाहलों ।।२६
तो स्वप्नांत पाहिला एक तरु । वृक्ष जणुं औदुंबरु ।
छायेंत बैसले सद्गुरु । शिष्यवर्गासमवेत ।।२७
खास नव्हते सद्गुरुदत्त । होते सुवृत्त मानव फक्त ।
आणिक मानवतेचे भक्त । निस्सीम सत्य उपासक ।।२८
नव्हतें वाढवलें जटाजंजाळ । नव्हते भस्मांकित रुद्राक्षमाळ ।
परि हृदयाचे परम विशाल । ऐसे शोभले शुद्धत्वें ।।२९
ऐसे शुभ्र वेषधारी सत्पुरुष । सर्वोत्कर्ष कार्यीं खूष ।
पृच्छकां देती संदेश । समता-बन्धुत्व-प्रीतीचा ।।३०
कोणी म्हणती विवेकानन्द । कोणी म्हणती समतानन्द ।
कांहीं म्हणती सेवानन्द । राष्ट्रकार्यार्थ अवतरले ।।३१
कोणी म्हणती देशसेवक । किंवा निर्वृत्त प्राध्यापक ।
वा आचार्य आधुनिक । इति तयांना संबोधिती ।।३२
कोणीहि असो धार्मिक । पाहुनी वाटलें झालें सार्थक ।
होऊनी तयांचा शिष्य एक । स्वजीवनासी उजळावें ।।३३
ऐसा करूनि विचार थोर । जावोनि तयांच्या सामोर ।
घालूं लागलों साष्टांग नमस्कार । तोंचि तयांनीं अडविलें ।।३४

म्हणती बा रे तूं कोण । आम्हां वंदण्याचें काय कारण ।
काय लागसी माझें ऋण । त्वरित मजसि सांग वा ।।३५
माझें असे गोखले सत्कुल । पिता नाम महादेव सोज्ज्वळ ।
माझी माता यमुना प्रेमळ । माझें नाम जनार्दन ।।३६
आजकालच्या जगांत । आलों सारखा निरखित ।
सर्वत्र अशान्तता अविरत । जीवन होतसे उध्वस्त ।।३७
ऐशा जीवनी नसे अर्थ । सर्वत्र माजलासे स्वार्थ ।
वाटला साधावा परमार्थ । म्हणूनि येथ आलोंसे ।।३८
पाहुनी आपली शुद्धता थोर । मनीं उपजला सुविचार ।
प्राप्त होण्या परमेश्वर । काय करावें निरुपावें ।।३९
ऐसें वदलों सत्पुरुषासी । धरूनी मजला हातासी ।
उठवुनी दिलें धैर्यासी । वदले ऐक वा श्रद्धेनें ।।४०
प्राप्त होण्या परमेश्वर । न लागे कष्ट अपार ।
अथवा तपश्चर्या घोर । गिरिकंदरीं जाऊनिया ।।४१
आमुच्या या आश्रमांत । प्रवचनें चालतीं अविश्रांत ।
ऐकोनि होई निश्चित । ईश्वर-प्राप्ती येथ असे ।।४२
आतां गेला पौराणिक काळ । तैसाच संपला इतिहास-काळ ।
आतां असे आधुनिक काळ । अति गहन समस्यांचा ।।४३
समस्या उकलणें अति गहन । अंगीं नसे मुळीं त्राण ।
भांडाभांडीचें राजकारण । कलियुगांत चालतसे ।।४४
ऐशा समयीं सद्वर्तन । सहकार्यानें आचरून ।
मानवता धर्मही पाळून । सुखशान्ति मिळवावी ।।४५
प्रीति, शान्ति, समाधान । होण्या आपुल्या स्वाधीन ।
काया, वाचा आणि मन । अतिशुद्ध ठेवावें ।।४६
ऐशा तत्त्वांचें विवरण । करिती येथें गुरु-शिष्यगण ।
तैसेंच नागरी धर्म-शिक्षण । तेंही येथें मिळतसे ।।४७

सत्पुरुष ते ऐसें बोलून । वदले शिष्यांकडे वळून ।
तुम्हांस सुहृद् एक नवीन । आज येथें मिळालासे ॥४८
ऐकोनि तयांचें वचन । शिष्यगणांत सामील होऊन ।
तयांचें शिष्यत्व पत्करून । माझें मीपण विसरलों ॥४९
औदुंबराचें पार्श्वभागीं । नितान्त रम्य ऐशा मार्गीं ।
पुढती गेलों सुशांत जागीं । उपदेशामृत ऐकावया ॥५०
शिष्यें दाविला मज आश्रम । भासला राष्ट्रोत्कर्ष केंद्रासम ।
पाहूनि निवाले कष्टश्रम । सन्तोष मनीं दाटला ॥५१
तेथ होते अनेक आचार्य । तैसेच अनेक शिष्य आर्य ।
आचरूनिया सर्व सहकार्य । अभ्यासिती नाना तत्त्वें ॥५२
आश्रमीं गुरुशिष्य संवाद । चाले अखंड देण्या बोध ।
तेणें जातसे सर्व भेद । ईश्वरप्राप्ति त्यांत असे ॥५३
ऐसा मिळण्याला ईश्वर । ग्रंथ लिहितां अनन्त अक्षर ।
गुरुशिष्य-संवाद थोर । आतां पुढतीं वाचावा ॥५४
ग्रन्थ सुबोध वाटल्यास । करोनिया पठण अभ्यास ।
वळण द्यावें जीवनास । नवयुगीं योग्य असे ॥५५
वाटल्यास हा असाधारण । वाद करूं नये निष्कारण ।
सोडूं नये वाक्‌बाण । स्वप्न–ग्रंथ जाणोनिया ॥५६
आतां पुरें हें प्रास्ताविक । प्रयत्न केला प्रामाणिक ।
ग्रन्थविषय कळण्या वास्तविक । पुरें असे विवरण ॥५७
ग्रंथनाम ' भारत-दीप ' इति । जेणें स्वाभिमानें उजळे मति ।
प्रदीप्त होई प्रीत–ज्योति । भारत–भक्ति वर्धाया ॥५८
हा ग्रंथदीप मोठ्या राष्ट्राचा । अनेक थोर नीतितत्त्वांचा ।
उजळो दृष्टिकोन भारताचा । जयभारत होण्या जगतांत ॥५९
इति गुरुशिष्य संवादाचा । या ' भारतदीप ' ग्रंथाचा ।
विषयप्रवेश नाम आरंभीचा । पहिला अध्याय संपला ॥६०

# अध्याय दुसरा

## मानवदेहरक्षण ( आहारमीमांसा )

ॐ श्रीगणेशाय नमः ।

अध्यायारंभीं तुझें स्मरण । तैसेंच तुझें भक्तिवन्दन ।
आणि चिरंतर तव चिंतन । सर्वनाश करी संकटांचा ।।१
सकल गुणांच्या राशी । सामाविल्या बा तुजपाशीं ।
म्हणुनी ईशा मजपाशीं । यावें कृपादृष्टि करावया ।।२
या ग्रंथीं तत्त्वें सुसंस्कृत । कैचीं वर्णिती माझें प्राकृत ।
म्हणुनी झालों भयभीत । कारणें कृपावंत व्हावें गणराया ।।३
जगीं सर्वांनीं सुखी असावें । दुःखामाजीं न कष्टावें ।
तैसें आरोग्यांत रमावें । ऐसें प्रार्थीं सिद्धिविनायका ।।४
आतां ऐका वाचकजन । करावें चित्त सावधान ।
सत्कार्यीं लावावें तनमन । परमार्थहि साधावया ।।५
कांहीं घडावें सत्कार्य । म्हणून एक वैद्य प्राचार्य ।
भोंवतीं जमवोनि जिज्ञासू आर्य । प्रवचन करूं लागला ।।६
पूर्वकथित आश्रमांत । प्रातःसमयीं उत्साहकाळांत ।
सुरम्य निसर्ग वातावरणांत । सशास्त्र चर्चा करीतसे ।।७
प्रथम वंदुनी श्रीहरीस । नंतर नमुनी श्रीभास्करास ।
ज्यानें निर्मिलें सकळ तेजांस । जन्म देऊनी भूमंडळां ।।८
ऐशा अग्निरूपी शक्ति देवासी । बलऐश्वर्य देण्या स्वराष्ट्रासी ।
भावें प्रार्थूनी आरोग्य तत्त्वांसी । सांगे सर्वां प्राचार्य ।।९
चौऱ्यांशी लक्ष योनींत । आत्मा फिरे जन्मजन्मांतरांत ।
तरी तो अमर ख्यात । ऐसें अध्यात्मवचन असे ।।१०

जैसें जैसें कृत्य घडे । तैसें माप नशिबीं पडे ।
कोणी हंसे, कोणी रडे । म्हणोनी सद्वर्तनीं असावें ॥११

असंख्य अगणित जन्मांतरांत । मानवदेह अपूर्व विख्यात ।
त्या तोड नाहीं जगांत । हेंचि त्रिवार सत्य असे ॥१२

मानवदेहाची अपूर्वता । ज्ञानभांडारें वर्णन करितां ।
शब्दकलश होई रिता । हेंही निश्चित जाणावें ॥१३

मानवदेह प्राप्त होतां । स्वराष्ट्र-सेवाव्रत धरितां ।
देवपण अंगीं ये तत्त्वता । सार्थक जन्माचें होतसे ॥१४

देशकार्य करण्यासाठीं । लागे अंगीं शक्ति मोठी ।
कारणें स्वशरीरयष्टी । अति सुदृढ राखावी ॥१५

ऐसें करूनी प्रास्ताविक । वदले सत्कर्म प्रामाणिक ।
ऐकती निष्ठेनें भाविक । आतां तेंच अभ्यासा ॥१६

गरीब असो वा श्रीमंत । आबालवृद्धांच्या जीवनांत ।
दैनंदिनी आचरणांत । अन्नग्रहण मुख्य असे ॥१७

पोटासाठीं मानव कष्टतो । अन्नासाठीं तोच भटकतो ।
भोजन मिळतां तुष्टतो । अन्न म्हणजे संजीवन ॥१८

'**अन्नमयः पुरुषः**' सत्यवचन । जैसें अन्न तैसें जीवन ।
सात्त्विक, राजस, तामस मन । अन्नानेंच होतसे ॥१९

सकस पौष्टिक आहार । घेतां समतोल भरपूर ।
करीतसे तेजस्वी शरीर । हेंच आरोग्य-तत्त्व जाणा ॥२०

भुकेविना खाऊं नये । तहानेविना पिऊं नये ।
व्यायामाविना राहूं नये । दैनंदिनीच्या आचरणीं ॥२१

आपल्या स्थूल देहांत । असती पेशी कोटी अनंत ।
सत्कार्येंच त्या नांदतात । घेतां आहार योग्यसा ॥२२

पेशींच्या सहकार्यासाठीं । आहारीं हवी शक्ती मोठी ।
तेणें लाभे आरोग्य पुष्टी । मानवांच्या जीवनांत ॥२३

आतां ऐका मुख्य तत्त्वें । असतीं कशांत जीवनसत्त्वें ।
जयांच्याही अस्तित्वें । इंद्रियें गात्रें जोरावतीं ॥२४

गहूं, तांदूळ, मका, बाजरी । साबुदाणा, सातू, ज्वारी ।
इत्यादि एक दलें सारीं । खावीं नीट शिजवूनिया ॥२५

गव्हाचा मैदा तयार करितां । त्यांतील बीजें नासतीं तत्त्वतां ।
तेणें येई निःसत्त्वता । याकारणें मैदा वर्जावा ॥२६

कणिकेचे पदार्थ बनवावे । त्यातील कोंडयासी न त्यजावें ।
कोंडा बीजसत्त्व जाणावें । जेणें लाभे पौष्टिकता ॥२७

शरीरा लागती खनिज क्षार । कोंडयांत असती ते भरपूर ।
सडतां तांदूळ न करा दूर । कोंडासत्त्व अमूल्य जाणा ॥२८

तूर, हरबरा, मसूर, दाणे । चवळी, हुलगे, वाल, वाटाणे ।
ऐशीं विविध द्विदल धान्यें । मोड आणोनि खावींत ॥२९

द्विदलें भिजवूनि मोड आणितां । त्यांतील सत्त्वांची प्रखरता ।
विशेषगुणें ये अनुभवितां । सिद्ध ऐसा नियम असे ॥३०

कंदभाज्या, मुळा, गाजर । कांदा, बटाटा, सुरण, फुलवर ।
चवळी, मटकी, आळू, कोथिंबीर । इत्यादि असावे आहारीं ॥३१

भोपळा, वांगी, फळभाजी । काकडी, दोडका, भेंडी ताजी ।
तशाच शेंगा भोजनामाजीं । पोषणातें देती खनिजक्षार ॥३२

विविध ऋतूंतील नाना फळें । आंबे, करवंदें, जांभळें ।
लिंबू, नारिंग आणि केळें । कर्बोदक देतीं शर्करारूपें ॥३३

ऐशीं फळें आणि सुकामेवा । खारीक, काजू, पिस्ता, खावा ।
आणि मज्जाभाग पुष्ट करावा । ज्वलनरस मिळवूनिया ॥३४

शुभ्रसाखर गोमटी दिसे । जरी गोड ती लागतसे ।
तरी क्षारसत्त्वविरहित असे । या कारणें ती त्यजावी ॥३५

काकवी वा कोरडा गूळ । पाहुनी घ्यावा तो रवाळ ।
खाऊनियां तो निर्मळ । सात्त्विक सत्त्वें मिळवावीं ॥३६

दुग्ध असे पूर्ण अन्न । फक्त दुधानें जगतें जीवन ।
कारणें तें अमृतासमान । खास ऐसें मानावें ।।३७
दूध, दही तूप, लोणी । आणि विपुल शुद्ध पाणी ।
करिती निरोगी मानवप्राणी । हेंही चित्तांत ठेवावें ।।३८
कर्बोदक, स्निग्धता, सत्त्वें क्षार । यांनीं युक्त भुईमूग फार ।
रोज खातां खरोखर। आरोग्य सुदृढ राहतसे ।।३९
भारतीय रोजचें भोजन । भात, भाजी, पोळी, वरण ।
दूध, तूप वद्ध प्रमाण । ऐसा सशास्त्र आहार असे ।।४०
आजच्या आधुनिक काळांत । " अ, ब, क, ड " आदि ख्यात ।
**जीवनसत्त्वें** हीं संशोधित । अन्नसंचयीं ठेवावीं ।।४१
' अ ' सत्त्व असें गाजरांत । ' ब ' सत्त्व तैसें कोथिंबिरींत ।
'क' सत्त्व आवळा आमलकांत । 'ड' सत्त्व तैसें फळांत जाणा ।।४२
'अब' हीं फळभाज्यांत । हींच सत्त्वें असतीं युक्त ।
जेणें जठराग्नि हो प्रदीप्त । सुज्ञांनीं हें जाणावें ।।४३
कडू, गोड, तिखट, खारट । आणि तैसेंच तुरट, आंबट ।
ऐसें षड्रस असती प्रकट । शास्त्रज्ञांनीं केलेले ।।४४
हे षड्रस लाळ उत्पादिती । जें हिंग, तेल, मसाला देती ।
तयांनीं अन्नपचना मिळे गती । कारणें ते उपकारक ।।४५
रसभरित, गोड, मधुर । पौष्टिक, सुपक्व, रुचकर ।
ऐसा सात्त्विक आहार । जीवन सुखी करीतसे ।।४६
आंबट, खारट, तिखट । तैसाच तुरट तेलकट ।
जेणें मानव हो तापट । ऐसा आहार राजस जाणा ।।४७
कुजकट, आंबुस ऐसें अन्न । तैसें अपक्व मादक जडान्न ।
ऐसें घेतां तामसी भोजन । तामस आहार होतसे ।।४८
सात्त्विक आहार सर्वश्रेष्ठ । त्याहून राजस असे कनिष्ठ ।
तामसी आहार नसे इष्ट । ऐसें शास्त्रवचन असे ।।४९

सात्त्विकता देतसे शान्ति । राजसता, विलास प्रीती ।
तामसतेनें दुष्ट मती । मनुजांत उत्पन्न होतसे ॥५०
आहारांत शाकाहार उत्तम । मांसाहार जाणा मध्यम ।
शाकाहार देतसे दम । आरोग्यरक्षणा कारणें ॥५१
पाश्चात्य तज्ज्ञ प्रतिपादिती । शाकाहाराची थोर महती ।
जेणें मिळते शान्ति, सुगति । आरोग्यवर्धन होवोनिया ॥५२
ज्या देशीं न मिळे धान्य । जेथें खावया न मिळे अन्न ।
तेथें मांसाहारी भोजन । घेणें हेंच उचित असे ॥५३
शाकाहार असे निसर्गदत्त । मांसाहार हिंसक न युक्त ।
मांसाहारें मानव सशक्त । होई हाचि भ्रम जाणा ॥५४
शाकाहार असे सत्कर्माचरण । मांसाहार म्हणा कनिष्ठाचरण ।
तरी मनुजानें आमरण । शाकाहार व्रत धरावें ॥५५
ऐसें करितां अन्नसेवन । करावें साप्ताहिक उपोषण ।
तेणें अनिष्ट अपचन । सर्व नष्ट होतसे ॥५६
सर्व आहारपचनासाठीं । व्यायामाची इष्टता मोठी ।
आणि दीर्घोद्योगाचे पोटीं । आरोग्यप्राप्ति होतसे ॥ ५७
कालमानाच्या अनुसंधानें । आणि प्रकृतीच्या भिन्नतेनें ।
जास्त कमी फरकानें । आहार घेतला पाहिजे ॥५८
ऐशीं तत्त्वें आहाराचीं । पाळोनि रोज आरोग्याचीं ।
प्राप्ति करोनियां सुखाची । साधावा स्वार्थपरमार्थ ॥५९
आहारशास्त्राचे प्रख्यात । असती ग्रंथ अगणित ।
तेही विविध भाषेंत । विद्वानांना मान्य असे ॥६०
त्यांचें थोडकें विवेचन । येथ केलें मनापासून ।
यांत जरी कांहीं न्यून । क्षमा केली पाहिजे ॥६१
श्रोतियां कांहीं शंका येती । तरी नसावी संकोचवृत्ती ।
विचारोनि मिळवा मनःशान्ती । यथाशक्ति निरसन व्हावया ॥६२

अैसें संपवोनी प्रवचन । प्राचार्यें केलें स्मितवदन ।
आणि सद्भावनेचें वंदन । केलें सर्व श्रोतियां ।।६३
तोंच एक खादी-वेषधारी । साशंक ऐशी चर्या करी ।
आणि उठूनि प्रश्न करी । शंका येतसे वदूनिया ।।६४
गुरुवर्य ! ऐकलें प्रवचन । जेणें कळलें सत्कर्माचिरण ।
आतां निरोपावें **दुष्कर्माचरण** । आहार-शास्त्रीं कैचें तें । ६५
कथन करावीं **नाना व्यसनें** । तयांचें आयुरारोग्य पोखरणें ।
जेणें झिजतें मानवजिणें । तयांच्या आधीन झाल्यानें ।।६६
आपुला प्रश्न ऐकोन । संतोषलें माझें मन ।
आतां सांगतों मनापासून । सावधतेनें ऐकावें ।।६७
ऐसें सांगोन प्राचार्य वदले । ईशानें अन्नपाणी निर्मिलें ।
परि सैतानें अति ग्रासिलें । मानवी मन ।।६८
आहारीं सवयी दूषित । लागती मानवा जगतांत ।
ज्यांतून बुद्धिवन्तहि न सुटत । त्यांचें नांव व्यसन जाणा ।।६९
ज्यानें षड्रिपु बळावती । इंद्रियें, गात्रें खालावतीं ।
जेणें दुरावते सद्धर्मप्रीती । तयाचें नांव व्यसन जाणा ।।७०
करोनी सृष्टिनियमांचें उल्लंघन । मानव करी अशुद्धाचरण ।
दुर्वर्तनाची अैशी वेसण । तयाचें नांव व्यसन जाणा ।।७१
अति खाणें, अति पिणें । अति भटकणे, अति झोपणें ।
विलास-चैनीत अति रगणें । याचें नांव व्यसन असे ।।७२
व्यय होतसे बुद्धीचा । व्यय होई संपत्तीचा ।
व्यय होतसे आरोग्याचा । त्याचें नाम व्यसन जाणा ।।७३
वर्तनीं सुटतां समतोलता । काया, मना ये जाडचता ।
मृत्यु नजीक ये तत्त्वता । हेंचि त्रिवार सत्य असे ।।७४
होतां आचरणांत अतिशयोक्ति । अति तेथें होय माती ।
हीं तत्त्वें ज्या न कळतीं । ऐसा मानव आत्मनाशी ।।७५

सृष्टिनियमांचें उल्लंघन । करिती न चतुष्पाद प्राणीगण ।
जें मात्र करिती मानवजन । स्वबुद्धिनाश करूनिया ॥७६
व्याघ्रापुढें ठेवितां साखरभात । त्या न कदापि तो शिवत ।
तयाचा आहार तोच घेत । सृष्टिनियम पाळीतसे ॥७७
मानवापुढें ठेवितां मद्यमांस । चाखण्याचा धरितो हव्यास ।
जिभेची ही चटक खास । निसर्गाचिया विरुद्ध असे ॥७८
आजच्या आधुनिक युगांत । पाश्चिमात्यांच्या संगतींत ।
असंख्य व्यसनें फैलावत । सुशिक्षितही मूढ होती ॥७९
जुगार, मांसाहार, मद्यसेवन । चहा, कॉफी, धूम्रपान ।
ऐशा व्यसनीं बुडाले जन । पाश्चात्यांच्या संगतीनें ॥८०
अफू, भांग, गांजा, चरस । निषिद्ध असती आयुर्वेदास ।
जाणा हीं विषें खास । आरोग्यनाश करणारीं ॥८१
चारी वेदांत आयुर्वेद । असे प्रख्यात आरोग्यप्रद ।
पाश्चात्य वदती हास्यास्पद । तयां नांवें ठेवूनिया ॥८२
प्राचीन, पौराणिक काळांत । शास्त्र-निषिद्ध असतां वर्तत ।
तैसेंच दुष्कर्माचिरण करीत । अनेक नाश पावले ॥८३
जयांनीं मदिरा सेविली । परस्त्री पतिता केली ।
वर्तनीं लज्जा त्यजिली । नाश झाला तयांचा ॥८४
मदिरासक्त शुक्राचार्य । मदिरें केला त्या अनार्य ।
गमावुनी आत्मस्थैर्य । पश्चात्ताप पावला ॥८५
असुर जे सर्वशूर । मदिरेंत होवोनि चूर ।
दुष्कृत्यें करूनि घोर । सर्वनाश पावले ॥८६
पांच पांडव धर्मवीर । खेळुं लागतां ते जुगार ।
गमाविलें त्यांनीं ऐश्वर्य । व्यसनामाजीं बुडोनिया ॥८७
आहारांतही अनेक व्यसनें । नष्ट करितीं पुष्टजीवनें ।
मदोन्मत्त करितीं मनें । अनेक रंकारावांचीं ॥८८

चहा-कॉफी रोज पिऊन । जीवन होतें सत्त्वहीन ।
नसे तें दीनांचें जीवन । हेंचि खास जाणावें ।।८९

त्यांत नसती अन्नघटक । तयांची लागतां चटक ।
पोखरतें हृदय-यकृत । हेंचि खास समजावें ।।९०

कॅफिन आणि टॅनिन । जाणा हें आंग्लनामकरण ।
अैशा विषांचें हवें ज्ञान । जीं चहाकॉफींत समाविष्ट ।।९१

अैसा असे शास्त्रजबाब । चहानें वाढतो रक्तदाब ।
हृदयविकाराचा क्षोभ । होई कडू विषांमुळें ।।९२

कॉफीची तीच गत । करी ती मेंदू विकृत ।
असो द्यावें हें विदित । सुज्ञबुद्ध जनतेला ।।९३

चहानें होई निद्रानाश । त्यांत न सत्त्व लवलेश ।
तरी हुशारीची धरुनी आस । प्राशन करिती सर्व जन ।।९४

प्रथमारंभीं पेला एक । नंतर पेले एकावर एक ।
दिनरात्रींही कित्येक । चहापान वर्धतसे ।।९५

ऐसें असें हें व्यसन । त्याची बसेतसे वेसण ।
काहीमात्र नसे गुण । ऐशा या चहामाजीं ।।९६

कॉफीच्या नादीं लागतां । उपजे बुद्धिमांद्य तत्त्वता ।
तैशीच ये निःसत्त्वता । रक्त अशुद्ध होवोनिया ।।९७

हीं पेयें जरी उत्तेजक । तरी उत्तेजन असे क्षणैक ।
जाणा तीं अपायकारक । ऐसें वैद्यक ज्ञान असें ।।९८

अिष्टमित्र घरीं येतां । करुनी तयांचा स्वागता ।
चहा-कॉफी तयां देता । दुष्कृत्य खास होतसे ।।९९

त्या ऐवजीं द्यावें पुष्पफल । वा अर्पावें मधुमिश्रित जल ।
जेणें वाढे तयांचें बल । हेंच आदर्श स्वागत असे ।।१००

आहारांत **मांसाहार** । असे तो अनिष्ट फार ।
कारणें शुद्ध शाकाहार । आदर्शभूत जाणावा ।।१०१

मांसाहारी प्राणी मारिती । तयांचें मांस भोजनीं खाती ।
अैशा पापास नसे मिती । अैसें साधुवचन असे ॥१०२

सुशिक्षित, सुधारक । वदती मांसाशन आधुनिक ।
असे अती शरीरपोषक । हा सिद्धान्त सत्य नोहे ॥१०३

मेंढी, शेळी, हरीण प्राणी । मासे, कोंबडी घेतां भक्षणी ।
उत्तम वदतीं आरोग्यरक्षणीं । हाच निव्वळ भ्रम असे ॥१०४

महायुद्ध झालें पहिलें । मांस बाजारीं संपलें ।
आणि शाकाव्रत धरिलें । अनेकांनीं युरोपांत ॥१०५

मांसाहारें येते मस्ती । मांसाशनें येते सुस्ती ।
नष्ट होते सात्त्विकवृत्ती । आंग्लही अैसें वदतात ॥१०६

नाट्यलेखनीं विश्वविख्यात । बर्नार्ड शॉ असुनी पाश्चात्य
अंगीकारुनी शाकाहारव्रत । सुदृढ, दीर्घायुषी जाहले ॥१०७

ऐकोणीसशें एकोणिसांत । नवल घडलें लंडन नगरांत ।
जनता रमली फलाहारांत । शाकाहार फैलावुनी ॥१०८

ऐसें असतां पाश्चात्य देशांत । हिंदु युवक जाती युरोपांत ।
तेथें गुंगती मांसाहारांत । दुर्दैव हें संस्कृतीचें ॥१०९

मांसाहार, मद्यसेवन, धूम्रपान । चैनींत उचलूनी तरुणजन ।
त्याविना व्यर्थ जीवन । ऐसें मूर्खपणें वरळती ॥११०

मांसाहारें येतें शिष्टपण । ऐसें शिकवूनि शहाणपण ।
कुटुंबियां देती हें व्यसन । मूढमती ते सुधारक ॥१११

मेदवृद्धि, डोकेंदुखी, मूत्रविकार । तैसाच रक्तदाब आजार ।
शिवाय अपचनाची तक्रार । मांसाहारें वळावतें ॥११२

स्वगृहीं असतां अन्नधान्य । जे अवलंबिती मांसाशन ।
तयांना मारितसे सैतान । पावित्र्य नष्ट करूनिया ॥११३

अफू, भांग, गांजा, चरस । यांचा वापरही मनुजांस ।
दे गुंगी कैफ निशेस । मूढ तयांना करूनियां ॥११४

मद्य, तंबाखू, कोकेन । यांचे दुष्परिणाम अभ्यासून ।
कायद्याचें त्यावरी बंधन । हवें वदती शास्त्रज्ञ ॥११५
मद्यानें षड्रिपु बळावती । गात्रें, इंद्रियें खालावती ।
सुस्थितीची हो दुर्गती । दुर्मती सर्वे घेवोनिया ॥११६
दारूनें कुटुंबाचा ऱ्हास । होऊनि नाश आत्मविकास ।
आणि मिळतें दुष्कर्मास । निमंत्रण कुबुद्धीचें ॥११७
दारूनें होतें वित्तहानी । दारू करी रक्ताचें पाणी ।
स्फूर्ति जाते, येते ग्लानी । दुष्परिणाम हा मद्याचा ॥११८
व्हिस्की, जिन्, रम्, ब्रँडी । स्पिरिट, बेवडा, ताडी, माडी ।
दारूचीं हीं रूपें बेगडी । सत्यनाश करिती जीवनाचा ॥११९
ऐशीं रूपें विषारी अर्क । होतांच तयांचा संपर्क ।
व्यसनीजन होती गर्क । आणि मृत्यूलाही कवटाळिती ॥१२०
दारूनें होतसे मंद बुद्धि । कायद्यानें करावी दारूबंदी ।
दंडावे समस्त मद्यछंदी । राष्ट्रकल्याण साधाया ॥१२१
दारूनें जाते तीव्र थंडी । व्यर्थ ही खोटी घमेंडी ।
मद्यास देऊनी गचांडी । पवित्र जीवन आचरावें ॥१२२
मद्यपि सदा मदोन्मत्त । सर्वस्व गमावतो कैफांत ।
आणि शेवटीं शीलभ्रष्टतेंत । व्यसनांतचि मरतसे ॥१२३
अपवित्र हें मद्यव्यसन । ऐसें असे धर्मवचन ।
या कारणें तें त्यजून । सच्छीलारोग्य मिळवावें ॥१२४
कोलंबसें शोधिली अमेरिका । तेथून आणलें रोप ऐका ।
जेणें वेडे केलें सकळिकां । **तंबाखू** नाम त्या रोपाचें ॥१२५
तंबाखूसेवनाचे प्रकार । भिन्न असती खरोखर ।
परि अनारोग्याचा हाहा:कार । तंबाखूनें होतसे ॥१२६
कोणी तंबाखू चघळिती । कुणी गुडगुडी, विडी ओढिती ।
कुणी चिलीम पेटविती । ऐसें असे हें धूम्रपान ॥१२७

शिष्ट वापरती सिगारेट । पाश्चात्याभिमानी चिरूट ।
ऐसें धूम्रपान अखंडित । तंबाखूभंक्तांचें चालतसे ।।१२८

तंबाखूंत विष निकोटिन । तयानें होतें फुप्फुस-ज्वलन ।
आणि अडखळे दीर्घ श्वसन । ऐसा प्रताप तंबाखूचा ।।१२९

दमा, खोकला निरंतर । नेत्रदाह, दृष्टिदोष तदनन्तर ।
क्षयाचा होई विकार । तंबाखूच्या सेवनानें ।।१३०

धूम्रपान हा शिष्टाचार । वदे आधुनिक अहंकार ।
खरोखरीचा भ्रष्टाकार । ऐसे सद्धर्म वदतसे ।।१३१

धूम्रपानें अनेक मेले । कितीक शक्तिहीन झाले ।
धूम्रपानें क्षयी गणले । ऐसें प्रतापी धूम्रपान ।।१३२

धूम्रपान निषिद्ध हिंदुधर्मीं । धूम्रपान निषिद्ध आंग्लधर्मीं ।
जेणें मानव कुमार्ग कर्मीं । स्वजीवनास वर्ततसे ।।१३३

ऐसें धूम्रपान त्यजावें । तंबाखूसही लाथाडावें ।
आणि सोज्ज्वळ करावें । आयुरारोग्य आपुलें ।।१३४

अशिक्षित वा सुशिक्षित । यांनीं उपदेशावें समाजांत ।
धूम्रपान मुक्त होण्यांत । स्वतेज वाढे सांगोनिया ।।१३५

आजकालच्या सुधारणा-युगांत । बाजारी खाद्यपेयें जेवणांत ।
अतिरेक चाले आबालवृद्धांत । हेंही एक व्यसन असे ।।१३६

भजी, वडे, चिवडे, तळकट । चहा, सरबतें, पेयें पांचट ।
खिमा, आम्लेट, कटलेट । विश्रांतिगृहीं खाती जन ।१३७

मित्रमैत्रिणींसमवेत । टाकूनि कुटुंबीय स्वगृहांत ।
हात मारिती बाजारांत । अशुद्ध ऐशा खाद्यांवरी ।।१३८

इडली, डोसा, सांबार । यांची चटक अनिवार ।
सकाळ, संध्याकाळ, दुपार । जिव्हेमागें लागतसे ।।१३९

दसरा, दिवाळी ऐशा सणीं । जन्मदिनीं, श्राद्धदिनीं, विवाहदिनीं ।
मौंजीबंधनीं, व्रतोद्यापनीं, नामकरणीं । मिष्टान्न खाती वकावक ।।१४०

याचा परिणाम आरोग्यनाशी । सुबुद्ध, सुदृढही तोंडघशीं ।
पडतां, होती वेडीपिशी । अतिरेकी या खाद्याला ॥१४१
अति थंड, अति उष्ण, मादक । ऐशा खाद्यांचा अतिरेक ।
होतो जीवनास बाधक । ऐसें शास्त्रवचन असें ॥१४२
कांहीं करिती एकादशी । परि खाऊनियां अन्नराशी ।
होती खास ते अधाशी । ढोंग करती उपोषणीं ॥१४३
खात जावें जगण्यासाठीं । जगू नये खाण्यासाठीं ।
ना तरी हमखास पाठीं । आयुष्यनाश लागतसे ॥१४४
प्रकृति असतां अशक्त । रहावें खरें एकभुक्त ।
आणि त्वरित व्हावें मुक्त । पचन-दोषांपासून ॥१४५
मितव्ययी समतोल आहार । करितां योग्य श्रमपरिहार ।
ठेवितसे शुद्ध, सुदृढ शरीर । हेंच शास्त्र-संशोधन ॥१४६
अति खाणें करितें अनर्थ । तेणे न हो स्वार्थ परमार्थ ।
प्राप्त होण्या अध्यात्मिक सामर्थ्य । ताबा पाहिजे जिव्हेवरी॥१४७
मानवी शरीर जाणा यंत्र । तयाच्या निर्मळतेचें तंत्र ।
असे अल्प सुयोग आहारमंत्र । हेंच त्रिवार सत्य असे ॥१४८
धन्य महात्माजी झाले । जयांनीं अल्पआहार आचरिले ।
आणि कलियुगींही मेळविलें । दीर्घायुष्य तेजस्वी ॥१४९
शास्त्रनिषिद्ध आहार तत्त्वें । तुम्हांस कथिलीं ज्ञान-परत्वें ।
श्रवण केलींत स्वस्थ चित्तें । यास्तव आभार मानतों ॥१५०
समाजसेवक उपदेशतील आतां । दुष्काळ स्वदेशीं येतां ।
कैचा आहार घ्यावा तत्त्वता । आरोग्यता मेळवाया ॥१५१
धान्य-टंचाई विरुद्ध उपाय । योजावे देशांत काय काय ।
यांचाही सशास्त्र परिचय । त्यांच्या प्रवचनीं होईल ॥१५२
ऐसें मनोभावें करूनि कथन । प्राचार्यें संपविलें सत्य प्रवचन ।
जेणें उपजोनी शास्त्रज्ञान । सर्वत्र अत्यानन्द पसरला ॥१५३


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. [illegible]

राष्ट्रानें व्यसनमुक्त व्हावें । राष्ट्रांत तेज, शौर्य दिसावें ।
आणि सबल स्वतंत्र नांदावें। भारत महाराष्ट्र होण्याला ॥१५४

पुढील कथा वाचकजन । संपूर्ण वाचा लावुनी मन ।
तेणें पावाल समाधान । नवचैतन्य मिळोनिया ॥१५५

इति प्राचार्य प्रवचनाचा । श्री 'भारत-दीप' ग्रंथाचा ।
मानवदेहरक्षण नांवाचा । द्वितीय अध्याय संपूर्ण ॥१५६

卐 卐 卐

# अध्याय तिसरा

# दुष्काळ-निवारण

ॐ श्रीगणेशाय नमः ।

श्री राजाधिराज गणदेवा । तुझा विसर कधीं न व्हावा ।
मिळण्या स्फूर्तीचा अखंड ठेवा । अध्यायारंभीं स्तवन तुझें ॥१

जेथें सर्वदा तव स्मरण । तेथें वृद्धि समृद्धि कल्याण ।
नाना संकटांचें निवारण । तव कृपेनें होतसे ॥२

राष्ट्रांत धान्यवृद्धि व्हावी । राष्ट्रास सुसंपन्नता लाभावी ।
भारता सुखशांति द्यावी । हीच प्रार्थना तुजपाशीं ॥३

आतां ऐका वाचकजन । संपलें आहार-विवरण ।
तदनंतर वळले सर्वजन । आश्रमाच्या पूर्वभागीं ॥४

होत्या तरुलता जागोजागीं । तयांचीं सुपुष्पें विविधरंगी ।
राष्ट्रोत्कर्ष केंद्राच्या पूर्वभागीं । आल्हाद देती सकलांना ॥५

ऐशा मनोहारी निसर्गांत । एक पर्णकुटी सुशोभित ।
होती पथिकां संदेश देत । अतुल्य समाजसेवेचा ॥६

समाजसेवा ही ईश्वरसेवा । त्याविना दुजा धर्म न व्हावा ।
ऐसा बोध सर्वां द्यावा । ऐसें ध्येय पर्णकुटीचें ।।७

उद्देश हाचि साधायाला । होतें मांडिलें प्रदर्शनाला ।
तेथें शोभतीं तोरणें-माळा । वाजती वाजंत्रीं मंगलशीं ।।८

तेथें टांगले नाना फलक । राष्ट्रोत्कर्ष तत्त्वांची एकेक ।
पंक्ति दर्शविती तारक । कल्याणकारी राष्ट्राला ।।९

जातिभेद सारे टाळावे । राजकारणीं भेद जाळावे ।
सर्वत्रांनीं एकत्र लढावें । परचक्र येतां राष्ट्रावरी ।।१०

प्रस्थापित शासकां द्यावा धीर । परिस्थिती होतां गंभीर ।
नाना योजनांचा आदर । दावावा खरा स्वकृत्यें ।।११

सदा अधिक धान्य पिकवावें । शेतकरी बहुत जमवावे ।
शास्त्रशुद्ध तयांना शिकवावें । राष्ट्रशक्ति कृषि संबोधोनि ।।१२

अनेक अशा ओळी सुशोभित । होत्या फलकांवरी सुबोध देत ।
बहुत आबालवृद्ध होते कुजबुजत । अर्थ तयांचा स्फूर्तीचा ।।१३

कुटिरोद्योग, ग्रामोद्योग, मूलोद्योग। असा मांडिला संयोग ।
तेथें कलात्मकतेचा सुयोग । करी प्रदर्शन चित्तहारी ।।१४

गताध्यायीचे सर्वजन । संपवोनि श्रवण प्रवचन ।
आले पहावया प्रदर्शन । प्रसन्नवदन होवोनिया ।।१५

साधोनी अशा सुसंधीला । एक सेवक पुढें आला ।
सभोंवतींच्या जनसमूहाला । कथूं लागला विनम्र भावें ।।१६

ऐका वदे बांधवजन । थांबा पाहतां प्रदर्शन ।
आणि मेळवा समाधान । माझें कथन ऐकोनी ।।१७

राहिलों होतों सेवकग्रामीं । तेथें लाभली संधी नामी ।
व्हावया खरा भारतप्रेमी । ऐसें सांगतों स्वाभिमानें ।।१८

धन्य तेथली पवित्रता । धन्य तेथील बंधुता ।
तैशी शिकवणुकीची आत्मीयता । राष्ट्रीं आदर्श वाटली ।।१९

तेथें उपजला प्रश्न एकदां । स्वदेशीं नसतां धान्यसंपदा ।
आणि दुष्काळाची दुःखापदा । येतां कैसें वर्तावें ॥२०
उत्तरीं वदला एक महात्मा । जो शोभला सद्धर्मात्मा ।
जयाचा तळमळे अन्तरात्मा । सेवेसाठीं दीनांच्या ॥२१
सांगतों वदला **पूर्वेतिहास** । प्राचीनकाळीं भारतास ।
नव्हतें कमी सुखैश्वर्यास । वेद तेव्हांच जन्मले ॥२२
आर्यसंस्कृति उदया आली । वर्णाश्रमीं कर्तव्यें ठरलीं ।
कर्मभूमि सकलांची बनली । आपुली दिव्य भारतमाता ॥२३
पश्चात् अनेक शतकें वर्षें । धनधान्यवृद्धीच्या हर्षें ।
स्वनृपतिवरांच्या उत्कर्षें । गाजली भारत सुवर्ण-भू ॥२४
भारत-सुवर्ण लुटण्यासाठीं । परचक्रें आलीं मोठीमोठीं ।
आणि अखेर शेवटीं । यवनराज्य पसरलें ॥२५
यवनम्लेंछांनीं धुमाकूळ मांडिला । देशधर्म-संस्कार तोडिला ।
भारत निस्तेज बनविला । दास्यशृंखलेंत छळोनियां ॥२६
अनेक दुष्काळ त्यांत आले । महापूर, अवर्षणहि माजलें ।
असे अनेक अनर्थ कोसळले । आपुल्या मातृभूमीवरी ॥२७
त्यांतही दुर्दैव ओढविलें । पांढरे पाय देशा चिकटले ।
सुवर्ण सर्व लुटलें गेलें । इंग्रजांच्या राज्यांत ॥२८
संस्कृति गेली विलयाला । जनता विस्मरली स्वाभिमानाला ।
आणि इंग्रजांच्या भुलकावणीला । भारतीय बळी जाहले ॥२९
खेडुतांनीं खेडीं सोडिलीं । शेतेंभातें ओस पाडिलीं ।
कामधंद्यालागीं काढिली । आपुली वाट शहरांकडे ॥३०
भारतांत खेडीं सात लक्ष । शेतकरी होते कर्तव्यदक्ष ।
परि शेतीकडे होतां दुर्लक्ष । धान्य दुर्भिक्ष्य ओढवलें ॥३१
लोकसंख्या वाढली अगणित । गेली पस्तीसे कोटींच्या घरांत ।
अन्नधान्याची पंचाईत । तत्कारणें दुर्दैवें ओढवली ॥३२

तदनन्तर झाली स्वराज्यप्राप्ति । चैतन्य आलें, आली शक्ति ।
सरकारें योजिल्या अनेक युक्ति । समृद्धिसाठीं धान्याच्या ॥३३
किंचित् ऐसा इतिहास । कथिला तुम्हां कळण्यास ।
अन्नधान्याच्या दुर्भिक्ष्यास । जो कारण जाहला ॥३४
आतां ऐका प्रसंगों ऐशा । ठेवूनि बाजू सर्व निराशा ।
टळण्यास खाद्य-दुर्दशा । कैचें आचारावें राष्ट्रानें ॥३५
**सरकारें यत्नावें** शेती-उत्पादन । लागवडी आणावी ओसाड जमीन
खेडुतां द्यावें सशास्त्र शिक्षण । विविध धान्य पेरणीचें ॥३६
सरकारें बीं-बियाणें पुरवावीं । अवजारें सुयंत्रें बनवावीं ।
कृपिजनां प्रयच्छावीं । शेतीवाढ करावया ॥३७
शेतीतज्ज्ञ परदेशी आणवावे । तयां दुर्भिक्ष्यज्ञान द्यावें ।
आणि उत्पादन वाढवावें । योग्य सल्ला घेवोनिया ॥ ३८
धान्य आणवावें परदेशांतून । सांठवावें तें कोठारें करून ।
तैसंच अल्पमूल्य योजून । गरजवंतां पुरवावें ॥३९
अन्य माल परदेशीं धाडून । ऐवजीं अन्नधान्य मागवून ।
देवघेवींचा व्यापार योजून । सरकारें धान्य संग्रहावें ॥४०
नभोवाणी, बोलपट, शेतीप्रदर्शनें । व्याख्यानें, प्रवचनें, संमेलनें ।
नाटकें, ललितें, कीर्तनें । येणेंपरी प्रचारावी धान्यवृद्धि ॥४१
शेती-सहकारमंडळें स्थापून । शेतकऱ्यां कर्ज पुरवून ।
सांवत्सरिक योजना आंखून । धान्योत्पादन उत्तेजावें ॥४२
सरकारें माफ करावा शेतसारा । आवरून धरावें मत्त सावकारा ।
खेडुतां देऊनि आसरा निवारा । वर्धावा व्यवसाय शेतीचा ॥४३
विहिरी-तळीं-कालवे खणावे । धरणें-तलावें पाणी अडवावें ।
पडिक भू-प्रदेश भिजवावें । शेतीविकास करण्याला ॥४४
स्थापावे शास्त्रीय खत-कारखाने । घालावीं बाजारपेठीं नियंत्रणें ।
वाढवावी विद्युच्छक्तीचीं ठिकाणे । अधिक धान्य पिकण्याला ॥४५

सरकारें अणुशक्ति निर्मावी । पशुशक्ति, बाष्पशक्ति संवर्धावी ।
शास्त्रप्रणीत उत्पादनीं जोडावी। प्रचीती येण्यास धान्यवृद्धि ॥४६

शेतीविकास जेथ साधला । तेथ कृषिविकास अभ्यासण्याला ।
शिष्यवृत्ति द्याव्या परदेशाटनाला । बुद्धिवंत जिज्ञासूंना ॥४७

पाश्चात्यांचा शेतीविकास । अभ्यासून आणावा स्वदेशास ।
प्रसारून तो खेडचापाडचांस । धान्यवृद्धि प्रयत्नावी ॥४८

कीटक खातीं धान्यशेती । तेणें धान्यनाशा नसे गणती ।
कीटकनाश-रसायन निर्मिती । याकारणें करावी प्रशासकें ॥४९

नानाविध यत्न येणेंपरी । जरी आचरतील अधिकारी ।
तरी कृपा निपजोनी ईश्वरी । धान्य-टंचाई निवळेल ॥५०

इतुके यत्न असावे सरकारचे । आतां ऐका कर्तव्य सुप्रजेचें ।
दिन येतां धान्य दुर्भिक्षाचे । कैचें वर्तावें दुष्काळीं ॥५१

प्रचारावें सरकारी धोरण । सरकार आपुलेंच जाणून ।
भंगूं नये मूल्य-नियंत्रण । धान्य खरेदी करतांना ॥५२

करूं नये काळा बाजार । नियंत्रित ठेवावा रोज आहार ।
ताबा राखूनी जिव्हेवर। त्यागवृत्ती आचरावी ॥५३

न खावें टंचाईचें धान्य। ऐवजीं भक्षावें कडधान्य ।
व्हावया तयाचें पचन । फळें खावीं आम्लयुक्त ॥५४

स्पर्धा नसावी व्यापारांत । धान्य विकावें अति स्वस्त ।
गरिबां देऊनी मोफत । स्वदेश-सेवा साधावी ॥५५

पुढाकार गृहिणींनीं घ्यावा । मिष्टान्न आहार मोडावा ।
स्वयंपाक एकत्र करावा । सामुदायिक पद्धतीनें ॥५६

टंचाई येतां गहूं-तांदळाची । खाद्यें शिजवावीं मका-ज्वारीचीं ।
कमतरता होत जरी याची । भागवावें कडधान्यावरी ॥५७

भाजीपाला फळें खातां । योग्य शक्ति मिळे तत्त्वता ।
वाणते अंगींही निरोगिता । चित्तीं पूर्ण हेंच घ्यावें ॥५८

गरीब खाती झुणकाभाकर । तेणेंही होती ते कणखर ।
ध्यानांत घेतां खरोखर । हव्यास मसावा सर्व धान्यांचा ॥५९
जे जे असतील धनवान । तयांनीं मितव्यय आचरून ।
गरिबां करावें अन्नदान । बचत करोनि धान्याची ६०
सुसंपन्न जे जमीनदार । तयांनीं विश्वासावा कसणार ।
करूनि सारासार विचार । तयां करावें शेतदान ॥६१
शहरवासी जे सुधारक । तयांनीं बनावें दीनबंधु-सेवक ।
वाट धरूनिया तडक । खेड्यांत जावें सेवेला ॥६२
तरुणांनीं श्रमदान करावें । वाहतुकीचे नवमार्ग रचावे ।
सुलभसे अत्यंत करावें । धान्यवाटप खेडुतां ॥६३
सर्वांगीण करावी ग्रामसेवा । शेतकी विद्येवरी भर द्यावा ।
खेडुतां ग्रामोद्योग शिकवावा । शेतकऱ्यांच्या हितालागीं ॥६४
खेड्यास लागे जितुकें धान्य । तेथेंच व्हावें तयाचें उत्पादन ।
ऐशा ध्येया देऊनी प्राधान्य । सर्व खेडुतांनीं प्रयत्नावें ॥६५
जेथें जेथें मिळेल जागा । तेथें लावाव्या फळबागा ।
तयांची राखूनि निगा । भाजीपालाही वाढवावा ॥६६
आठशें दहालक्ष एकरांची । जमीन असतां शेती-लागवडीची ।
तीनशें लक्ष एकर जमिनीची । शेती करिती शेतकरी ॥६७
ऐशी भारतीं शेतीची अवस्था । न त्यामाजी संशोधन-व्यवस्था ।
तेणें होई उत्पादन-अनास्था । दरिद्री होऊनी शेतकरी ॥६८
चीनांत पिके तांदूळ फार । दर एकरीं आठशें शेर ।
तैसा जपानी पंधराशें शेर । यंत्रतंत्राच्या उपयोगें ॥६९
भारतीं तांदूळ असे कसदार । परी एकरीं पिके दीडशें शेर ।
गहूंहि अवघा चारशें शेर । दर एकरीं पिकतसे ॥७०
ऐशी स्थिति मुख्य धान्याची । सदा चणचण उत्पादनाची ।
तरी अन्नधान्योत्पादनाची । दुर्वार्ता नको वर्णाया ॥७१

एकोणीसशें छपन्न सालचें । हें उदाहरण धान्यस्थितीचें ।
तेणें सदोदित दुष्काळाचें । भय वाटतसे भारतांत ।।७२
अनेक अर्पिती देवा धान्य । अन्नकोटें करिती देवार्चन ।
तसेंच घालिती ब्राह्मण-भोजन। धान्यस्थितीच्या काठिण्यांत ।।७३
होण्यास ईश खरा प्रसन्न । गोरगरिबां करावें धान्यदान ।
मितव्ययाचें घेऊनी भोजन । हाच देवधर्म आचरावा ।।७४
सणावारीं करावी धान्यबचत । अल्प धान्य वापरावें भोजनांत ।
मिष्टान्न मानावें फलाहारांत । धान्य न पिकतां स्वदेशीं ।।७५
साप्ताहिक करावें उपोषण । वांचवावें तेणें धान्यशोषण ।
उपोषणें होतें आरोग्यरक्षण । ऐसें तत्त्व जाणोनिया ।। ७६
दोनदां न घेतां धान्य भोजन । एकदांच करावें अन्नभक्षण ।
रात्रीस करावें अन्य जेवण । रताळीं, कन्दमुळें इत्यादींचें ।।७७
मासे, अंडीं यांचें भक्षण । घेऊनी करावें धान्यरक्षण ।
निषिद्ध नसे मांसाहार भोजन । अति दुष्काळ प्रसंगीं ।।७८
असो भोजनालय वा खाणावळ । भाजी, फळें, कंद केवळ ।
शिजवून करावे पदार्थ निव्वळ । सप्ताहाच्या तीन दिनीं ।।७९
सर्वत्रांनीं आचरावा मित आहार। तेणें धान्यबचत होऊनी फार।
भरावें सरकारी धान्य कोठार । उपयोगार्थ अैन प्रसंगीं ।।८०
जेथें असेल धान्यटंचाई । तेथें निश्चित होऊनी महागाई ।
धनिक करिती एकच घाई । धान्य खरेदी करावया ।।८१
तेथें उपजे काळा बाजार । लांचलुचपतीचाहि व्यापार ।
असावा तेथें सरकारी अधिकार । शिक्षा, दण्ड करावया ।।८२
जनतेनें काळेबाजारी पकडावे । तयांना बहिष्कारें-सतवावें ।
आणि त्वरित तुरुंगांत डांबावे । सरकारच्या मदतीनें ।।८३
कडक वर्तावें धान्य-नियंत्रण । भोजनास न द्यावें निमंत्रण ।
धान्यवाटप कायदा उल्लंघन । कदापि होवो देऊं नये ।।८४

लोकशाही राज्यकारभार । असे प्रजाहितदक्ष सरकार ।
याकारणें प्रजेवरी कारभार । घालों नये दुष्काळीं ॥८५
लोकशाही रामराज्यांत । सहकार द्यावा राज्यकार्यांत ।
विशेषें धान्यदुष्काळांत । विसरावे पक्षभेद ॥८६
एकी हेंच शक्तीचें स्मरण । करोनी यत्नावे दुष्काळ-निवारण ।
करोनि मितव्ययाचें नियोजन । धान्य पुरवावें सकलांना ॥८७
आतां अेका प्रमुख गोष्ट । लोकसंख्यावर्धन नसे इष्ट ।
तेणें संकटें येतीं अनिष्ट । अन्नटंचाई सारखी ॥८८
याकारणें करावें कुटुम्बनियोजन। नीट अभ्यासावें संतति-नियमन।
जेणें पुरेल निवास, वस्त्र, अन्न । जीवनमान सुधारण्या ॥८९
अैसे अनेक उपाय असती । जेणें राष्ट्रें उज्ज्वल होतीं ।
आयुरारोग्याची संपती । उपभोगती तेजस्वितेनें ॥९०
कदापि नसावा दुराभिमान । संकुचित वृत्ति द्यावी त्यजून ।
सर्व राष्ट्रें बन्धु जाणून । तयांचा सल्ला सुजाणावा ॥९१
अन्नपरिस्थिति कठीण होतां । कैसें वर्तावे हें तत्त्वता ।
मनोभावें तुम्हां कथिता । मनोवृत्ति उचंबळली ॥९२
अैसें कथिलें मज महात्म्यानें । तें तुम्हा निरूपिलें संक्षेपानें ।
श्रवण केलेंत शांततेनें । यास्तव वदितों आभारें ॥९३
सेवाग्रामीच्या सेवकानें । लववूनि मस्तक नम्रतेनें ।
श्रोतियां वन्दूनि करद्वयानें । आत्मकथन संपूर्ण केलें ॥९४
नाना व्यसनांच्या आपत्तींत । कैसें वर्तावें जीवनांत ।
प्रश्न होता गताध्यायांत । खादी वेषधारी तरुणाचा ॥९५
हाही होता तरुण उपस्थित । सद्भावें वक्तव्य ऐकत ।
सकल श्रोत्यांच्या समवेत । सेवाग्रामीच्या सेवकाचें ॥९६
ऐकोनिया हें अल्प प्रवचन । तया लाभलें अधिक ज्ञान ।
तेणें त्या उपजलें समाधान । न लगे सांगणे प्रबुद्ध वाचकां ॥९७

मीही उपस्थित श्रोतियांत । तल्लीन होतों प्रवचनात ।
निश्चलें राहणें आचार्याश्रमांत । आणिक तत्त्वें ऐकावया ॥९८

नंतर [illegible] देखिलें प्रदर्शनास । अभ्यासिलें अगणित प्रात्यक्षिकांस ॥
जेणें [illegible]गास परमविकास । होता निश्चत भारताचा ॥९९

ऐसें सुवि।कास तत्त्व-विवरण । करील समाधान वाचकजन ।
कारणें या ग्रंथाचें वाचन । संपूर्ण करावें श्रद्धेनें ॥१००

सत्य, शांति, समाधानांत । राष्ट्रें नांदावीं जगतांत ।
विश्वबन्धुत्वाच्या महातत्त्वांत । रामराज्य होवो भारताचें ॥१०१

ऐसा या भारतदीप ग्रंथाचा । सेवाग्राम-सेवक-संदेशाचा ।
दुष्काळनिवारण तत्त्वाचा । तिसरा अध्याय पूर्ण हा ॥१०२

# अध्याय चौथा

## आर्यसंस्कृतिमहिमा-संकलन

ॐ श्री गणेशाय नमः ।

जय गजानना शान्त निरंजना । जय भक्त-संकट-विमोचना ।
सकामासी पुरविसी कामना । कारणें तुज भजतों मी ॥१

आतां प्रार्थना गजवदना । पुरवी अंतरीची वासना ।
आर्यसंस्कृति महिमासंकलना । सिद्ध ज्ञान द्यावें मज ॥२

या नरदेहाच्या जीवनांत । आरोग्य सुदृढ होतां प्राप्त ।
मनुज होतसे विद्यावन्त । जीवनबोध शिकावया ॥३

याकारणें ग्रंथाच्या प्रारंभास । लिहूनी दोन अध्यायास ।
निरूपिलें इष्टानिष्ट आहारास । जेणें आयुरारोग्य लाभतसे ॥४
आचरतां हें विवरण । लाभे तेज दीर्घायु पूर्ण ।
संपूर्ण होतां ग्रंथवाचन । 'जयभारत' भूमंडळीं गर्जलि ॥५
आर्यसंस्कृति जाणती थोर । भारतीय संस्कृतीचा अलंकार ।
देतसे संस्कृत सन्देशवर । 'कृण्वन्तु विश्वमार्यमिति' ॥६
म्हणोनि ऐका वाचकजन । करोनि प्रसन्न शान्त मन ।
करितों तुम्हांस महान कथन । राष्ट्रसेवा आश्रमीचें ॥७
आश्रमाच्या गिरि-विभागांत । तृणाच्छादित पटांगणांत ।
विद्यार्थी शिष्य होते गात । गीत 'वन्दे मातरम्' ॥८
समय होता प्रभात काळचा । श्रीरामप्रभू नामस्मरणाचा ।
तैसाच सूर्योपासनेचा । अत्यंतसा स्फूर्तिप्रद ॥९
झालें गीत, झाली प्रार्थना । सूर्यनमस्कारें सूर्योपासना ।
सकळांच्या दुमदुमल्या घोषणा । भारत हमारा देश है ॥१०
पश्चात् दिनारंभीचा कार्यक्रम । सुरू जाहला पवित्र उपक्रम ।
देशोद्धारक मनोरम । आश्रमीं ज्ञानदानाचा ॥११
गुरूजी होते आर्योपासक । शिष्य जिज्ञासू धार्मिक ।
तैसेच श्रद्धाळू सुसंस्कृतिपूजक । ऐसा थाट आश्रमाचा ॥१२
आज्ञा होतांच निबंधवाचन । करूं लागला शिष्य नम्र होऊन ।
आर्यसंस्कृति-समालोचन । विषय होता वाचनाचा ॥१३
जगताच्या उत्पत्तिपासून । **आर्यसंस्कृति इतिहास** लक्षण ।
तैसेंच विकास-विवरण । केलें वाचनीं शिष्यानें ॥१४
तें वाचकां आदरें समर्पण । केलें म्यां संक्षिप्त करून ।
करोनिया श्रद्धाळू अन्तःकरण । आतां येथें वाचावें १५
अ-उ-म अक्षरें तीन । करिती ॐकार संपूर्ण ।
येथ मानिलें जन्मस्थान । उत्पत्ति-स्थिति-विलयाचें ॥१६

ब्रह्मा तो अकार । विष्णु हा अुकार ।
महेश हा मकार । वदती तुकोबा ।।१७
ब्रह्मदेव करी निर्माण । विष्णु करीतसे पालन ।
महेश आणितो मरण । चराचरांच्या जगताला ।। १८
स्वमुखें ॐ उच्चारित । ब्रह्मदेव ब्रह्मांड निर्मित ।
अनंत अवकाशीं प्रस्थापित । केला प्रचंड अग्निदेव ।।१९
अग्निदेव हा सूर्यनारायण । ऐसें मानिती शास्त्रपरायण ।
तेजाचा हा पंचप्राण । कोटयवधी वर्षें तळपला ।।२०
अनंत काळ गेला निघून । तळपला–तडकला अग्निनारायण ।
आकाशांत उडाले अनंत कण । अणुरेणूंच्या प्रखर प्रभावें ।।२१
पंचमहाभूतें तेणें निर्मिलीं । ग्रहमालिका जन्मा आली ।
त्यांमाजीं पृथ्वी जन्म पावली । श्रीभास्कराच्या स्वतेजानें ।।२२
प्रथमारंभींच्या अवस्थेंत । भूखण्ड जल द्विविभागांत ।
एकास तीन या प्रमाणांत । पृथ्वी गेली विभागली ।।२३
झालें पंचमहाभूतांचें संघर्षण । जळीं निर्मिले **पेशीप्राण** ।
ऐसें सजीवतेचें लक्षण । सूक्ष्मरूपें प्रकटलें ।।२४
लक्षावधी वर्षें लोटलीं । सजीवता जगतीं आली ।
पेशीपेशी वाढू लागली । जीवन-विकास होण्याला ।।२५
प्राणी जन्मला एका पेशीनें । वनस्पती झाली दुजा पेशीनें ।
तत् पश्चात् क्रमाक्रमानें । वाढ झाली तयाची ।।२६
प्राणी पेशी मत्स्य जन्माला । तद्विकासें कूर्म झाला ।
कूर्म वाढता वराह बनला । इंद्रियांच्या उपयोगें ।।२७
जाणा ऐशा स्थित्यंतराला । वराहांतून नृसिंह वर्धला ।
नृसिंहें विकासीं वामन दिधला । भूमंडळीं पूर्ण मानव ।।२८
बालमूर्ति वामना नंतर । झाला विकास परशुरामनर ।
पश्चात् रामकृष्णावतार । आले जगता उद्धारा ।।२९

पुनश्च लोटलें कालांतर । झाला जगतीं बुद्धावतार ।
सत्य-अहिंसा-सागर । बौद्धधर्म संस्थापक ॥३०

कालांतरें होता भकास संक्रमण । झालें कलंकी अवतार जनन ।
कलह कोलाहल भांडण । ऐशा कलियुगीं चालतसे ॥३१

ऐसी **कथा दशावताराची** । दावी मानवजीवन विकासाची ।
मत्स्यापासून मानवाची । उत्क्रान्ति कैची जाहली ॥३२

ऐसा दशावतार इतिहास । संमत असें वैदिक शास्त्रांस ।
**पाश्चात्य संशोधक** पंडितांस । मान्य असतीं अन्य मतें ॥३३

तयांच्या इतिहास-संशोधनांतीं । तीस सहस्र वर्षे पुरतीं ।
लोटलीं जेधवां मानवाकृति । पूर्ण विकसित जाहली ॥३४

युरोपखंडीं स्पेन देशांत । मूळ मानव ऐसा निर्मित ।
झाला ऐसें संशोधनांत । शोधिलें पाश्चात्य पंडितांनीं ॥३५

ऐका ऐशा पूर्वकाळांत । होता मानव पाषाण वापरीत ।
स्वबुद्धयाही होता बनवीत । नाना वस्तु पाषाणाच्या ॥३६

पाषाणयुग ऐसें प्रारंभिलें । लोहयुग, ताम्रयुग पश्चात् आलें ।
मानवप्राणी असंख्य पसरले । चारी दिशांप्रती जगताच्या ॥३७

चालू असतां ऐसें संचलन । या देशींच्या वायव्य खिडींतून ।
झालें आर्यांचें आगमन । सिंधु नदीच्या तीराला ॥ ३८

वर्षें झालीं सहस्र चार । जेधवा पाहूनी प्रदेश सुन्दर ।
आर्य लावुनी नांगर । शेती लागले करावया ॥३९

'अर्' शब्द मूळ संस्कृत । 'नांगरणें' मराठी अर्थ देत ।
तयांचा 'आर्य' शब्द बनवीत । आर्य नामें राहिलें ॥४०

तयांची मायबोली संस्कृत । पवित्र आचरण आचरित ।
इहपरलोकीं सुगति प्रार्थित । आर्य पूजिति इन्द्रदेव ॥४१

तयांनीं राज्यें वसविलीं । स्वराज्यें नृपसत्ता नियंत्रिली ।
समाजरचना थोर केली । स्त्रीपुरुष समता आचरुनी ॥४२

आर्य जीवनाची समतोलता । पंचमहाभूतीं भक्तिलीनता ।
तयांची विद्या कला-कल्पकता । असे वर्णिली ऋग्वेदांत ।।४३

पुढती होतां संस्कृति-संक्रमण । तयांचा गाजला पराक्रमगुण ।
तयांचें झालें पुढें आक्रमण । गंगायमुना-तीर देशीं ।।४४

यमुनातटाकीं आर्यजीवन । धन्य तयांचें समाज-विकसन ।
तेथ चाले धर्मग्रंथपारायण । रक्षावया वेदविद्या ।।४५

धन्य गोपालनाचें महत्कार्य । स्त्रीपुरुषांचें साहचर्य ।
तेणें कौटुम्बिक सुस्थैर्य । अत्यन्त आलें यमुनातीरीं ।।४६

बनविलीं तेथें रणक्षेत्रें । सुसज्ज केलीं अन्नछत्रें ।
शोभलीं औदार्याचीं नक्षत्रें । तेजाळण्या यमुनातीर ।।४७

हिमालय पर्वतराज अतिश्रेष्ठ । जेथ भेदभाव होती नष्ट ।
ऐसा सुशोभितो पिता इष्ट । गंगायमुना सरितांचा ।।४८

ऐशा नगाधिराजाच्या गंगोत्रींत । श्रीगंगानदीचा जन्म होत ।
कारणें गंगातीर प्रदेशांत । परम पावित्र्य नांदतें ।।४९

जणूं स्वर्गीची अमृतधारा । येऊनी भूतलीं आर्योद्धारा ।
दे समृद्धीच्या पूर्णावतारा । गंगा नाम घेऊनिया ।।५०

आर्यांनीं स्थापिलीं नगरें । तयांनीं उभारिलीं मन्दिरें ।
स्वकष्टाच्या कलाविस्तारें । गंगातीरीं संस्कृतिमय ।।५१

केंद्रें स्थापिलीं परम धार्मिक । आश्रम स्थापिले विद्यावर्धक ।
ऐशी स्थापिलीं जीवनोद्धारक । आर्यसंस्कृति गंगातीरीं ।।५२

गंगातीरीं वेद निर्मिले । महाभारत, रामायण रचिलें ।
व्यासोच्छिष्ट जगत् केलें । स्वज्ञानकोशें श्रीव्यासांनीं ।।५३

जें असे वेदांत लिहिलें । तैसें महाभारतीं वर्णिलें ।
तेणें भूतभविष्य वर्तविलें । अंतर्ज्ञानी ऋषिवर्यांनीं ।।५४

'विद्' धातु संस्कृतांत । 'जाणणें' अर्थ मराठींत ।
तयांच्याच रूपांतरांत । **वेद** शब्द जन्मला ।। ५५

विद् म्हणजे अर्थ जाणणें । याचा अर्थ विद्या येणें ।
विद्याधरास विद्वान म्हणणें । याकारणें सयुक्तिक ॥५६

वेदा नसे आदि रूप । वेदास नाहीं अन्त्य स्वरूप ।
ऐसें अतर्क्य अजोड अमाप । सनातन सत्य वेद ग्रंथ ॥५७

वेद म्हणजे ब्रह्मविद्या । वेद असती अध्यात्मविद्या ।
वेद खलु परमार्थविद्या । वेदोऽखिलो धर्ममूलम् ॥५८

सकल आर्यसंस्कृतीचें सार । संगीत-कला-शास्त्रसंभार ।
सशास्त्र वैद्यक ज्ञानसागर । ऐसे असती चतुर्वेद ॥५९

वेदांत ग्रंथिलें राज्यशास्त्र । वेदांत लिहिलें अर्थशास्त्र ।
वेदांत व्यापिलें सदाचारशास्त्र । ऐसे वेद सर्वव्यापक ॥६०

सशास्त्र विद्येचें विवरण । विश्व खगोल-शास्त्राचें विवेचन ।
हिन्दु धर्माचें उत्पत्तिस्थान । अपौरुषेय वदती वेदग्रंथ ॥६१

महाभारत महिमा अपरंपार । ऐसें महाकाव्य न झालें न होणार।
जेथें विश्वरचना झाली साकार। जाणा रत्नालंकार भारताचा ॥६२

महाभारताच्या कथा-प्रसंगांत । होता नृपवर नामें भरत ।
तयाच्या धन्य रम्य राज्यांत । **भारत** नाम उपजलें ॥६३

जें उपजलें तें प्रसिद्धलें । स्वगुणें नवनाम विराजलें ।
आर्यावर्ता भारत लाभलें । नाम जगतीं सोज्ज्वळ ॥६४

महाभारताच्या युद्ध-प्रसंगांत । घडला संवाद श्रीकृष्णार्जुनांत ।
**भगवद्गीता** नामें सुख्यात । जगतीं अपूर्व गर्जतसे ॥६५

युद्धास ठाकले आप्तजन । तया कैचें करूं मी हनन ।
म्हणूनि दूर टाकतो धनुष्यबाण । वदे अर्जुन श्रीकृष्णा ॥६६

भाऊबंदा मारूनि राज्यपद । जिंकण्या वाटे मनीं खेद ।
कारणें युद्धप्रसंगीं विषाद । वाटे वदला अर्जुन ॥६७

भगवन्तानें तया उपदेशिलें । घोर समयीं कर्तव्य निरूपिलें ।
निष्काम कर्मयोगा समजाविलें। भ्रमनिरसनार्थ अर्जुनाच्या ॥६८

तेणें पार्था उमजलें परमज्ञान । तेणें देखिलें विश्वरूपदर्शन ।
तेजाळुनी परमार्थ मोक्षसाधन । संतोषला धनुर्धारी ।।६९
तयाच्या पराक्रमें अतुल । राज्यप्राप्ति होऊनी अचल ।
पांडवां लाभलें अपूर्व फल । पराभूत होऊनी कौरव ।।७०
ऐसी कथा, ऐसें तत्त्वज्ञान । वेदोपनिषदांचें संकलन ।
देतसे आजहि शांति-समाधान । कारणें गीता हृदयीं वसो ।।७१
गीता हिंदूंचा धर्मग्रंथ । श्लोक सातशें वाचतां संथ ।
सांपडे सुखी जीवनाचा पंथ । कलियुगींच्या कोलाहलांत ।।७२
गीताग्रंथाचें महत्त्वमापन । जगतीं करिती थोर विद्वान् ।
तेथ मी अज्ञ अजाण । गीता-महिमा वर्णूं कैचा ।।७३
तीन सहस्र अधिक शंभर । इतुकें वर्षांचें कालांतर ।
होऊनी गेलें जेधवा भयंकर । युद्ध गाजलें गीतान्तरीचें ।।७४
आर्यजीवनक्रम तत्कालीन । जीवनाचे चार भाग कल्पून ।
होता **चार आश्रमीं** विभागून । आयुष्यीं साधण्या परमार्थ ।।७५
ब्रह्मचर्याश्रमीं अध्ययन । गृहस्थाश्रमीं द्रव्यार्जन ।
वानप्रस्थाश्रमीं समाजहितरक्षण । ईशचिंतन संन्यासाश्रमीं ।।७६
ऐशा जीवनाच्या विभाजनीं । विविध विकास केला आर्यांनीं ।
अनेक विद्वान-विदुषींनीं । सर्वोच्च नेलीं थोर तत्त्वें ।।७७
श्रमविभागतत्त्व अनुसरून । चातुर्वर्णीं समाज विभागून ।
आदर्श केलें समाजजीवन । तत्कालीन आर्यांनीं ।।७८
क्षत्रिय करीत राष्ट्रसंरक्षण । ब्राह्मण आचरीत धर्मरक्षण ।
वैश्य करीत शेतीउत्पादन । शूद्रें धरिली सेवावृत्ती ।।७९
श्रमविभाग तत्त्वांच्या अनुरोधांत । तैसाच गुणकर्मांच्या कसोटींत ।
समाज होता तेजस्वितेंत । समाजोन्नति साधोनिया ।।८०
सृष्टिदेवतांचें पूजन । यज्ञयागमंत्रांचें घोषण ।
काया-वाक्-बुद्धीचें वर्तन । होता आचारधर्म या काळीं ।।८१

इंद्रप्रस्थनगरीचें धर्मराज्य । अयोध्येचें परमोच्च रामराज्य ।
तैसेंच ऋषिमुनींचें सामर्थ्यकार्य । दर्शवी सुसंस्कृति आर्यांची ॥८२

अनार्यांसी बनविलें आर्य । निर्दाळिलें असुरी क्रौर्य ।
राज्यविस्ताराचें महत्कार्य । आर्यांनीं आचरिलें या काळीं ॥८३

काळगति पुढें चालली । कर्मकृत्यीं भ्रष्टता आली ।
हिंसक वृत्ती तैशी वाढली । यज्ञकर्मींच्या बलिदानें ॥८४

आंग्ल सनाच्या पूर्वकाळांत । पांचशेंत्रेसष्ट या संवत्सरांत ।
नेपालप्रांतीं कपिलवस्तु नगरींत । नंतर **गौतम** जन्मला ॥८५

जीवनाची दशा हीन । तयानें घेतली अवलोकून ।
मिळण्यास शांतिसमाधान । तयानें त्यजिलें राज्यपद ॥८६

घोर अरण्यांत तपाचरण । करुनी, तयास दिव्यज्ञान ।
प्राप्त होऊन, बौद्धधर्म स्थापन । गौतमें केला लोकहितार्थ ॥८७

प्रेम, दया, अहिंसाचरण । या त्रिगुणीं मिळवावें समाधान ।
तेणें प्राप्त होई निर्वाण । ऐसा संदेश बुद्धाचा ॥८८

ऐशा पवित्र संदेशानुसार । बौद्ध धर्माचा झाला प्रसार ।
भारत-आशिया खंडभर । राजाश्रय तया मिळूनिया ॥८९

पश्चात् किंचित् कालांतर । जातां आला **वर्धमान महावीर** ।
सम्यक् दृष्टिज्ञान आचार । यांची महती सांगावया ॥९०

याच उच्च तत्त्वानुसार । देऊनि स्वार्थत्यागावरी भर ।
मानुनि आत्मविकास ईश्वर । तयानें जैन धर्म स्थापिला ॥९१

जगतीं सर्वश्रेष्ठ सात्त्विक । धर्मनिष्ठ सम्राट् अशोक ।
झाला बौद्धधर्म-प्रसारक । स्वीकारूनि बौद्धधर्म ॥ ९२

व्हावया बौद्ध-नीतीचा उल्लेख । शिलालेख, स्तंभालेख, गृहालेख ।
कोरूनि ठेविले तयानें अनेक । चार दिशांप्रति भारतीं ॥९३

बुद्ध धर्माचा होण्या प्रसार । उभारले स्तूप, विहार ।
कौशल्यें कोरूनी डोंगर । धर्मप्रचार केंद्रें बनविलीं ॥९४

खिस्ताब्दापूर्वी शतकें दोन । अजंठा लेणीं काढलीं कोरून ।
आजही तें कौशल्य पाहून । सारें जग स्तंभित ॥९५
पांच शतकें खिस्ताब्दानंतर । वेरूळ, सारनाथ लेणीं मनोहर ।
खोदूनि दाविली कलाकुसर । भारतीय सूक्ष्मखननाची ॥९६
बौद्ध, जैन वाङ्मय-ग्रंथांत । पंचशील तत्त्वें महाख्यात ।
देत व्यक्तिस्वातंत्र्य जगतांत । प्रसिद्ध पावलीं देशोदेशीं ॥९७
अनेक राष्ट्रें धुरंधर । आजहि तयांचा पुरस्कार ।
करुनि गर्जती जयजयकार । सुखशांतीच्या जगताचा ॥९८
विद्यापीठ नालंदा सुप्रसिद्ध । होतें बौद्धविद्याकेंद्र प्रसिद्ध ।
नाना देशचे शिष्य प्रबुद्ध । होण्यालागीं तेथें येती ॥९९
कालचक्र पुढें फिरलें । बौद्धांमाजीं तंटे माजले ।
बौद्ध सुतत्त्वें विस्मरले । दुर्दैवें बौद्ध धर्माच्या ॥१००
आर्यसंस्कृतीचा वैदिक धर्म । जयाचें नांव हिंदुधर्म ।
तयानें जाणिलें मर्म । बौद्ध धर्माच्या अवनतीचें ॥१०१
पुनश्च व्हावया पुनरुज्जीवन । हिंदुधर्मानें केलें निरीक्षण ।
अहिंसा, दया, सद्वर्तन । स्वीकारिलें स्वधर्मीं ॥१०२
कुमारिलभट्ट परमआर्य । तैसेच आद्य शंकराचार्य ।
द्वयांनीं केलें अतुल कार्य । हिंदुधर्माच्या रक्षणाचें ॥१०३
हिंदुधर्म विस्तृत मनोहर । वेदप्रामाण्य पायावर ।
भागवतधर्म प्रचारावर । शंकराचार्यें प्रस्थापिला ॥१०४
ठेवा ध्यानीं आंग्लसनानंतर । आठशेंवीस वर्षें कालांतर ।
जेधवा घडलें हें मन्वंतर । भारतीय हिंदुधर्माचें ॥१०५
सुविचारें सत्य वदावें । सद्धर्म जगीं वर्तावें ।
स्वराष्ट्रसेवेंत घालवावें । आयु, सांगे हिंदुधर्म ॥१०६
मातापितरां आदरावें । गुरु, आचार्यां नम्र व्हावें ।
अहिंसा व्रत आचरावें । सांगतो तत्त्वें हिंदुधर्म ॥१०७

११९५३

निष्कामकर्म न सोडावें । साधुसंतां लीन व्हावें ।
जगन्नियंत्यास पूजावें । ऐसें सांगे हिंदुधर्म ॥१०८

परधर्मीं द्वेष नसावा । शत्रूही आपुला करावा ।
प्रेमभावें जीव नटवावा । ऐसें तत्त्व हिंदुधर्मीं ॥१०९

परस्त्री जाणोन मातेसमान । स्त्री-जातीस द्यावें संरक्षण ।
हेंच सत्य लक्ष्मीपूजन । ऐसें गर्जतो हिंदुधर्म ॥११०

कदापि न करावें मद्यसेवन । तेणें होतसे शीलधन-हरण ।
मद्यप्राशनें ये मरण । ऐसें सांगे हिंदुधर्म ॥१११

स्वकष्टाचें अन्न खावें । दुरितांचें तिमिर घालवावें ।
आत्मबोधें ब्रह्मपद मेळवावें । ऐशीं तत्त्वें हिंदुधर्माचीं ॥११२

ऐशा हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन । जाणा आर्यसंस्कृतीस उच्चासन ।
लाभे तेणें शांति-समाधान । स्वतंत्र भारत राष्ट्राला ॥११३

पुढती घडलें कालांतर । भारतीं आले नृपति शूर ।
क्षात्रतेज तळपुनी प्रखर । अति राज्यविस्तार जाहला ॥११४

समुद्रगुप्त, चंद्रगुप्त नृपवर । द्वयांनीं वाढविला राज्यविस्तार ।
संस्कृत वेदविद्या-प्रसार । तयांनीं केला स्वाभिमानें ॥११५

ऐशा भारताच्या सुवर्णयुगांत । कवि, नाट्याचार्यांच्या उदयांत ।
धनधान्यसंपदा वैभवांत । आर्यसंस्कृती दुमदुमली ॥११६

कविगुरु कालिदास नाट्याचार्य । वराहमिहिर ज्ञान-कोशाचार्य ।
तैसे ब्रह्मपुत्र गणिताचार्य । याच काळीं तेजाळले ॥११७

अमरसिंह अमरकोशकार । आर्यभट्ट ज्योतिषग्रंथकार ।
धन्वन्तरी वैद्यकशास्त्रकार । या सुवर्णयुगीं तळपले ॥११८

परदेशीं वाढला व्यापार । वाढले सुसंस्कृत शिष्टाचार ।
भारतीय संस्कृतीचा जयजयकार । बाह्य जगतींही दुमदुमला ॥११९

आंग्लसनाचीं प्रथम सहस्रवर्षें । ऐशी प्रगति झाली हर्षें ।
भारतवासींच्या उत्कर्षें । जयभारत झालें जगतांत ॥१२०

आंग्लवर्ष बाराशें उदेलें । भारताचें सुदैव संपुष्टलें ।
यवनराज्य सुरू जाहलें । सुलतानशाही अंमलाचें ॥१२१

भारतीय संस्कृति तुटली । मंदिरें, राउळें फुटलीं ।
हीन दशा देशीं अंधारली । तयांच्या जुलुमी राज्यांत ॥१२२

होतें कांहींचें थोर मन । ऐसे अकबर, शहाजहान ।
तयांनीं दिलें उत्तेजन । भारतीय कलाकुसरीला ॥१२३

बांधुनी ताजमहाल शहाजहान । करण्यास अमरप्रीति-अधिष्ठान ।
जगतीं झाला शहा महान् । भोक्ता कलाकौशल्याचा ॥१२४

जगतीं या आश्चर्यें सात । तयांत ताज अति ख्यात ।
असे आजही सर्व जगांत । अजिंक्य हीच कलाकृति ॥१२५

ऐसी प्रगति होती तरी । अधोगति अत्याचार बळजोरी ।
यांनीं मात केली संस्कृतीवरी । मदांध यवनी राज्यांत ॥१२६

सर्वत्र पसरलें असमाधान । हरपलें सारें उज्ज्वल जीवन ।
आलें दारिद्र्य, गेलें धन । बजबजपुरीच्या अमदानींत ॥१२७

ऐशा दुर्दैवी अंधःकारांत । स्वातंत्र्यरवि उदेला महाराष्ट्रांत ।
मराठे वीरां स्फूर्ति देत । श्रीशिवाईच्या कृपाप्रसादें ॥१२८

सोळाशें तीस आंग्लसनांत । जन्मला वीर भोसले कुळांत ।
जयानें आर्यसंस्कृति-रक्षणांत । आयु वेंचिलें आपुलें ॥१२९

मराठा तितुका मेळवुनी । तयांची सेना बनवुनी ।
महाराष्ट्र टाकला हलवुनी । ऐसा जाणा वीर शिव ॥१३०

जागोजागीं लढा देऊनी । स्वपराक्रमें टाकलें सतावुनी ।
गनिमी कावा यवनां दावुनी । ऐसा जाणा हा शिवभपति ॥१३१

श्रीसमर्थें जया उपदेशिलें । महाराष्ट्र धर्मास स्थापन केलें ।
गोब्राह्मणही प्रतिपाळिले । धन्य शिवाजी राजा ऐसा ॥१३२

अनेक किल्ले, गड जिंकुनी । हरहर महादेव गर्जना करुनी ।
भगवा झेंडा उंच फडकावुनी । स्वराज्य स्थापिलें शिवबानें ॥१३३

नवभारताची झाली निर्मिती । महाराष्ट्रें तेजाळली आर्यसंस्कृती ।
झाली अलौकिकत्वाची प्राप्ती । श्रीशिवाजी नृपवराला ॥१३४

राष्ट्रपुरुष, युग-प्रवर्तक । संतपूजक दीनोद्धारक ।
आर्य हिंदुस्वराज्य-स्थापक । प्रणाम ऐशा शिवप्रभूला ॥१३५

एकनाथ, नामदेव, ज्ञानेश्वर । यांनीं रचिला निरंतर ।
भागवतधर्म भक्तिपर । भगवद्भक्त तारावया ॥१३६

वेदश्रुतींचें सर्व सार । काढिलें ऐसे संत थोर ।
तुकोबा, चोखोबा, गोरा कुंभार । ऐसे झाले याच काळीं ॥१३७

सांवता, रोहिदास, नरहरी । जातीनें शूद्र होते जरी ।
तयांनीं भेटविला श्रीहरी । स्वमायबोलींत भक्तांना ॥१३८

श्रीशिवबाच्या मृत्यूनंतर । पडलें थोडें कालांतर ।
पेशव्यांनीं केला राज्यविस्तार । पश्चात् अधिपति होऊनिया ॥१३९

पेशवा राघोबा अतिशूर । तयानें भगवा ध्वज अटकेपार ।
फडकविला गाजवूनि समशेर । शह देउनी दिल्लीश्वरा ॥१४०

काळ जातां पुढें पुढें । पेशवाईस पडले दुहीचे तडे ।
भक्षूं लागले स्वार्थाचे किडे । स्वराज्य आर्य हिंदूंचें ॥१४१

पाश्चात्य आंग्ल होते प्रबळ । झालेले भारतीं ठोकुनी तळ ।
तयांनीं साधिला वैराचा काळ । हल्ला करूनी संघटित ॥१४२

अठराशें सतरा सतरा, नवेंबर । दिन पातला महाराष्ट्रावर ।
आणि दुर्दैवी पेशवे-राज्यावर । कुऱ्हाड कोसळली पराभवाची १४३

दुर्दैवी पराभूत पुण्यनगरावर । निशाण लागलें आंग्ल निरंतर ।
गर्जूं लागला दडपशाही वार । बुडाली सारी आर्यसंस्कृती ॥१४४

परकी सत्तेच्या अंमलाखालीं । भरडला भारत दुर्दशा आली ।
राष्ट्रनिष्ठेस प्रजा विसरली । इंग्रजांच्या जुलुमांत ॥१४५

सर्वत्र पसरलें असमाधान । नाद उमटला 'त्राहि भगवान्' ।
सुटण्यालागीं मगरमिठींतून । धूर्त आंग्लसत्तेच्या ॥१४६

पाहुनी आंग्लांची अेकता । उद्योगप्रियता, संशोधकता ।
सुचला सुविचार भारता । क्रांति करावी म्हणूनिया ॥१४७
बंगाल्यांत **सुभाष** क्रांतिशूर । अलाहाबादेंत नेहरू मुत्सद्दी थोर ।
काठेवाडीं **गांधीजी अहिंसासागर** । ऐसे भारतदीप तळपले ॥१४८
महाराष्ट्रांत **टिळक** राष्ट्रवीर । **गोखले, आगरकर, चिपळूणकर** ।
तैसे स्वातंत्र्यदीप **सावरकर** । भारतोद्धारार्थ जन्मले ॥१४९
ऐसे पूर्व, पश्चिम, दक्षिणोत्तरीं । देशभक्त संघटिले देशांतरीं ।
स्वातंत्र्यज्योत तेवुनी अंतरीं । झटले **स्वराज्यार्थ** हिंदच्या ॥१५०
सत्य-अहिंसा घेऊनी रक्षण । कायदेभंगाचें आखुनी धोरण ।
आंग्लसत्तेपुढें प्राणार्पण । केलें कितीक वीरांनीं ॥१५१
सत्याग्रह्यांनीं भरले तुरुंग । ब्रिटिश सत्तेस लाविला सुरुंग ।
आंग्लांसि संबोधुनि उपटसुंभ । 'चले जाव' फर्माविलें ॥१५२
एकोणीस शतकें सत्तेचाळीस सन । पंधरा ऑगस्टला सुशोभिला सण ।
दिल्लीस फडकले भारतीय निशाण । **स्वातंत्र्यप्राप्ति** होऊनिया ॥१५३
आलें भारता पुनरुज्जीवन । प्रजेचें राज्य, प्रजेचें नियंत्रण ।
ऐशी लोकशाही होउनी स्थापन । नवयुग सुरू जाहलें ॥१५४
होण्यास सुयुग सर्वांगीण । सरकारें आंखल्या योजना नवीन ।
आर्यसंस्कृतीलाहि उत्तेजन । तयाकारणें मिळतसे ॥१५५
देववाणी संस्कृतास सन्मान । मिळण्या होतसें वेदांचें पठण ।
सत्य-अहिंसा सदाचरण । उपदेशिती राष्ट्राध्यक्ष ॥१५६
पंचशील तत्त्वांचें पालन । हेंच ब्रीद, हेंच संरक्षण ।
ऐसें आर्यसंस्कृतीचें वाण । सुदैवें भारता मिळतसे ॥१५७
अशोकचक्र हें बोधचिन्ह । शासकांचे शोभे प्राण ।
देतसे सुगतीचें सुदर्शन । आत्मोन्नति मिळण्या हिंदला ॥१५८
द्वेवाधर्मांचें सुपालन । न कुणाचा द्वेप, कुणाचें असमाधान ॥
सर्व राष्ट्रें स्वबन्धुसमान । ऐशी भारती सुसंस्कृति ॥१५९

चाले अखंड शास्त्रसंशोधन । तेणें सर्वापदांचें निवारण ।
जातिभेद, पंथांचें एकीकरण । हेंच सैन्यबल भारताचें ॥१६०

जनगणमन राष्ट्रगीतस्तवन । तिरंगी झेंडा सर्वसमाधान ।
अनेक भूषविती पद्मश्री विशेषण । जयभारत होण्या जगतांत॥१६१

आर्यसंस्कृतीस मिळण्या अमरस्थान। भारता लाभो दैवी वरदान।
प्रार्थू मातृभूचरण वंदून । कृण्वन्तु विश्वमार्यमिति ॥१६२

इतुकें होतां स्वयंस्फूर्त वाचन । परम ब्रह्मानंदीं टाळी लागून ।
शिष्याचें भान हरपून । तयाचेनी बोलवेना ॥१६३

तयाची तल्लीनता पाहून । टाळ्यांचा गजर वाजवून ।
श्रोतियांनीं प्रसन्नता दर्शवून । अभिनन्दन केलें तयाचें ॥१६४

आतां ऐका वाचकजन । ऐसें आर्यसंस्कृति-इतिहास-लक्षण ।
आचरुनिया अति संक्षिप्तपण । कथियेलें राष्ट्रभक्तीकारणें ॥१६५

पुढती वाचा ग्रंथव्याप्ती । होवो तुम्हांस ईश्वरप्राप्ती ।
ईश्वरप्राप्ती जाणा स्वदेशप्रीति । सद्ब्रह्मप्राप्ती तेथ असे ॥१६६

इति श्रीभारतदीप ग्रंथाचा। राष्ट्रोत्कर्ष आश्रमीं निबंधवाचनाचा ।
आर्यसंस्कृतिमहिमा-संकलन नामाचा ।चतुर्थ अध्याय संपूर्ण ॥१६७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........

# अध्याय पांचवा

# भारतीय महोत्सव-महिमा

ॐ श्रीगणेशाय नमः ।

जेथ तव नामसंकीर्तन । तेथ कैचें जन्ममरण ।
तिन्ही कळिकाळांस जिंकून । परमशांती मिळतसे ॥१

दुर्बुद्धि जळावया निश्चित । तुझ्या भजनीं व्हावें रत ।
तसेचि होवोनि आसक्त । राष्ट्रसेवा आचरावी ॥२

**राष्ट्रभांडारीचें तत्त्वधन** । द्यावया वाचकां घेई मन ।
म्हणोनि लागतां तव ध्यान । यशःप्राप्ती मज द्यावी ॥३

राष्ट्राचें सांस्कृतिक सुवर्णधन । असे सांठविलें उत्सवीं पूर्ण ।
कारणें नाना महोत्सव सण । स्वाभिमानें करावे साजरे ॥४

उच्च संस्कृतीची अजोड खूण । दावावी बांधवां उघडून ।
तेणें चैतन्य करावें निर्माण । राष्ट्रोन्नति अचल व्हावया । ५

आर्यधर्माची अखंड ज्योत । ठेवण्या सतेज प्रज्वलित ।
तैशी सद्धर्मबुद्धि जागृत । भारतीं उत्सव करावे ॥६

महोत्सवें आकर्षावें परराष्ट्रमन । जगतीं दर्शवावा पूर्वजाभिमान ।
राष्ट्रशक्ति उत्सवीं प्रकटून । जयहिन्द गर्जावें भूमंडळीं ॥७

आतां ऐका वाचकजन । भारतीय उत्सवाचें महत्त्वमापन ।
जागृत होण्या स्वदेशाभिमान । तुम्हां कथितों अत्यादरें ॥८

आमुच्या भारतविकास केन्द्रांत । सप्तसुरांच्या वाद्यगजरांत ।
उजाडली सुमङगल सुप्रभात । विजयादशमी विजयोत्सवी ॥९

या महोत्सवाचें नियोजन । होतें ठरविलें पूर्व योजून ।
कारणें दशदिशीं समाधान । होतें तेजाळलें अपूर्वसें ॥१०

लतापल्लवें, ध्वज, तोरणें । फलें, पुष्पें, नवधान्यें ।
तैशींच अनंत सुबोध वचनें । होतीं भूषवीत केंद्राश्रम ॥११
केंद्रीच्या भिन्न आश्रमांतून । झालें मंगल प्रभात-स्तवन ।
तदनतर राष्ट्रकल्याण-स्मरण । केलें सर्व सेवकांनी ॥१२
विजयादमीचें राष्ट्रध्वज-पूजन । करावया निघाले देशभक्तगण ।
शिस्तीचें जाह्लें संचलन । मुख्याश्रमाच्या दिशेप्रती ॥१३
प्रस्तावनाध्यायींचें कार्याध्यक्ष । निर्देशिलेले ज्यां जनहितदक्ष ।
जयांचें होतें अंतर्लक्ष । सर्वाश्रमांच्या प्रगतीकडे ॥१४
विविध आश्रमांचीं संचलनें । जयभारत गर्जत स्फूर्तीनें ।
तयांकडे आलीं अतिभक्तीनें । तिरंगी झेंडा वंदाया ॥१५
भारत-झेंडा होता फडकत । सत्कीर्तिस्तंभावरी डोलत ।
मुख्याश्रमींचें ध्येय दर्शवीत । 'स्वदेशदेवो भव' इति ॥१६
कर्मयोगी सेवाश्रमस्थापक । होते कीर्तिस्तंभानजिक ।
भोंवतीं जमले स्वयंसेवक । वर्तुळाकृति करूनिया ॥१७
मस्तक लववुनी नम्रतेनें । प्रसन्न सुस्वर एकतानतेनें ।
सर्वांनीं गायिलें आदरानें । झंडा ऊँचा रहे हमारा ॥१८
पश्चात् जाह्लें झेंडा-पूजन । मुख्याचार्यांचें गुण-विवेचन ।
**विजयादशमी** निरूपण । तदनन्तर आज्ञापिलें शिष्यातें ॥१९
शिष्य होता आर्यधर्माभिमानी । होती तयाची शुचिर्भूत राहणी ।
होतां आचार्य-आज्ञा आनंदुनी । प्रमुदें सांगूं लागला ॥२०
ऐका वदे सज्जनगण । करावया संस्कृति-संरक्षण ।
राष्ट्रीय महोत्सव हेंचि साधन । अति निश्चयाचें जाणावें ॥२१
**आश्विन शुद्ध दशमी** दिन । आज उदेला सुवर्णदिन ।
भारतीं व्हावया सद्धर्मरक्षण । विजयोत्सवाच्या दसऱ्याचा ॥२२
शक्तिदेवीनें केलें महिषासुरमर्दन । सृष्टीस सोडविलें घोर जुलमांतून ।
श्रीअष्टभुजेचा अवतार घेऊन । ऐशी कथा पुराणांतरीं ॥२३

कारणें राष्ट्रशक्तीचें वैभव । सिद्ध होण्या हा विजयोत्सव ।
लाभण्या कीर्तिशक्तिस्तव । साजरा करावा राष्ट्रभर ।।२४

गतवैभवीं असावा अभिमान । धर्म, राजकारण अेकत्र करून ।
सुसज्ज सेना सदा ठेवून । स्वदेशोन्नति साधावी ।।२५

सकळ शास्त्रास्त्रांचें प्रदर्शन । दावावें करून सेना-संचलन ।
तैसेंच सायंकाळीं सीमोल्लंघन । आचरूनि करावी सुवर्णलूट ।।२६

**सुवर्णलुटीची कथा** पौराणिक । असे संपत्तिदान-दर्शक ।
तैसीच अघटित अलौकिक । रघुराजाच्या औदार्याची ।।२७

कौत्सनामक ब्राह्मणकुमार । चौदा विद्या अध्यापनानंतर ।
गुरुदक्षिणा देण्या अपार । सिद्ध होता जाहला ।।२८

गुरु वरतंतु करी याचना । चौदा कोट मोहरा दक्षिणा ।
कौत्सें दिधलें त्या वचना । अर्पण करीन म्हणोनिया ।।२९

कौत्स गेला रघुराजाप्रती । मागूं लागला अपार संपत्ती ।
रघुरायें जाणोनि विज्ञप्ति । विचार केला स्वमनीं ।।३०

देवेंद्रावरी पाठवावें सैन्य । युद्ध आरंभावें दारुण ।
तेणें इंद्र करील अर्पण । सर्व संपत्ती आपणा ।।३१

रघुराजप्रेषित सेना पाहून । इंद्रानें केलें संपत्तिवर्षण ।
असंख्य मोहरा स्वर्गांतून । वर्षल्या अयोध्यानगरीवरी ।।३२

कौत्सें चौदा कोट स्वीकारून । गुरुदक्षिणा पूर्ण करून ।
व्यक्त केलें समाधान । धन्य रघु ाज म्हणोनिया ।।३३

असंख्य मोहरा शिल्लक । लुटविण्या जमविले नागरिक ।
कौत्सें आचरिलें अधिक । अयोध्येंत हें पुण्यकृत्य ।।३४

मोहराकार जाणोनी सुवर्ण । सुवर्णाचें प्रतीक आपटापर्ण ।
अद्यापि लुटती सर्वजण । सीमोल्लंघन करूनिया ।।३५

सुवर्णाची करिती देवघेव । तेणें वर्धतो प्रेमभाव ।
विजयादशमीची ही पुण्यठेव । हृदयीं अमर रक्षावी ।।३६

पांडव वनवासा निघाले । शमी-वृक्ष तयांनीं पोखरिले ।
पोकळीस निर्माण केलें । शस्त्रें, अस्त्रें रक्षावया ।।३७
शस्त्रास्त्रें ठेविलीं पोकळींत । वनवासी जाहले पश्चात ।
संपल्यावरी वास अज्ञात । परतले वृक्षातळीं ।।३८
ढोलींतली काढून शस्त्रास्त्रें । दसऱ्यास पूजिलीं धर्मशास्त्रें ।
धारण करूनि नव वस्त्रें । विजया निघाले राजधानीला ।।३९
विजयादशमीचें शस्त्रपूजन । रूढ झालें या शकुनांतून ।
रामचंद्र निघाले अयोध्येपासून । रावणवधार्थ या दिनीं ।।४०
ऐशी **विजयादशमी** क्षात्रतेजाची । देतसे हमी देशरक्षणाची ।
याकारणें शस्त्रास्त्रवाढीची । योजना नियोजावी या दिनीं ।।४१
शस्त्रास्त्रवाढीचें महत्त्व । राखील देशाचें तेजसत्त्व ।
जाणा हें वीरश्रीचें तत्त्व । शान्तता रक्षणार्थ या वेळीं ।।४२
**अहिंसा असावी सबळाची । वांछा नसावी समरांगणाची ।**
मैत्री राखावी सर्व राष्ट्रांची । सत्य-अहिंसा धोरणानें ।।४३
ऐसा महोत्सव हा दसऱ्याचा । जाति-पक्ष-भेद तोडण्याचा ।
शक्तिदेवीच्या उपासनेचा । राष्ट्रीय सण जाणावा ।।४४
राजधानीच्या मुख्य नगरीं । लष्करी प्रात्यक्षिकें नानापरी ।
आचरूनी अण्वस्त्रांची तयारी । दर्शवावी समस्त राष्ट्रांना ।।४५
युद्धनौका शृंगाराव्या महासागरीं । लष्करी विमानें आकाशांतरीं ।
रणगाडे संचरावे रणक्षेत्रीं । देशसामर्थ्य दर्शविण्या ।।४६
जाणोनि राष्ट्रशक्तीचें सुलक्षण । सक्तीचें करावें लष्करी शिक्षण ।
तेणें भावी पिढी निर्माण । करावी शूर तरुणांची ।।४७
तालमी, आखाडे, व्यायामशाळा । खेडोपाडीं उत्तेजावें ऐशा स्थळां ।
करितां येय काणाडोळा । आपत्ती ओढवेल देशावरी ।।४८
दांडपट्टा, लाठी, मर्दानी खेळ । यामाजीं घालवावी सायंकाळ ।
आरोग्यवर्धनीं असावा मेळ । अनेक भिन्न कार्यक्रमीं ।।४९

ऐशा विजयाच्या मंगलदिनीं । समस्त **महिला-मंडळांनीं** ।
विकासात्मक प्रतीकें दर्शवुनी । प्रगति करावी स्त्रीजातीची ।।५०
आजकालच्या कळिकाळांत । स्त्रियांनीं वर्तावें स्वातंत्र्यांत ।
न राहतां डांबून स्वगृहांत । स्वयमेव व्हावें शक्तिदेवता ।।५१
पूर्ण न रमावें नृत्यगायनीं । सोडावें भय, बाणा मर्दानी ।
अंगीकारावी सतेज जवानी । दावावी आर्यललना जगताला ।।५२
ऐसा विजयादशमी सण थोर । खरा भारताचा अलकार ।
देदीप्यमान रहावा चिरंतर । हेंचि माझ्या मनीं वसे ।।५३
आज उदेला हा सुवर्णदिन । म्हणोनि कथिलें पूर्ण विवेचन ।
जेणें श्रोतियां नवजीवन । प्राप्त होवो इच्छीतसे ।।५४
विजयादशमी मंगल दिन । दीपावली, प्रतिपदा शुभ सण ।
चैत्र प्रतिपदा वर्षारंभदिन । ख्यात त्रिसुमुहूर्त भारतांत ।।५५
तैसाच अक्षय्यतृतीया मंगलदिन । मानिती अर्धसुमुहूर्त हिंदुजन ।
ऐसे साडेतीन मुहूर्त एकूण । अति शुभ जाणतें धर्मशास्त्र ।।५६
ऐसे भारतीं विविध सण । कथितां तयांचें पूर्ण विवेचन ।
वाढेल विनाकारण पुराण । कारणें संक्षिप्तें निवेदितों ।।५७
येतां त्रयोदशी आश्विन । भारतीय करिती **दिवाळी सण** ।
**धनत्रयोदशी,** सुदिन । दर्शवी प्रारंभ दीपावली ।।५८
**नरकचतुर्दशी लक्ष्मीपूजन** । **प्रतिपदा भाऊबीज** शृंगारून ।
भारतीय नरनारीजन । दीपोत्सव करिती साजरा ।।५९
प्रारंभीं वसुबारस गोपूजन । धनत्रयोदशीस पूजिती सुवर्णधन ।
यमास करिती दीपदान । अपमृत्यू टाळावया ।।६०
कृष्णभार्या सत्यभामा शूर । तिनें केला नरकासुर ठार ।
सोडविल्या अंगना सोळा हजार । असुरें बंदिस्त केलेल्या ।।६१
मूर्तिमंत पाप नरकासुर । तयाच्या हत्यें झाला जीवनोद्धार ।
तन्निमित्त घरोघरीं शृंगार । दाविती जन याच दिनीं ।।६२

आश्विनी अमावास्यादिनीं । दंग होती जन **लक्ष्मीपूजनीं** ।
याविषयींची कथा अजुनी । स्मरती हिंदु पुराणांतली ।।६३
वळीराजाच्या बन्दिवासांतूनी । लक्ष्मीची मुक्तता याच दिनीं ।
केली ईश्वरें अवतीर्ण होउनी । वामनावतार घेऊनिया ।।६४
**कार्तिक शुद्ध प्रतिपदा दिन** । तैसाच असे शुभ सण ।
झालें उन्मत्त वळीचें उच्चाटन । याच दिनीं परियेसा ।।६५
याच शुभदिनीं विक्रम संवत । सुरू जाह्‌ला इतिहासकाळांत ।
श्रीरामचन्द्रही अयोध्येंत । अभिषेकिलें याच दिनीं ।।६६
करांगुलीवर गोवर्धन पेलून । देवेंद्रें निर्मिल्या अतिवृष्टीपासून ।
श्रीकृष्णें रक्षिलें गोकुळजन । याच दिनीं पुराणांतरीं ।।६७
ऐशा त्रिविध कारणास्तव । जनगण करिती दीपोत्सव ।
अन्तरीं उजळोनि भक्तिभाव । लक्ष्मीपूजन आचरिती ।।६८
नीरांजनें असंख्य तेवतीं । फुलती फुलवाज्या चन्द्रज्योती ।
रंकराव विसरती भेदजाती । ऐशा लक्ष्मीपूजन-दिनीं ।।६९
कार्तिक **वद्य द्वितीया** दिनीं । बंधूस ओवाळी भगिनी ।
अनन्त प्रीतीच्या सांठवणी । उमलती हृदयीं दोघांच्या ।।७०
ऐशी दिवाळी हिन्दुधर्माची । उन्नति साधण्या समाजाची ।
सकळ प्रजेच्या कल्याणाची । साजरी करावी राष्ट्रानें ।।७१
सणासुदीच्या शुभदिनीं । मिष्टान्न खावें सर्वजणांनीं ।
इष्टान्न द्यावें धनिकांनीं । गोरगरिबां धर्मार्थ ।।७२
दीपावलीच्या ज्ञानज्योति । नष्ट करोत अज्ञानभ्रांति ।
उजळोत सन्देश भारतीं । ' तमसो मा ज्योतिर्गमय ' ।।७३
कार्तिकी पौर्णिमेचे वेळीं । समस्त करिती **देवदिवाळी** ।
या दिनीं त्रिपुरासुराची होळी । केली शंकरें पुराणांतरीं ।।७४
ऐशा सणाच्या मंगलकाळीं । कामक्रोध-मोहाची मोळी ।
बांधून षड्‌रिपूंची होळी । करावी रक्षावया शुद्धाचार ।।७५

या दिनास संबोधिती कृषिजन । नव्याच्या पुनर्वेचा सुवर्णदिन ।
कारणें तयांना नवजीवन । द्यावें कृषिज्ञान शिकवोनी ।।७६
**मार्गशीर्ष पौर्णिमा दत्तजयन्ती** । अवतरले या दिनीं त्रैमूर्ति ।
ब्रह्मा-विष्णु-महेश कीर्ति । गाती दत्तभक्त या दिनीं ।।७७
दत्तानें उपदेशिली अनसूयामाता । कर्मज्ञानमार्ग-पारंगतता ।
तैशीच ब्रह्मज्ञानयुक्त विरक्तता । तिजला संपूर्ण निरूपिली ।।७८
तैसीच निसर्गाची दानशूरता । पृथ्वीमातेची सहिष्णुता ।
नभोमंडळाची अलिप्तता । तिजला कथियली भक्तीनें ।।७९
औदुंबर, नृसिंहवाडी, गाणगापूर । या त्रिक्षेत्रांशिवाय गिरनार ।
येथ वसती दत्तात्रेय निरंतर । भूतपीडा हराया पीडितांची ।।८०
श्रीदत्तात्रेयांची संन्यस्तवृत्ति । तैशीच तयांची निष्कामकर्मभक्ति ।
दर्शवी सत्य स्थितप्रज्ञवृत्ति । विवेकबुद्ध देशसेवकांप्रती ।।८१
पौषमासीं संक्रांत निसर्गसण । सूर्यनारायणाचें उत्तरायण ।
जाणिती हें **मकरसंक्रमण** । पंचांगशास्त्रीं प्रबोधिलें ।।८२
ऐशा मकरसंक्रमणापासून । सूर्यप्रकाश प्राप्त करून ।
मेळवावें सत्त्वयुक्तजीवन । आरोग्यलाभाकारणें ।।८३
ऐशा आनन्दोत्सवीं असे इष्ट । द्वेष, शत्रुत्व होणें नष्ट ।
कारणें तीळ, शर्करा-गूळ चविष्ट । द्यावा प्रेमें सर्वजनां ।।८४
तिळाची स्निग्धता, गुळाची मधुरता । शर्करेची आचरितां शुभ्रता ।
सच्चिदानन्द लाभे तत्त्वतां । शत्रुत्व नष्ट होऊनिया ।।८५
हिंदु महिलांचें संक्रांतिवाण । धनधान्ययुक्त ओटीभरण ।
असे सौभाग्यरक्षणाची खूण । शुभेच्छा प्रतीक संक्रांतीचें ।।८६
ऐसा दिन संक्रांतीचा । व्हावया खरा सुक्रांतीचा ।
तैसाच आंतरराष्ट्रीय कीर्तीचा । स्वदेशीं पाचारावे परदेशी ।।८७
खेड्यांत, शहरांत, राजधानींत । परदेशी अधिकारी निमंत्रित ।
करूनी तयांना गूळमिश्रित । तीळ द्यावे शासकांनीं ।।८८

तयांना दर्शवावी मधुसंस्कृति । तयांची चिंतावी देशप्रगति ।
टळण्या संघर्ष, भेद, क्लिष्टापत्ती । गोड़ बोला वदावें ॥८९

संक्रांतीस करावें ज्ञानदान । दीन-दुबळ्यां द्यावें भोजन ।
विजातीयां जाणोनि स्वसमान । संक्रांत टाळावी सर्वांची ॥९०

वैभवदायी माघ शुद्ध सप्तमी । असे सूर्यपूजनाची **रथसप्तमी** ।
सूर्योपासनें मिळते हमी । सुदृढ आरोग्य-संपदेची ॥९१

सातव्या शतकीं कंबुज देशांत । यशोवर्मा नृप असे उन्नतींत ।
परि त्याचा पुत्र रुग्णाइत । होता दुर्दैवें करूनियां ॥९२

तयानें केलें सूर्यपूजन । सूर्यानें केलें कृपादान ।
तयाचा पुत्र आरोग्यसंपन्न । जाहला जळून सर्वताप ॥९३

ऐशा कथेचें घ्यावें ज्ञान । हरदिनीं आचरावें सूर्यस्नान ।
भजतां, पूजितां सूर्यनारायण । लाभतें सतेज आरोग्यता ॥९४

माघ वद्य चतुर्दशी शिवपूजन । करून हा **महाशिवरात्री दिन**
करिती साजरा शिवभक्तगण । उपोषणादि आचरूनी ॥९५

शिवरात्रीची कथा विस्तृत । कळण्या वाचा शिवलीलामृत ।
तेणें होईल भक्तिभाव निर्मित । शिवोपासना कळोनिया ॥९६

एक व्याध पुराणांतरीं । गेला शिकारीस वनांतरीं ।
नेम धरूनी हरिणीवरी । वधूं लागला स्वभावें ॥९७

हरिणीनें केली विनवणी । " सोडी बा दया करूनी ।
घरीं बालकें वाट पाहुनी । मातृप्रेमें आक्रोशतील ॥९८

बाळकां देउनी स्तनपान । परत येतें निश्चित जाण ।
पश्चात् घेई तूं प्राण । माझे हीच प्रार्थना " ॥९९

व्याधें कृपा केली तिजवरी । हरिणी परतली आपुल्या घरीं ।
व्याध बसला बिल्ववृक्षावरी । परतेल हरिणी म्हणोनिया ॥१००

दिवस गेला वृक्षावर । भूक लागली अनावर ।
न मिळतां अन्न घासभर । उपोषण घड़लें व्याधाला ॥१०१

वृक्षातळींच्या शिवलिंगावरी । बिल्वपत्रें वर्पिलीं किती तरी ।
तेणें पूजा घडुनी भक्तापरी । जाहला व्याध पुण्यशील ॥१०२
हरिणीस झालें वचन-स्मरण । वृक्षातळीं आली परतून ।
म्हणे " व्याधा घेई प्राण । आज शिवरात्र पुण्यदिनीं " ॥१०३
तिची वचननिष्ठा पाहून । व्याधाचें द्रवलें अन्त:करण ।
तिजला देऊनी जीवदान । दया-धर्मवन्त जाहला ॥१०४
तत्क्षणीं शंकर प्रसन्नले । व्याध-हरिणीस उद्धरिलें ।
नभोमंडळीं अमर केलें । व्याध मृगनक्षत्र करूनिया ॥१०५
कारणें श्रद्धावन्त होऊन । ऐशी पुण्यकथा वाचून ।
शिवरात्रीचें पुण्य संपादून । दयाधर्म सदा आचरावा ॥१०६
श्रीशिवाचें रूद्र स्वरूप । दर्शवी महाशक्ति अमाप ।
रूद्रमंत्रें नष्ट संसारताप । होई ऐसें धर्मवचन ॥१०७
शिवोपासक हिंदू संत । तयांना वदती शैवपंथ ।
वर्णिती शिवभक्तीचे ग्रंथ । ज्योतिर्लिंगें बारा भारताचीं ॥१०८
शिवरात्रीचा करावा उपवास । ज्योतिर्लिंग स्थळांचा अभ्यास ।
तेणें करावा आत्मविकास । हेंच उचित सर्व काळ ॥१०९
फाल्गुन शुद्ध पौर्णिमेस । उजाडे हुताशनीचा दिवस ।
आहुती देउनी अग्नीस । करिती होळी याच दिनीं ॥११०
उत्तरप्रांतीं कृष्णोत्सव-सण । संबोधुनी आचरिती हा शुभ दिन ।
या दिनीं पूतनाराक्षसी-हनन । केलें कृष्णानें पुराणांतरीं ॥१११
ढुंढा राक्षसीचें दुर्वर्तन । आणीतसे बालकांचें मरण ।
कारणें होळी पेटवून । तियेला हांकलली पुराणांतरीं ॥११२
शंकरें वधिला तारकासुर । तेणें जाहला मदन ठार ।
कामातिरेकाचा संहार । जाहला पुराणीं आरोग्यार्थ ॥११३
ऐशा कथा पुराणांतरीं । तस्मात् होळी जाणा हितकारी ।
अग्निपूजा धरूनी हृदयांतरीं । अग्निरूप भजा जगदीश्वर ॥११४

होलिकोत्सवाच्या मंगल दिनीं । न वदा वाचें अश्लील वाणी ।
कलोपासनीं, मनोरंजनीं, ज्ञानार्जनीं। ऐसा उत्सव आचरावा॥ ११६

विविध समाजसेवा-पथकांनीं । कार्यारंभ करावा लोकशिक्षणीं ।
दलित खेडुतांमाजीं मिसळुनी । शिशु-संगोपन शिकवावें ॥ ११७

**चैत्राची शुद्ध प्रतिपदा** । निवारी सर्व अरिष्टापदा ।
उत्सवें मिळती सर्वसंपदा । हिंदूंच्या या वर्षारंभीं ॥ ११८

प्राचीन ऐशा चेदि देशांत । वसू राजाच्या अमदानींत ।
तयास वैराग्य प्राप्त होत । तपश्चर्या आरंभिली तयानें ॥ ११९

तयाला परमेश्वर प्रसन्नला । दिधली नृपा वैजयंतीमाला ।
देऊनि विमान वेळू उपदेशिला । सुराज्य करण्या चेदींचें ॥ १२०

वसू नृपति नगरीं परतला । ईश्वरदत्त वेळू शृंगारिला ।
पूजूनि वेळूवरी वैजयंतीमाला । गुढी उभारली वसु राजानें॥ १२१

या शुभ कथेची आठवण । म्हणुनी गुढी उभारती हिंदुजन ।
ब्रह्मदेवाचा सृष्टिप्रारंभदिन । हीच प्रतिपदा मानिती ॥ १२२

गेलेले रामप्रभु वनवासाला । या दिनीं परतले अयोध्येला ।
अयोध्यानगरीं आनन्दोत्सवाला । प्रारंभ झाला याच दिनीं ॥ १२३

नवसंकल्पांचा प्रस्थानसण । करी वसंतोत्सवाचें आगमन ।
कारणें लक्ष्मी-सरस्वतीपूजन । भारतीयांनीं करावें या दिनीं ॥ १२४

खगोल-काल-मापन-ज्ञान । देऊन पढवावे विद्यार्थीगण ।
तैसेंच चितावें स्वदेशकल्याण । प्रतिज्ञापूर्वक या वर्षारंभीं ॥ १२५

जेणें सरस्वतीचें शुभस्थान । नाना कलाशास्त्रांचें भूषण ।
तैसेंच आर्यधर्मरक्षण-साधन । ऐसा गाजेल भारत ॥ १२६

**चैत्रशुद्ध नवमी दिन** । **रामजन्माचा** हा शुभ सण ।
भारतीय जनमन-आकर्षण । भक्तिभावें प्रख्यात असे ॥ १२७

वाल्मीकिऋषींचें रामायण । असे महाकाव्य अमरभूषण ।
सत्य भारतीय अपूर्व लक्षण । प्राचीन आर्यसंस्कृतीचें ॥ १२८

श्रीरामचंद्रांचें पित्राज्ञापालन । तयांनीं आचरिलेले वनवासगमन ।
रावणें केलेलें सीताहरण । जाणती सर्व हिंदुजन ॥१२९

पश्चात् रामाचें लंकाधिपतिहनन । अयोध्यानगरीं पुनरागमन ।
तैसेंच सुकर्तव्यें राज्यपदग्रहण । विदित असे सर्वांना ॥१३०

रामचंद्रें राजनीति रक्षिली । कारणें सीताभार्याही त्यागिली ।
अनंत दुःखें भोगिलीं । ऐशा कथा जाणती सर्व ॥१३१

सीतामाईचें पृथ्वीपोटीं गमन । तयेचें सिद्ध पवित्र जीवन ।
तैसेंच पतिभक्ति-लक्षण । अखिल भारतीं विदित असे ॥१३२

श्रीरामाचें चरित्रविवरण । आबालवृद्ध जाणती संपूर्ण ।
तरी तयाचें अजोड सात्त्विकपण । आजही आचरावें सर्वांनीं ॥१३३

तयाची तत्त्वनिष्ठा, त्याग, प्रजाप्रेम । तैसेंच श्रीरामराज्य अनुपम ।
स्मरती जपतां रामनाम । आजही विवेकी राष्ट्रभक्त ॥१३४

महामंत्र राम-रहीम । साधण्या बंधुत्व हिंदुमुस्लीम ।
जय श्रीरघुपति रामरहीम । मंत्र वदले गांधीजी ॥१३५

बालकांनीं शिकावें आज्ञापालन । विद्यार्थीगणांनीं विद्यासाधन ।
शिक्षकांनीं वसिष्ठ विद्यादान । श्रीरामचरित्रापासून ॥१३६

तरुणांनीं शिकावें नैतिक जीवन । गृहस्थांनीं गृहस्थाश्रमपालन ।
वृद्धांनीं स्वार्थत्यागाचरण । श्रीरामचरित्र अवलोकुनी ॥१३७

अधिकाऱ्यांनीं दुर्जन-दमन । राष्ट्रशासकांनीं सुराज्यशासन ।
सकळ महिलांनीं पवित्राचरण । शिकावें श्रीरामकीर्तनीं ॥१३८

रामभक्तीचा लोटावा पूर । रामराज्य नांदावें पृथ्वीवर ।
रामनामीं आराम भरपूर । मेळवावा रामनवमी शुभदिनीं ॥१३९

**चैत्र शुद्ध पौर्णिमेला । रामभक्त बलभीम जन्मला ।**
तन्निमित्त हनुमान-जयंतीला । या दिनीं असे महोत्सव ॥१४०

केसरी-अंजनी शिवभक्त । उभयें महादेव आराधित ।
तयांना जाहला सुपुत्र । नांव तयाचें हनुमान ॥१४१

श्रीहनुमानाचा जन्म होता । तयानें सूर्यबिंब देखतां ।
उपजोन भूक तत्त्वता । उड्डाण केलें ग्रासावया ॥१४२

सूर्यास पक्वफल समजून । तयास टाकावें भक्षून ।
ऐसें जाणून केलें उड्डाण । ऐसा हनुमान तेजस्वी ॥१४३

तया सूर्य प्रसन्न होऊन । हनुमाना दिधलें शस्त्रशिक्षण ।
कारणें नैपुण्य संपादून । रामचरणीं लागला हनुमान ॥१४४

तयानें केलें सेतुबंधन । द्रोणाचल आणिला उचलून ।
तैसेंच आचरिलें लंकादहन । श्रीरामसेवेकारणें ॥१४५

श्रीहनुमानमाहात्म्य थोर । ऐसा स्वामिनिष्ठ वानरवीर ।
वंदूनि मेळवावा शक्तिसागर । मारुती जन्मल्या शुभदिनीं ॥१४६

भारतीयांनीं करावी बलोपासना । हनन करावें गांवगुंड-रावणां ।
प्राप्त करावें दीर्घायु, समाधाना । संदेश ऐसा बलभीमाचा ॥१४७

चैत्र मासांतरीं गौरीपूजन । आचरूनी महिला सौभाग्यरक्षण ।
इच्छिती भरवूनि संमेलन । सदाचार धर्म सुवासिनींचा ॥१४८

वैशाख शुद्ध तृतीयेला । **श्रीपरशुराम जन्मा आला ।**
निवारूनि घोर जुलुमाला । पृथ्वीरक्षण केलें तयानें ॥१४९

जमदग्नीचा परशुराम पुत्र । तयानें अभ्यासिलें धनुर्विद्याशास्त्र ।
तयासारखा पितृभक्त अन्यत्र । नसे जन्मला भूमंडळीं ॥१५०

जमदग्नीच्या आज्ञेवरून । तयानें मातेचें शिरच्छेदन ।
आचरूनि पुनश्च जीवदान । मिळविलें पितृभक्तियोगें ॥१५१

तयानें वधिला सहस्रार्जुन । भूमाता मुक्त केली जुलमांतून ।
तैशीच निःक्षत्रिय पृथ्वी करून । पराक्रम दाविला परशूचा॥१५२

परशुरामाच्या कथा अनेक । बोधिती जिंकावें आक्रमक ।
तैसेचि दंडावे राष्ट्रविध्वंसक । शांति, न्याय, नीतिकारणें ॥१५३

सुमुहूर्त अर्धा **अक्षय्यतृतीया** । जाणा वैशाख शुद्ध तृतीया ।
या दिनीं उभारती पाणपोया । तृष्णाशमनार्थ पांथस्थांच्या ॥१५४

असे हा धार्मिक श्राद्धदिन । या दिनीं आचरूनि पितृतर्पण ।
अर्पण दीनां करावें द्रव्यदान । नूतन सुसंकल्प करुनिया ।।१५५
**आंग्लवर्ष सातशें अठ्यांयशींत** । मलबारप्रांतीं कन्नडी ग्रामांत ।
भगवद्भक्त ब्राह्मण कुलांत । जगद्गुरू **शंकराचार्य** जन्मले।।१५६
**वैशाख शुद्ध** दशमी दिनीं । शिवगुरु श्रीअंबिका सदाचरणी ।
श्रीशंकर उभयें आराधुनी । पुत्रास जन्म दिला शिवकृपें ।।१५७
तयाचें शंकर-नामकरण झालें । तयानें विद्याध्ययन प्रारंभिलें ।
वेदशास्त्र, ज्योतिष अभ्यासिलें । विद्वत्तेनें गुरुगृहीं ।।१५८
श्रीअंबिकामाता प्रसन्नली । गुरुगोविंदनाथें कृपा केली ।
शंकरें संन्यासदीक्षा स्वीकारली । नर्मदातीरीं जाऊनिया ।।१५९
तये काळीं सर्वत्र अनाचार । माजून भरला द्वैताचार ।
तदर्थ वैदिक धर्माचा प्रचार । तयांनीं केला सद्धर्मार्थ ।।१६०
श्रीशंकराचार्य नाम प्रसिद्धलें । नास्तिकवाद तयें खंडन केले ।
हिंदुधर्मा पुनरुज्जीवन दिधलें। प्रस्थापुनी कर्ममार्ग गीतेचा।।१६१
जगन्नाथ, द्वारका, बद्रिकेश्वर । शृंगेरी आदि क्षेत्रीं देशभर ।
करूनी मठस्थापना प्रसार । केला अपार हिंदुधर्माचा ।।१६२
ऐसे शंकरार्य धर्मवीर । जाऊनिया क्षेत्रीं बदरिकेदार ।
झाले समाधिस्थ निराकार । बत्तिसाव्या वर्षी परियेसा ।।१६३
जयांनीं हिंदुधर्माची सहिष्णुता । पटविली धुवोनि अस्पृश्यता ।
शंकर-जयंतीनिमित्त तत्त्वतां । तयांची उपासना करावी ।।१६४
परधर्मीं चालले दीनबंधु । तयांना या दिनीं परमार्थसिंधु ।
दावोनि जगद्वंद्य धर्म हिंदु । हिंदुत्व श्रेष्ठता पटवावी ।।१६५
वैशाखी पौर्णिमेची **बुद्धजयंति** । साजरी करितां सुखशांति ।
लाभोनि होतसे अहिंसावृत्ती । परमार्थ साधण्या इहलोकीं ।।१६६
बुद्धजन्मोत्सव साजरा होतां । पौर्वात्य राष्ट्रीं एकता, सहिष्णुता ।
दर्शवूनि लाभ हो भारता । हिंदु संस्कृति-रक्षणाचा ।।१६७

भारतीय राज्यघटना निधर्मी । तरी भारतीजन हे हिंदुधर्मी ।
असोन बंधुत्व परधर्मी । दाविती ऐसा भारतधर्म ॥१६८

ज्येष्ठ शुद्ध प्रतिपदेस । होई प्रारंभ **गंगोत्सवास** ।
शुद्धदशमीच्या तिथीस । उत्सव होई संपूर्ण ॥१६९

भारतसंस्कृतीची गंगामाता । अर्पिते धनधान्य समृद्धता ।
जेणें लाभते स्थैर्य-शांतता । विकासवर्धन व्हावया ॥१७०

आजही करावा उत्सव साजरा । मेळावा भरवोनी गंगातीरा ।
पूजोनि निर्धारें दशहरा । योजना प्रसाराव्या प्रगतीच्या ॥१७१

**आषाढ, कार्तिक मासांत** । येती एकादशा महाप्रख्यात ।
जेणें उजळे धर्म भागवत । परमार्थसाधना दीनाच्या ॥१७२

एकादशीस करावें उपोषण । रात्रंदिन निरूपावें हरिकीर्तन ।
अंतरीं आळवावा जनता-जनार्दन । सेवाधर्म आचरूनी ॥१७३

**एकादशी कथा पौराणिक** । मृदुमान्यासुर शिव-उपासक ।
लाभतां वर अमरत्वरक्षक । जाहला विध्वसक भयंकर ॥१७४

तयाचा मृत्यु नारीकडून । होना वर्तविला शिवमुखांतून ।
तरीही मदोन्मत्तता येऊन । तयानें प्रलय मांडिला ॥१७५

ब्रह्मा, विष्णु, महेश घाबरून । बैसले घोर गुहेमाजीं दडून ।
मृदुमान्यें तयांचा पिच्छा पुरवून । गुहाद्वारीं ठाकला तो ॥१७६

घडला तयांना उपवास । फळ उपजोनी तयें तपास ।
धरोनि स्वतेजें आत्मविश्वास । श्वासें शक्तिदेवता निर्मिली ॥१७७

केला तिनें मृदुमान्य ठार । केलें देवांवरही उपकार ।
धरतीमाता सतोपली फार । शक्तिदेवीच्या सामर्थ्यें ॥१७८

उपोषणें येई दिव्यशक्ति । सुचे अरिष्टनाशार्थ प्रयुक्ति ।
लाभे आयुरारोग्य शांतवृत्ति । ऐसें जाणा उपोषण-माहात्म्य ॥१७९

ऐशा पर्वणीस जावें पंढरपुरीं । भगवद्भक्त व्हावे वारकरी ।
तेथ कीर्तनीं ज्ञानेश्वरी । महातत्त्व कथावें भक्तांना ॥१८०

सोहळा पालख्यांचा पाहावा । दुवळा समाज आपुला करावा ।
जनसेवेचा ईश्वर स्तवावा । हरिनाम-गजर करुनिया ॥१८१

आषाढी एकादशी सुदिनापासोन । **चतुर्मास** आरंभे देण्या समाधान ।
हिंदु सुवासिनींना वरदान । मिळतसे नाना व्रतें आचरितां ॥१८२

अनेक आचरिती धर्मदान । ब्रह्मवृंदां मानिती पूजास्थान ।
गोरगरिबां करिती भिक्षार्पण । आचरिती धर्म-कर्म आर्यांचें॥१८३

आहारीं त्यजुनी विशेष अन्न । दर्शविती त्याग, संयमी अन्त:करण ।
मनोनिग्रह, आत्मविश्वास-साधन । ऐशा व्रतें लाभतसे ॥१८४

धन्य ललनांचें जीवन । क्षणोक्षणीं दर्शवी पतिभक्तिअर्चन ।
ऐशा महिलांचें पवित्र आचरण । वंदितां शांतिदेवता पावेल॥१८५

ज्येष्ठी पौर्णिमेचें व्रतपालन । दर्शवी **वट-पौर्णिमेचा** शुभ-दिन ।
वट पूजितां सौभाग्य-रक्षण । लाभे महिलांना या दिनीं ॥१८६

सत्यवान-सावित्रीकथा सुबोधक । जाणिती सर्व सत्यशोधक ।
जाणावी सदा उपकारक । तयांतील तत्त्वें आचरितां ॥१८७

यमानें करितां प्राणहरण । सत्यवान झाला गतप्राण ।
सावित्री करी सत्याग्रहाचरण । तेणें प्राणदानही मिळविलें ॥१८८

सावित्रीनें केला स्वकुलोद्धार । तिनें फुलविला स्वसंसार ।
भारतीय ललना-सदाचार । दर्शविला आदर्श चारित्र्यें ॥१८९

आज महिलांनीं घ्यावा बोध । नष्ट करोनि गर्व-क्रोध ।
सत्याग्रहें करावा विरोध । विभक्त कुटुंबपद्धतीला ॥१९०

एकत्र राहतां कुटुंबांत । सहकार्य नांदतें समाधानांत ।
तेणें सर्व वांच्छा पूर्ण होत । वंश-न्यग्रोध वर्धतो ॥१९१

ऋतुराज येतां श्रावणमास । नवतेज वहरतें निसर्ग-सृष्टीस ।
तैसेंच नृत्य, गायन, वादनास । आचरिती ललना मोदभरें ॥१९२

श्रावणांत येती सण अपार । नववधू पूजिती मंगळागौर ।
तेणें लाभे सौभाग्य अमर । ऐसें जाणा ईशकृपें ॥१९३

**श्रावण पंचमीचें नागपूजन** । हरिद्रा, कुंकुम, गंध, चंदन ।
घेऊन आचरिती नरनारीगण। सर्वारिष्ट टळण्या कुटुंबाचें ॥१९४

नागोबा सर्प महाविषारी । दंशितां प्राण जाई सत्वरीं ।
कारणें नागपूजा घरोघरीं । करिती जन पंचमीला ॥१९५

प्रथम वंदावा दुर्जन । तेणें होऊनिया प्रसन्न ।
करितसे तो तापहरण । ऐशा तत्त्वाकारणें ॥१९६

ऐका कथा पुराणीं प्रचलित । एक कृषक शेत नांगरीत ।
असतां होऊनि वारुळ नष्ट । मृत्यु पावलीं नाग-बालकें ॥१९७

नागीण चवताळली अत्यंत । क्रोधें वदली करितें अंत ।
त्वरें धांवली कृषक-कुटुंबांत । सर्वां दंशूनि निर्दाळिलें ॥१९८

कृषककन्या राहिली जिवंत । होती सासरीं नाग पूजित ।
तेथेंही नागीण जात । परम संतोषली पूजेनें ॥१९९

कृपा उपजली नागिणीस । प्राणदान केलें कृषककुटुंबास ।
तदर्थ श्रावण शुद्ध पंचमीस । प्रथा पडली नागपूजेची ॥२००

कालिय नागाचें मर्दन । पुराणांतरीं लीलेनें करून ।
गोकुळवासियां संरक्षण । दिधलें कृष्णानें याच दिनीं ॥२०१

दुष्टास प्रथम वंदावें । तेणें शत्रुभावा तोडावें ।
मित्रत्वें तया सुधारावें । बोध हा नागपंचमीचा ॥२०२

श्रावणमासीं पौर्णिमा दिन । असे **नारळी पौर्णिमा** सण ।
या दिनीं करिती रक्षाबंधन । प्रतीक बंधु-भगिनी-प्रीतीचें ॥२०३

वर्षाऋतु असतो संपलेला । सागर नसे खवळलेला ।
ऐशा सुशान्त समुद्राला । पौर्णिमेला ऐशा पूजिती ॥२०४

सागरा श्रीफल अर्पून । सुरू होतसे दर्याजीवन ।
दूरदेशीं नौकानयन । सुलभ होतसे या काळीं ॥२०५

ऐशा नारळी पौर्णिमा दिनीं । दर्याजीवन अभ्यासुनी ।
प्रांतोप्रांतीं भारतीयांनीं । सिद्ध व्हावें समुद्रपर्यटना ॥२०६

परदेश-संचारें वाढे व्यापार । तेणें लाभे संपत्ती अपार ।
व्यापारवृध्यर्थ भारत सरकार । सक्रिय उत्तेजन देतसे ।।२०७
नारळी पौर्णिमेचें **रक्षाबंधन** । करी भगिनीचें संरक्षण ।
तियेच्या प्रिय बंधूकडून । दर्शविण्या सद्‌भाव बंधूचा ।।२०८
अवलोकडून राखी स्वीकारून । करावें तयांचें संरक्षण ।
दुर्वृत्त समाजकंटकांपासून । ऐसा संदेश या दिनाचा ।।२०९
श्रावणाच्या पौर्णिमा दिनीं । ब्राह्मण आचरिती **शुभ श्रावणी** ।
तयांच्या यज्ञोपवीत-धारणीं । पवित्र महाशक्ति वर्तते ।।२१०
जे जे जाणती ब्रह्मज्ञान । तयां नांव ब्राह्मण ।
याकारणें शिक्षण ब्रह्मज्ञान । घ्यावें सर्वांनीं या काळीं ।।२११
ब्राह्मणांस वदती सर्वश्रेष्ठ । तयां प्राप्त अध्यात्मज्ञान इष्ट ।
तेणें सर्व अरिष्ट नष्ट । ज्ञानप्रकाशें होतसे ।।२१२
याकारणें श्रावणी दिन । प्रकाशितां ब्राह्मणें करावें धारण ।
यज्ञोपवीत तैसें पूजन । अग्नीदेवाचें मंत्रोच्चारें ।।२१३
श्रावणीनिमित्त प्राचीन काळांत । शिष्यगण जाती गुरु-आश्रमांत ।
तदनंतर विद्यापठणांत । पारंगत होती त्वरेनें ।।२१४
तेथ आचार्यांचें विद्यादान । पढवी तयांना अनंत ज्ञान ।
गायत्रीमंत्रें सूर्योपासन । देतसे तयांना आयुरारोग्य ।।२१५
'सत्यं वद, धर्मं चर'। मातृ-पितृ-पूजन आचर ।
स्वदेशसेवा जन्मभर । करी सर्वदा उपदेशितां ।।२१६
ऐशी विद्या एतद् ज्ञान । आजही करूनी संपादन ।
विद्यार्थ्यांनीं नागरी जीवन । अभ्यासावें श्रावणीनिमित्तें ।।२१७
थोर पूर्वज या दिनीं स्मरून । ज्ञानज्योत अखंड तेवून ।
द्यावें सर्वां ब्रह्मज्ञान । **तमसो मा ज्योतिर्गमय** ।।२१८
श्रावण वद्य अष्टमी सण । अखिल भारतीं शुभदिन ।
जन्मले श्रीकृष्ण भगवान । या दिनीं सद्धर्म रक्षावया ।।२१९

**गोकुळ अष्टमी** या सणा वदती । साजरी करितां लाभे सुगती ।
तैशीच परमार्थाची प्राप्ती । रमतां जन्माष्टमी उत्सवांत ॥२२०
मदांध कंसाच्या बंदिशाळेंत । श्रीकृष्ण जन्मले मध्यरात्रींत ।
वसुदेव-देवकी चिंतीत । तया रक्षावें म्हणोनियां ॥२२१
वसुदेव-देवकी पिता-माता । श्रीकृष्णाचें रक्षण करितां ।
ऐहि भगवन् वदती चित्ता । कृष्णकृपा अवतरली ॥२२२
बंदिशाळेच्या तुटल्या शृंखला । श्रीकृष्ण तयांनीं दूर नेला ।
नंद-यशोदेप्रती वाहिला । गोकुळ-क्षेत्रीं जाऊनिया ॥२२३
धन्य गोकुळींचें कृष्णजीवन । धन्य तयाचें मुरलीवादन ।
अतिरम्य तयाचें गोपीरंजन । ऐसें बालपण कृष्णाचें ॥२२४
श्रीकृष्णें केलें कंसहनन । करोनि धनुर्विद्या संपादन ।
रक्षिलें मथुरानगरीं प्रजाजन । जरासंध-वध करोनिया ॥२२५
कृष्णानें केलें रुक्मिणी-हरण । तिचे ठायीं लाभली सगुणखाण ।
सत्यार्थ केलें पांडव-रक्षण । उपदेशुनि अर्जुन कुरुक्षेत्री ॥२२६
कृष्णाचा उपदेश गीताग्रंथांत । **निष्कामकर्मयोग दर्शवीत** ।
अहिंसा, सत्य प्रतिपादित । जगतीं अमर जाहला ॥ २२७
श्रीकृष्णचरित्र अभ्यासावें । तयाचें ध्येय अंगिकारावें ।
मानवता-पूजन आचरावें । आजही सद्धर्म रक्षावया ॥२२८
श्रीकृष्णचरित्र अति वितृत । संपूर्ण वर्णितां सर्व ग्रंथव्याप्त ।
होईल कारणें अति संक्षिप्त । केलें येथ परियेसा ॥२२९
भाद्रपदमासीं **शुद्ध चतुर्थी** । असे मंगलमूर्तीची शुभतिथी ।
पार्थिव पूजितां होय प्राप्ती । ॐकाररूपी गणेशाची ॥२३०
श्रीगजानन मंगल देवता । सुचविते मंगळ ग्रह तत्त्वता ।
जो ख्यातसे विघ्नकर्ता । शांत होतसे गणेशपूजनें ॥२३१
गणेशजन्म पुराणांतरीं । प्रसिद्ध असे नानापरी ।
दर्शवी सर्वत्र कल्याणकारी । गणेशाच्या रम्य कथा ॥२३२

'श्रीगणेशाय नमः' वदतां । होई विद्यारंभ तत्त्वता ।
कारणें विद्येची ही देवता । वंदावी भक्तीनें सर्वकाळ ॥२३३
सत्त्व, रज, तम त्रिगुणात्मक । म्हणोनि सिद्ध हा विनायक ।
सत्य, शिव हा मार्गदर्शक । होतसे विनाशकालीं भक्तांना ॥२३४
कार्यारंभीं पूजितां गजानन । ऋद्धि, सिद्धि प्राप्त होऊन ।
सत्कर्मीं लाभे कार्यसाधन । सर्व विघ्नें टळोनिया ॥२३५
लोकमान्यें हा गणेशोत्सव । योजिला राष्ट्रजागृतीस्तव ।
संदेश देई 'सन्नद्धोभव' । आजहि सुशांति लाभाया ॥२३६
ऐसे असती हे वार्षिक सण । महाराष्ट्र धर्माचें हें वाण ।
शृंगारोनि राखा मान । हिंदुधर्म-संस्कृतीचा ॥२३७
उजाडतां दसरा सुमंगल । केलें सुकथन ऐसें सोज्ज्वल ।
दर्शविलें सत्यरूप उज्ज्वल । भारतीय संस्कृतीचें ॥२३८
आपुल्या भरतखंडांत वर्तती । अनेक प्रांत, विविध जाती ।
तेथ नाना उत्सवीं जन रमती । जातीधर्म आचरितां ॥२३९
येथ जें केलें सुकथन । त्यांत वर्णिले महाराष्ट्र सण ।
मजला असे पूर्ण अज्ञान । अन्य सणांचें परियेसा ॥२४०
कारणें कथित समीक्षण । नसे संपूर्ण विवेचन ।
क्षमस्व माझें अज्ञानपण । ऐसें वदतों नम्रभावें ॥२४१
जें जें मजला ठाऊक झालें । तें तें तुम्हां निरूपिलें ।
येणें मजला पूर्ण उपजलें । अनंत अपूर्व समाधान ॥२४२
ऐसें होतां कथन पूर्ण । सर्वां उपजलें महाज्ञान ।
टाळ्यांचा गजर निनादून । अभिनंदन झालें राष्ट्रसेवकाचें ॥२४३
ऐसा विजयादशमी सण । राष्ट्रोत्कर्षकेंद्रीं सुवर्ण दिन ।
उजाडतां लुटलें सुवर्णज्ञान । सर्वत्रांनीं अति श्रद्धेनें ॥२४४
समारोप केला मुख्याचार्यांनीं । कथनकारास प्रशंसुनी ।
तदनंतर समस्त श्रोतियांनीं । गर्जना केली राष्ट्रदेवो भव ॥२४५

इतुक्यांत आलीं राष्ट्रविमानें । तुफान घरघर भरवेगानें ।
भरलें गगन शक्तितेजानें । पुष्पवृष्टि करण्या आश्रमावर ॥२४६

तेणें श्रोतियां लाभून चैतन्यदृष्टि । केंद्रावर जाहली पुष्पवृष्टि ।
हृदयीं दाटली पूर्ण तुष्टि । सरकारी सहकार्य देखतां ॥२४७

असो, नंतर झालें अन्नदान । दीनदुबळ्यां मिळे इष्ट भोजन ।
पश्चात् आचरितां सीमोल्लंघन। राष्ट्रगीत गायिलें सर्वांनीं ॥२४८

महोत्सवें भेद, वैर, सांडो । स्वदेश-कर्तव्यीं रती वाढो ।
सर्व भूतांचे ठायीं जडो । परमस्नेह अजरामर ॥२४९

इति श्रीभारतदीप ग्रंथाचा । भारतीय महोत्सव नामाचा ।
शिष्यें केलेल्या संकलनाचा । पांचवा अध्याय संपूर्ण ॥२५०



# अध्याय सहावा

# राष्ट्रीय सुवर्णदिन

श्रीगणेशाय नमः ।

जय गुणेशा गणपति । तुझ्या स्तवनें लाभे स्फूर्ति ।
कारणें तव अखंड कीर्ति । गाती त्रैलोक्यी भक्तगण ।।१
तुझ्या उत्सवें येऊनि जागृति । प्रसन्नली मंगल स्वातंत्र्यमूर्ति ।
लाभोनि चैतन्य देशभक्ति । लाभलें स्वराज्य भारतीं ।।२
आतां अर्पुनी तनमनधन । येवोनि तुजला पूर्ण शरण ।
धरोनि तव पद्मचरण । होवो ग्रंथपूर्ती प्रार्थितों ।।३
पश्चात् वंदितों वाचक सज्जन । वानितों करावें ग्रंथवाचन ।
तेणें सापडो तुम्हां निधान । अनंत, अमर देशसेवेचें ।।४
विजयादशमी उत्सव संपतां । केंद्राश्रमीं आमुच्या अपूर्वता ।
उपजोन लाभली सुसंपन्नता । भारतीय महोत्सव ज्ञानाची ।।५
जो नष्ट करी अज्ञानतम । ऐसा ज्ञानवर्धक कार्यक्रम ।
चालतां अपूर्व अनुपम । नवशिष्यें प्रश्न विचारिला ।।६
येथ जें निरूपिलें ज्ञान । त्यामाजी सर्व महाराष्ट्र-सण ।
वर्णिले परी न समाधान । उपजलें मम अंतरीं ।।७
नाना पंथ, जातींचें राजकारण । असतां भारतीं राहोनि अज्ञान ।
महाराष्ट्र-सण पडतीं अपूर्ण । एकत्र आणावया पक्षजाती ।।८
कारणें धरोनि आचार्य-चरण । प्रार्थितों करावें कृपादान ।
असती जे भारतीं राष्ट्रीय सण । तयांची मीमांसा करोनिया ।।९
आचार्य वदले सस्मित होवोन । यथार्थ तूं वा शिष्य नूतन ।
पुसशी प्रश्न सत्य नवीन । जेणें लाभेल बोध सर्वां ।।१०

आतां ऐका श्रोते सज्जन । करोनि तल्लीन पवित्र मन ।
अखिल भारतीय राष्ट्रीय सण । कैचे उपजले हिंदमाजीं ॥११

इतिहासीं घटना अनंत घडती । विजय-पराभव अनेक असती ।
पुण्यात्मे जन्मती स्वर्गीं जातीं । देवोन अमृतसिद्धि जनतेला ॥१२

ऐशा पुण्यात्म्यांचें मंगल स्मरण । करितसे अमर स्वातंत्र्यरक्षण ।
कारणें तयांचे जन्मनिर्वाण । जाणा राष्ट्रीय सण स्फूर्तीचे ॥१३

घडतें हुतात्म्यांचें रक्तदान । व्हावया रिपूंचें पूर्ण हनन ।
तैसेच विजयश्रीचे क्रांतिदिन । राष्ट्रीय उत्सव जाणावे ॥१४

देशास ज्या दिनीं स्वातंत्र्यप्राप्ती । लाभोन तेविल्या अखंड ज्योति ।
राष्ट्रीय शौर्याच्या या जगतीं । ऐसा उत्सव राष्ट्रीय जाणा ॥१५

ऐशा दिनीं पक्षभेद विसरावे । ऐशा क्षणीं जातिभेद हाकलावे ।
ऐशा रणीं सर्वत्रांनीं गर्जावें । अमर असो स्वतंत्रता ॥१६

**ऐसा भारतीय स्वातंत्र्यदिन । ऑगस्ट पंधरादिनीं जयघोषून ।**
साजरा करिती भारती जनगण । राष्ट्रीय कीर्तिदिन म्हणोनिया ;

इंग्रजांची संपून गुलामगिरी । आंग्ल राजवटीच्या अखेरी ।
राजधानी दिल्ली नगरीवरी । तिरंगी हिंदध्वज फडकला ॥१८

चौदा ऑगस्टच्या कृष्णरात्रीं । वाजले बारा भंगली कात्री ।
ब्रिटिश जुलमाची; लाभली खात्री । स्वातंत्र्याची हिंदला ॥१९

एकोणीसशें सतेचाळीस संवत्सरीं । ध्वज उभा लाल किल्ल्यावरी ।
उमराव मौंटबॅटन आंग्लाधिकारी । देती सत्ता स्वेच्छेनें ॥२०

करितां साजरा ऐसा दिन । घडतें स्वराज्यलढ्याचें स्मरण ।
कारणें तयाचें इतिहासकथन । ऐकावें स्वदेश रक्षणार्थ ॥२१

सोळावे शतकीं आंग्ल सनाचे । ऐशा काळीं निमित्त व्यापाराचें ।
उपजोन मोर्चे परजहाजांचे । वळले दिशेप्रती हिंदच्या ॥२२

जहाजांत होते डच-इंग्रज । तैसेच फ्रेंच, धूर्त पोर्तुगीज ।
आंग्ल बुद्धिकुशलांचे वंशज । उतरले किनारीं भारताच्या ॥२३

तयांनीं प्रस्थापिल्या वखारी । नाना वाजार भरले भांडारीं ।
वाळगले सेवकही हत्यारी । संरक्षणार्थ म्हणोनिया ।।२४
जागोजाग मांडिलीं प्रवळ ठाणीं । देखिल्या अज्ञानांध:कारखाणी ।
सुटलें तोंडास फिरंग्यांच्या पाणी । भारत लुटावा म्हणोनिया ।।२५
तये वेळीं होते मदांध यवन । देशांत माजली आपदा दारुण ।
जुलुम-जबरी-दुहीचें राजकारण । माजलें होतें भारतीं ।।२६
आर्यसुसंस्कृतीचें झालें विस्मरण । शौर्याभिमानीं पडलें विरजण ।
अधीरलें सर्वत्र आंग्लमुत्सद्दीपण । सत्ता स्थापन करावया ।।२७
यवनाधिकाऱ्यांस देऊन नजराणे । मिळविले व्यापारी परवाने ।
'फोडा-झोडा' कुटिल नीतीनें । फोडून झोडिलें हिंदला ।।२८
बंगालप्रांतीं लढविलें राजकारण । इंग्रज वसले सत्ता वळकावून ।
तैसेंच सशस्त्र सैन्य उभारून । संस्थानिकां बनवलें दुर्बळ ।।२९
स्थापिल्या आगगाड्या, तारायंत्रें । अवलंविलीं मुत्सद्दीगिरी तंत्रें ।
पाश्चात्य शिस्तीच्या सुमंत्रें । ब्रिटिश सत्ता दृढावली ।।३०
तयांचा वाढला व्यापार । संपत्ती लुटली अपरंपार ।
भारतीय बनले वेकार । दारिद्र्य नशिबीं येवोनिया ।।३१
आंग्लधर्मीय धर्मप्रचार । पसरला ख्रिस्ती भारतभर ।
हजारोंनीं केलें धर्मांतर । विस्मरोनि सद्धर्म आर्यांचा ।।३२
सत्तेपुढें नुरलें शहाणपण । तदर्थ तयांचा कावा न्याहाळून ।
दास्यशृंखला देण्या झुगारून । उठाव केला सैनिकांनीं ।।३३
अठराशें सत्तावन आंग्लसनांत । पहिलें स्वातंत्र्ययुद्ध झालें ख्यात ।
परी दुर्दैवाचा होऊनि आघात । विजयी ठरले इंग्रज ।।३४
आपुला करावा आपण उद्धार । ऐसा पुढाऱ्यांनीं केला सुविचार
राजकीय प्रगती करोनि निर्धार । राष्ट्रीय सभा स्थापिली ।।३५
सन अठराशें पंचायशींत । राष्ट्रीय सभा झाली स्थापित ।
देशाभिमान करण्या जागृत । स्वराज्य ध्येय निश्चिलें ।।३६

**टिळक, लजपतराय, टागोर । नौरोजी, गांधी, कर्तबगार ।**
ऐसे पुढारी धैर्यधर । प्रकटले भारतीं या काळीं ।।३७
गांधींनीं पुकारला असहकार । परदेशी मालावर बहिष्कार ।
कायदेभंग आचारोनि अनिवार । राज्यकर्त्यां संत्रस्तिलें ।।३८
ब्रिटिशांनीं भरविल्या परिषदा । निमंत्रिले पुढारी अनेकदा ।
आश्वासिली हक्कदानाची संपदा । संतोष देण्या देशभक्तां ।।३९
एकोणीसशें एकुणचाळीस उजाडलें । दुसरें महायुद्ध घोर पेटलें ।
ब्रिटिश साम्राज्य खिळखिळलें । चोहींकडे जगतांत ।।४०
वचनपूर्तीचें चिन्ह दिसेना । प्रजाजनांना स्वराज्य-हक्क मिळेना ।
निष्कारण चाले कालक्रमणा । तदर्थ संतापला हिंदुस्थान ।।४१
गांधीजींनीं घेतला पुढाकार । आरंभला निःशस्त्र प्रतिकार ।
अहिंसा-सत्य करोनि अंगिकार । निर्मिली क्रांति सत्याग्रहें ।।४२
आठ ऑगस्ट बेचाळीस क्रांतिदिनीं । 'चले जाव यहाँसे' बजावुनी
अखिल भारतीं आंदोलनें आचरूनी । जर्जर केली आंग्लसत्ता ।।४३
असंख्य सत्याग्रही तुरुंगांत । स्वराज्यार्थ होते यातनांत ।
तेणें उमगलें आंग्लाधिकाऱ्यांत । सत्तासंक्रमण करावें भारतीं ।।४४
अखेर उजाडला पंधरा ऑगस्ट । सुफळास पावले अनंत कष्ट ।
हिंदमाता झाली संतुष्ट । स्वातंत्र्यप्राप्ती होवोनिया ।।४५
राष्ट्रध्वज अशोकचक्रांकित । फडकला स्वातंत्र्यदिनीं राजधानींत ।
ब्रिटिशसत्ता आली संपुष्टांत । जयहिंद घोषला भूमंडळीं ।।४६
नेहरू, पटेल, राजेंद्रप्रसाद । ऐशा राष्ट्रभक्तांचा प्रसाद ।
देतसे भारता अत्युच्चपद । धन्य तयांची स्वदेशनिष्ठा ।।४७
ऐसा अपूर्व स्वातंत्र्यदिन । साजरा करावा राष्ट्रीय सण ।
समस्त राष्ट्रभक्तांचें स्मरण । करावें ऐशा महोत्सवीं ।।४८
भरवावें सर्व जातींचें संमेलन । पक्षभेदांचें करावें विसर्जन ।
सन्नद्धोभव तत्त्वाचें आचरण । दर्शवावें जगता ऐशा दिनीं ।।४९

आपुल्या विस्तृत विवेचनांत । आचार्यें कथियेले नाना सिद्धान्त ।
जेणें बलिष्ठ बनेल भारत । स्वातंत्र्य अमर रक्षावया ॥५०
तयांनीं केलेलें यथासांग निरूपण । जेणें साजरावा स्वातंत्र्यदिन ।
तें सर्व केलें म्यां कथन । विजयादशमी सण वर्णितां ॥५१
जाणण्या तो विजयोत्सवदिन । करावें पांचव्या अध्यायाचें वाचन ।
तेणें उपजेल वाचकां ज्ञान । स्वातंत्र्योत्सव शृंगारण्या ॥५२
टाळण्या पुनरुक्ति लेखनांत । अवलंबिलें आचार्यकथन संकलनांत ।
म्हणून नसावा विकल्प मनांत । आळस केला म्हणोनिया ॥५३
पुढतीं आचार्य वदले संतोषून । कथितां ऐसे राष्ट्रीय सुवर्णदिन ।
मनीं उपजतो देशाभिमान । उच्च संस्कृति स्मरोनिया ॥५४
एकोणीसशें एकोणपन्नास सालांत । **सव्वीस जानेवारी सुवर्णाक्षरांत** ।
तेजाळली हिंद-इतिहासांत । राष्ट्रीय स्फूर्तिदिन म्हणोनिया ॥५५
पंधरा ऑगस्ट स्वातंत्र्याचा । तेवी सव्वीस जानेवारी पवित्रतेचा ।
दिन **प्रजासत्ताक** तंत्राचा । भारतामाजीं उजाडला ॥५६
राष्ट्रीय सभा होती स्थापन । एकोणीसशें तिसाचें अधिवेशन ।
तदा योजिला स्वातंत्र्यदिन । जानेवारी सव्वीस म्हणोनिया ॥५७
या दिनीं एकोणपन्नास सनांत । नूतन घटना आली अमलांत ।
निश्चिलेली घटना परिषदेंत । प्रजासत्ताक पद्धतीची ॥५८
सर्वपक्षीं पसरलें उत्सव-समाधान । स्वाधिकारें आनंदले प्रजाजन
**लोकसत्ताक बनलें राज्यशासन** । ऐशा सुवर्णदिनीं भारतांत । ‹
ऐशा प्रजासत्ताक दिनोत्सवांत । सर्व प्रजा जातिधर्मभेदविरहित न ।
एकत्र होवोन सुसंघटित । सुराज्य-मार्ग दर्शविते ॥६०
प्रात:काळ होतां सर्व जागृत । होवोनि प्रार्थिती राष्ट्रगीत ।
स्वयंस्फूर्तीनें राष्ट्रध्वज वंदीत । प्रतिज्ञा करिती देशसेवेची ॥६१
या दिनीं करिती सद्विचारग्रहण । ग्रामसेवेंत रमती असंख्य जण
भारतीं उभारती मंगलतोरण । सांस्कृतिक उच्चता दर्शविण्या ॥'

नूतन घटनासमिती झाली मुकर । योजिले अध्यक्ष प्रसादराजेंद्र ।
तैसेच लेखनाध्यक्ष आंबेडकर । लोकसत्ताक घटना लिहावया ॥६३
लेखनीं अस्पृश्यतेचें उच्चाटन । ठरविलें निधर्मी राजकारण ।
देऊन व्यक्तिस्वातंत्र्या प्राधान्य । घटनेंत दर्शविली न्यायनीति ॥६४
हिंदी ठरविली राष्ट्रभाषा । तेणें भाषावादाची दुर्दशा ।
उपजोन उजळल्या दशदिशा । भिन्न प्रांतीं ऐक्याच्या ॥६५
ऐशा उत्सवाच्या शुभदिनीं । राष्ट्रपुरुषां स्तवावें संमेलनीं ।
राष्ट्रसंत वंदावे कीर्तनीं । तयांचीं चरित्रें सांगोनिया ।६६
भिन्न भिन्न धार्मिक मंदिरांत । नाना जातींनीं भक्ति-प्रार्थनेंत ।
मागावें वरदान अनंत स्फूर्तींत । अमर व्हावया प्रजाराज्य ॥६७
नळे, फुलबाज्या, चंद्रज्योति । पणत्या, समया, विद्युद्दीपपंक्ति ।
यांनीं असंख्य इमारती । उजळाव्या वैभवीं भारताच्या ॥६८
सर्वां कथावा स्वातंत्र्येतिहास । तैसे प्रतिज्ञावें समाजोन्नतीस ।
नूतन योजना राष्ट्रविकास । निश्चित प्रारंभाव्या ऐशा दिनीं ॥६९
गार्गी, मैत्रेयींचें वेदपठण । विजयालक्ष्मीचें उच्चाधिकारग्रहण ।
सरोजिनीचें काव्यकुशलपण । अभ्यासावें आत्मोन्नतीसाठीं ॥७०
झांशी-राणीचें आत्मबलिदान । राज्यरक्षणार्थ चन्नम्मांचें प्राणदान ।
स्वसंरक्षणार्थ असिधाराव्रत । प्रतिज्ञावें महिलांनीं या दिनीं ॥७१
अन्य राष्ट्रांचा स्वातन्त्र्येतिहास । ध्वजगीत-राष्ट्रगीत पूर्णार्थासि ।
कथन करावा विद्यार्थीगणास । विद्यादानाच्या सर्व केंद्रीं ॥७२
भरवावें ग्रामोद्योग प्रदर्शन । निरूपावें प्रतिवर्षाचें प्रगतिकरण ।
सम्राट् अशोक शांतिकार्य कीर्तन । स्तवून पूजावें अशोकचक्र ॥७३
आर्यावर्ताचें भारत नामकरण । ज्याकारणें झालें तो सर्वदमन ।
भरतकुमार पूजावा सत्कारून । प्रतिमा स्थापून तयांच्या ॥७४
साजरा करण्या प्रजासत्ताक दिन । राष्ट्राध्यक्षें करावें पदवी दान ।
जेणें मानवसेवकजन । प्रसन्न होतील कर्तव्यीं ॥७५

विविधख्यात कलावंतां सन्मान । दर्शवावा तया वर्षासन देऊन ।
तेणें तयांचा आदराभिमान । जागृत राहील स्वदेशाप्रती ।।७६
ऐशा पद्धती अनंत रीती । आचरोनि वाढवावी उत्सवप्रीति ।
प्रजासत्ताक हिंदमहती । जेणें गर्जेल जगतांत ।।७७
**ऑक्टोबर एक बोधदिन । भारतीं शोभतो हरिजनदिन ।**
जाणा हा राष्ट्रीय सण । अस्पृश्यता-निवारण-स्मरणाचा ।।७८
जयांचा स्पर्श अति अनिष्ट । ऐशी भावना माजली दुष्ट ।
हीच दुर्बुद्धि व्हावया नष्ट । असे हरिजनदिन उपकारक । ७९
अस्पृश्यता नसे कायदेशीर । तरी उच्चनीच कुळाचार ।
वर्ततो सर्वत्र कर्मानुसार । हेंच त्रिवार सत्य असे ।।८०
कारणें बदलून अंत:करण । व्हावया दलितांचें शुद्धीकरण ।
तयांची उन्नती सर्वांगीण। निश्चिली पाहिजे दलितसेवकांनीं ।।८१
कैंचे, कोठें उपजले हरिजन । यास्तव ऐका इतिहासकथन ।
असे जे अति प्राचीन । सावध व्हावें ऐकण्या ।। ८२
स्मरावें आर्यांचें समाजविभाजन । वैश्य, क्षत्रिय आणि ब्राह्मण ।
जेणें जाहलें धर्मरक्षण । भारतीं आर्य येतांना ।।८३
भारतीं आदिवासी, अनार्य प्राचीन । होते तयांना युद्धांत जिंकून
तैसेंच जाणोन दीनहीन । सेवक बनविलें आर्यांनीं ।।८४
सेवकांप्रती शूद्र संबोधिलें । तयें चार वर्ण उत्पन्नले ।
हीन कार्यीं शूद्र लाविलें । ब्राह्मण, क्षत्रिय वैश्यांनीं ।।८५
सेवाधर्म परम गहन । शूद्र काढिती कचरा, घाण ।
तयांवरी लादूनि अज्ञान । दूर राखिलें त्रिवर्गांनीं ।।८६
लोटलें पुढतीं दीर्घकालांतर । घडोनि संबंध परिस्थितीनुसार ।
निष्पन्नले रोटीबेटी व्यवहार । आर्य-अनार्य यांमाजीं ।।८७
पुढतीं निपजल्या अनेक जाती । पनश्च उच्चनीच रीतीभाती ।
उपजोन पुनश्च घडे निर्मिती । शूद्र-अतिशूद्र जातींची ।।८८

सायना दृष्टि-भिंगशोधक । कॅक्स्टन मुद्रणयंत्रशोधक ।
वॉटरमन झरणी-संशोधक । हे सर्व दर्शविले रेखाचित्रीं ॥५७

फॅरेडे शास्त्रोपकारक । जो विद्युत् पृथःकरण शोधक ।
नामें प्रसिद्धला विद्युत्‌युग-जनक । तयाचें छायाचित्र दाविलें ॥५८

ऑटो फॉन गॅरिक । वायुभार सिद्धकारक ।
तैसाच जलखेचयंत्रकल्पक । दाविला तो रेखाचित्रीं ॥५९

सूर्याभोंवतीं पृथ्वीचें भ्रमण । वर्ततें ऐसें सिद्ध करून ।
जयानें शोधिली वेधदुर्बीण । तोही गॅलिलियो दाविला ॥६०

विद्युत्‌वहन आणि ऊष्णतेंत । दृढसंबंध करोन प्रस्थापित ।
जेम्स ज्यूल झाला ख्यात । तोही संशोधक दाविला ॥६१

हवेचे घटक शोधून । ज्वलनक्रिया सत्यार्थ दर्शवून ।
जयाचें प्रसिद्धलें संशोधन । ऐसा लॅव्हॅयज्ये दाविला ॥६२

जीवन जगण्या आवश्यक । ऐसा प्राणवायु-निदर्शक ।
जोसेफ प्रीस्टले नामक । शास्त्रज्ञ दाविला रेखाचित्रीं ॥६३

विद्युद्दीपशोधक एडिसन । जयाचें ध्वनिमुद्रण, चलच्चित्रशोधन ।
जगतीं अपूर्व आकर्षण । तोही दाविला रेखाचित्रीं ॥६४

हंप्रे रक्षकदीप शोधक । गटेनबर्ग छापकला-कल्पक ।
आर्किमेडिज् गणितसिद्धांत दर्शक । दाविला सर्वा कलाविभागीं ॥६५

टॉलेमी ज्योतिषशास्त्रज्ञ । युक्लिड भूमितितंत्रज्ञ ।
न्यूटन गुरुत्वाकर्षण-शोधज्ञ । हेही दाविले कल्पनाचित्रीं ॥६६

शास्त्रज्ञ आइन्स्टाइन । जयांचें अणुशक्तिशोधन ।
जगीं गाजतें अतुल्यमान । तोहि दाविला तैलचित्रीं ॥६७

पृथ्वीप्रदक्षिणा प्रथम करून । पावला ख्याति जो मॅगेलॉन ।
तयाचें रेखाचित्रीं चित्रण । तेंही संतां दाविलें ॥६८

नवभूमि अमेरिका-शोधक । दर्यावर्दी कोलंबस नामक ।
सर्व जगाचा उपकारक । तयाचें चित्र दाविलें ॥६९

आंग्लभची पूर्व शोधून । महासागर पूर्ण ओलांडून ।
प्रथम घेतलें भारतदर्शन । ऐसा वास्को-ड-गामा दाविला ॥७०
हिमालयाचें सर्वोच्चशिखर । गाजलें जें दुर्गम जगभर ।
तें आरोहण करणारा भारतवीर । तेनसिंग चित्रीं दर्शविला ॥ ७१
ऐसें चालतां नामनिर्देशन । अभ्यागतां प्रतिमा दर्शवून ।
जे शांत होते प्रेक्षकजन । अल्पसे झाले अस्वस्थ ते ॥७२
तयांची अस्वस्थता अवलोकून । वदले आचार्य संतजन ।
उमगलें आतां कारण । आपुल्या अस्वस्थ मानसाचें ॥७३
कांहीं शोधक येथ दाविले । तयांचें संशोधनही कथिलें ।
परि तुम्हां न कळलें । परकीय नामोच्चारामुळें ॥७४
परकीय भाषा अति गहन । तेणें न जडे तेथ मन ।
परि केलें तुम्हां कथन । सहज प्रतिमा देखतां ॥७५
सहज द्यावें थोडें ज्ञान । कळण्या पाश्चात्य संशोधन ।
जेणें घडलें मानवकल्याण । जगतामाजीं अपूर्वसें ॥७६
संशोधनीं जीवन वाहून । नवज्ञान जगा देऊन ।
नवजगत निर्माण करून । मानव उपकर्ते हे झाले ॥७७
मानवी जीवन नसे स्वार्थ । मानवी जीवन नसे व्यर्थ ।
मानवी जीवन उपकारार्थ । या विभूतींनीं सिद्ध केलें ॥७८
धन्य ऐसे पाश्चात्य संशोधक । कष्टले जे कित्येक शतक ।
कष्टें जाहले महोपकारक । अखिल मानवां ईश्वरसे ॥७९
ईश्वरें निर्मिलीं पंचमहाभूतें । विश्वीं निर्मिलीं अगम्य जगतें ।
परि मानव झाले तयांचे ज्ञाते । शास्त्रसंशोधन करोनियां ॥८०
शास्त्रसंशोधनाचें ऐसें महत्त्व । ज्ञानवृद्धीचें हेंचि तत्त्व ।
देईल मानवां विश्वप्रभुत्व । ऐसें वाटे भविष्यकाळीं ॥८१
शास्त्रज्ञ जातील चंद्रावर । संशोधक जातील नानाग्रहांवर ।
स्थापतील नवग्रह खरोखर । ऐसें बुद्धिसामर्थ्य अगम्य असे ॥८२

मानवी जीवनाची अपूर्वता । ऐशी उमजावी तत्त्वता ।
कारणें कथिल्या स्वल्प कथा । पाश्चात्य शोधक-विजयाच्या ॥८३

**यत्न करितां लाभे ईश्वर । प्रयत्नां लागे ज्ञान अपार ।**
**कारणें द्यावा स्वकष्टेंभर । अखंड ज्ञानप्राप्ती व्हावया ॥८४**

आतां सांगणें संतजन । आपण म्हणवितां खेडुतजन ।
तरी प्राप्त करावें लेखन-वाचन । ज्ञानवृद्धि व्हावया ॥८५

जीवन असतां क्षणभंगुर । जाणावें तया असत्यपर ।
करावा त्याग खरोखर । सर्वस्वाचा जगतीं या ॥८६

ऐशीं भारतीय शिकवण । परि अर्थ घ्यावा पूर्ण जाणोन ॥
त्यागावें विलासी जीवन । आत्मसंयम करोनिया ॥८७

आत्मसंयमीं जडतां मन । प्राप्त व्हावया अपूर्व ज्ञान ।
बुद्धीस येतें स्थैर्यपण । विसर पडोनि विलासांचा ॥८८

आपुल्या भारत देशास । शास्त्रशोधनीं नसे यश ।
कारणें होतीं अनंत क्लेश । दुर्दशा देखतां स्वदेशाची ॥८९

दुर्दशा व्हावया सर्व नष्ट । विद्याध्ययनीं घेऊनी कष्ट ।
भारत करावा पूर्ण संतुष्ट । पाश्चात्यतुल्य ऐसाही ॥९०

**ऐसे अतीव कष्ट करून । शौर्य, बुद्धि, पराक्रम गाजवून ।**
**ज्यांनी केलें भारतरक्षण । ऐसे देशभक्त ऐकावे ॥९१**

प्रत्येकाचें चरित्रकथन । करितां जाईल सर्व जीवन ।
कथितों मुख्य गुण । श्रेष्ठजनांच्या थोरवीचा ॥९२

तुम्ही समस्त साधुजन । तुमचें जीवन-गुणकीर्तन ।
ईश्वरी नामाचें अखंड भजन । तुम्हा समाधान देतसे ॥९३

भजनीं होतां सदा दंग । संसारयातना पावती भंग ।
दृष्टीसमोर पांडुरंग । भक्ता देव भेटवी ॥९४

तद्वत कथितों तुम्हां स्तवन । ऐकोन करावें तुम्हीं भजन ।
भारतीय रत्नांचें गुणगान । देशप्रेम तुम्हां देवो ॥९५

ऐसें ऐकतां आचार्यवचन । टाळ, मृदुंग, वाद्यवादन ।
सहर्ष भजनीं सुरू होऊन । आश्रमीं स्तवनरंग रंगला ।।९६

आपणही ऐकावें वाचकजन । आश्रमीयांचें **भारतरत्न-स्तवन** ।
जेणें उपजेल ज्ञान, समाधान । मानसीं स्फूर्ति येवोनिया ।।९७

ऐका वाजती टाळ, मृदुंग । भेदभावा नसे थांग ।
समस्त सज्जन झाले दंग । अभंग विभूतिस्तवनांत ।।९८

आदिपुरुष तो । स्तवूं नारायण ।
प्रारंभीं पूजन । देवो शांति ।।९९

वंदा रामदास । मुत्सद्दी धर्मास ।
भगव्या झेंड्यासे । ज्यानें दिलें ।।१००

स्तवूं शिवबास । स्वराज्य-स्थापकास ।
हिंदुपालकास । राष्ट्रप्रेमें ।।१०१

ज्यांच्या गीतार्थानें । तारिले अज्ञानी ।
ज्ञानदेव ज्ञानी । ऐसे स्तवूं ।।१०२

संत तुकाराम । स्तवूंया अभंगीं ।
ज्यांच्या पांडुरंगीं । लाभे देव ।।१०३

संत एकनाथ । गाऊं भजनांत ।
दलितसेवेंत । ज्यांचा धर्म ।।१०४

नमः शिवायचा । लिंगायत गुरु ।
बसवेश्वर स्मरूं । समतेसाठीं ।।१०५

रामरहिमांचे । कबीर जे संत ।
दोहयांच्या वाणींत । तयां गाऊं ।।१०६

नरसी मेहताचें । दलितोद्धारण ।
वैष्णवभजन । तैसें स्तवूं ।।१०७

वंग कृष्णभक्त । चैतन्य स्मरूं या ।
त्यांच्या सांप्रदाया । आदरोनी ।।१०८

मुस्लीम हिंदूंची । एकी शीख धर्म ।
वंदूं हें सुकर्म । नानकांचें ॥१०९

सेना-संघटना । ज्यानें दिली शीखां ।
गुरु गोविंदसिंगा । ऐशा वंदूं ॥११०

तिरुपण्णा हरिजन । आलवार विष्णुभक्त ।
स्तवूं शैव संत । तामीळचे ॥१११

वंग चंडीदास । संत विद्यापति ।
यांची कृष्णभक्ति । स्तवनीं भजूं ॥११२

स्मरूं कुर्तकोटि । धर्मगुरु हिंदु ।
संस्कृतीचे सिंधु । सनातनी ॥११३

वंदूं विवेकानंद । केला ज्यांनीं हिंद ।
रूप ब्रह्मानंद । आस्तिक्यांत ॥११४

चरणांचें तीर्थ । दावी परमार्थ ।
स्वामी रामतीर्थ । ऐसें गाऊं ॥११५

स्वामी दयानंद । आर्य समाजाचें ।
नाशक भेदांचे । तयां स्तवूं ॥११६

सर्व देव एक । अल्ला, राम, ख्रिस्त ।
वंदूं ते विश्वस्त । परमहंस ॥११७

शुद्धि-कार्यकर्ते । श्रद्धानंदस्वामी ।
वंदूं धर्माग्रणी । हिंदुत्वाचें ॥११८

विजयनगरीचे । वंदूं राज्याधार ।
विद्यारण्य थोर । संस्कृतज्ञ ॥११९

सौराष्ट्राचे शूर । वस्तुपाल स्मरूं ।
ज्यानें यात्रेकरू । केले धन्य ॥१२०

तेजपाल वंदूं । कीर्तीचे वर्धक ।
मंदिर-स्थापक । गिरनारी ॥१२१

सम्राट् वंदूं या । कृष्णदेवराय ।
विजयानगरीं कार्य । ज्यांचें शिल्प ॥१२२

संत मीराबाई । तिचा गिरिधर ।
काव्यही मधुर । तिचें गाऊं ॥१२३

कान्होपात्रा संत । जन्म अकुलीन ।
पांडुरंगीं लीन । तिज स्तवूं ॥१२४

सखू पांडुरंग । झाले जिचेसाठीं ।
संत सखू मोठी । ऐशी वंदूं ॥१२५

भजनीं स्तवितां । ऐशा संत व्यक्ति ।
कुंठिता हो मती । भक्तिभावें ॥१२६

**हिंदस्वराज्यार्थ । ज्यांचें तनमन ।**
**ऐसे थोर जन । आतां स्तवूं** ॥१२७

बाजीराव वंदूं । लढे जो अखंड ।
व्हावया प्रचंड । हिंदुराज्य ॥१२८

नमूं रामशास्त्री । न्यायाचा करारी ।
खुनी-फांसावरी । न्याय ज्याचा ॥१२९

झेंडा अटकेपार । ज्यानें उभारिला ।
ऐशा राघोबाला । वंदूं भावें ॥१३०

महादजी शिंदे । पेशव्यांचे हात ।
वंदूं मुत्सद्द्यांत । पराक्रमी ॥१३१

फडणवीस नाना । बुद्धीचे सागर ।
मराठी राज्याधार । स्तवूं तयां ॥१३२

गाऊं रणजितसिंग । सिंह पंजाबचे ।
महाराज्य शीखांचें । निर्माते जें ॥१३३

स्मरूं प्रतापसिंहा । स्वातंत्र्य ब्रीदांत ।
यवनी लढ्यांत । अढळ जो ॥१३४

जिजामाता स्तवूं । खरी वीरमाता ।
दाती स्वतंत्रता । शिवाजीला ॥१३५

झांशीरक्षणार्थं । केलें प्राणार्पण ।
लक्ष्मीचें स्तवन । ऐशा करूं ॥१३६

कित्तूर-रक्षणीं । केलें प्राणार्पण ।
स्तवूं शौर्यखाण । चन्नम्मा ती ॥१३७

नगररक्षक । चांदबिबी शूर ।
येवो स्फूर्तिपूर । तिज गातां ॥१३८

वंदावी अहल्या । ईंदूरची राणी ।
शौर्यही दावोनी । धार्मिक जी ॥१३९

पूज्य विष्णुशास्त्री । स्तवूं चिपळूणकर ।
चैतन्य-दातार । अशिक्षितांचे ॥१४०

वंदूं टिळकांना । स्वराज्य-स्फूर्तीना ।
कर्मबोधकांना । जगद्वंद्य ॥१४१

गांधी राष्ट्रपिता । सुसत्त्वें स्तवितां ।
अहिंसा, बंधुता । भरे जगीं ॥१४२

सुधारकवादी । वंदूं आगरकर ।
जनसेवा देव । ज्यांनीं केला ॥१४३

रानडे स्तवूंया । न्याय मूर्तिमंत ।
ज्यांची कीर्तिवंत । हिंदसेवा ॥१४४

नौरोजी दादाभाई । स्वराज्याच्या पायीं ।
जीवनास वाही । तया वंदूं ॥१४५

आंग्लराज्यीं हक्क । सांगती विवादीं ।
ऐसे लोकहितवादी । देशमुख स्तवूं ॥१४६

राष्ट्रसभा-स्थापक । ह्यूम प्रसिद्धला ।
तया आदरिला । वंदनांत ॥१४७

सार्वजनिक काकांनीं । बजाविलें आंग्लां ।
द्यावें राज्यहक्कां । तयां स्मरूं ॥१४८

आंग्ल बेझंट ॲनी । भारतीय मनीं ।
देशभक्ति आणी । तिज नमूं ॥१४९

टागोर रवींद्र । ज्यांचा काव्यचंद्र ।
झालें शांतिकेंद्र । तयां स्तवूं ॥१५०

स्मरूं केळकर । वाङ्मयसम्राट् ।
मराठीचे भाट । गाजले जे ॥१५१

त्यागी जीवनास । वाहिलें देशास ।
चित्तरंजन दास । ऐसें स्तवूं ॥१५२

जयां नसे भय । ऐसे लजपतराय ।
धडाडी विजय । त्यांना स्तवूं ॥१५३

ब्रह्मोसमाजाचे । राजाराम नामक ।
'सती'विरोधक । वंदूं रॉय ॥१५४

नमूं अन्सारी । द्वेषबुद्धि वैरी ।
सर्व हिंदुकरी । सदा एक ॥१५५

प्रेमें गाऊं अती । नरीमन मूर्ती ।
थोर ज्यांची स्फूर्ति । स्वातंत्र्यांत ॥१५६

वंदू मोतीलाल । नेहरू नामाचे ।
वकिली चातुर्याचे । मेरूमणि ॥१५७

मुंजे प्रतिकारी । दुष्मनांना भारी ।
हिंद शौर्यें भरी । तयां वंदूं ॥१५८

सोज्ज्वळता मूर्ती । मालवीय वंदूं ।
झाले विश्वबंधु हिंदुत्वाचे ॥१५९

विठ्ठलभाई हे । वंदावे पटेल ।
जनशाही-पाल । मुत्सद्दी जे ॥१६०

वल्लभभाईंचे । वंदावे चरण ।
जयांना शरण । निजाम ये ॥१६१

बजाज जम्नाजी । ज्यांचें दान-शौर्य ।
देई दीनां स्थैर्य । तयां वंदूं ॥१६२

भारतसेवक । गोखल्यांना वंदूं ।
प्रागतिक बंधू । समाजाचे ॥१६३

रानडे कुळींच्या । वंदूं रमाबाई ।
ज्ञानदात्या आई । अबलांच्या ॥१६४

अबलोन्नतिगृह । ज्यांचें देवघर ।
ऐसे देवधर । वंदूं भावें ॥१६५

महिलोन्नतिसाठीं । शतायु जे झाले ।
ते ऋषि वंदिले । येथ कर्वे ॥१६६

रयतशिक्षण । कार्य आजन्माचें ।
भाऊ ते पाटिलांचें । सदा स्तवूं ॥१६७

महिलाशिक्षण । ज्यांनीं फुलविलें ।
महात्मा ते फुले । आतां गाऊं ॥१६८

रत्नविच्छेदनीं । शोधक रंग अणूंचे ।
ऐशा रमणांचें । गीत गाऊं ॥१६९

वनस्पतींमाजीं । आत्म्याचे सिद्धक ।
ख्यात संशोधक । बोस स्तवूं ॥१७०

पाँडिचेरी केंद्र । ज्यांच्या तपस्येचे ।
ऐशा अरविंदांचे । चरण धरूं ॥१७१

अड्यारकेंद्रीचे । स्तवूं कृष्णमूर्ती ।
ज्यांची ईशपूर्ती । पूर्व-तारा ॥१७२

पंढरीचा देव । दाविला हरिजनां ।
साने गुरुजींना ऐशा वंदूं ॥१७३

बुद्ध आंबेडकर । अस्पृश्योद्धारक ।
भेद-संहारक । स्तवूं प्रेमें ॥१७४
औद्योगिक क्षेत्र । हिंदचें वर्धिलें ।
टाटा ते स्तविले । अत्यादरें ॥१७५
कवयित्री थोर । स्तवूं सरोजिनी ।
देशभक्ताग्रणि । भारताच्या ॥१७६
पश्चिम जगांत । हिंदच्या पंडित ।
प्रणामूं प्रख्यात । विजयालक्ष्मी ॥१७७
आदरूं सुभाष । सेनादल खास ।
ज्यांनीं स्वातंत्र्यास । उभारिलें ॥१७८
वंदूं सावरकर । जयांनीं सागर ।
उल्लंघिला पार । स्वातंत्र्यार्थ ॥१७९
भूदानयज्ञाचे । अध्वर्यू जे भावे ।
जगद्वंद्य भावें । तयां स्तवूं ॥१८०
स्तवूं जवाहर । तरुणांचे वीर ।
शांतिचे शाहीर । जगीं ख्यात ॥१८१
तत्त्वज्ञानभूषण । विद्वत् राधाकृष्णन् ।
राष्ट्राधारां नमन । आदराचें ॥१८२
हिंदचे अध्यक्ष । प्रसाद राजेंद्र ।
सत्त्वें हरिश्चंद्र । सर्व वंदूं ॥१८३
भारतरत्नांचें । ऐसें तेज थोर ।
स्तविलें अपार । सेवाश्रमीं ॥१८४

येणेंपरी चालतां भजनरंग । जाहली एकवृत्ती अभंग ।
हेंच भक्तीचें मुख्य अंग । जाणा सुबुद्ध वाचकजन ॥१८५
सहज जाहली सायंकाळ । आश्रमीं परतले गोपाळ ।
गोपालनाची तळमळ । ज्यांच्या मनीं तीव्र असे ॥१८६

संतजनांचें संपतां भजन । तयां घालुनी लोटांगण ।
सेवकांनीं दाविलें आचरण । निर्मळ संतश्रद्धेचें ॥१८७

आचार्य-आज्ञा घेऊन । सर्वां दिधलें गोदुग्धपान ।
तैसें अर्पिलें फलाहार भोजन । थोर आदर दावोनिया ॥१८८

समस्त शिष्य अभ्यासक । तैसेच संत राष्ट्रोद्धारक ।
बैसले होवोनिया एक । कुशल पुसती एकमेकां ॥१८९

ऐशा थोर संमेलनीं । स्वयंसेवकांच्यामधुनी ।
उभा ठाकला एक हसुनी । महाराष्ट्राचा मानकरी ॥१९०

वदे ऐका ईश्वरभक्त । आपण होतां अति भुक्त ।
कारणें देवोनि फलें युक्त । तुम्हां सर्वां संतोषविलें ॥१९१

आतां पुरवा माझी भूक । **कथितों तुम्हां संततारक ।**
**जेणें नुरला सर्व कलंक । सांप्रतच्या या कलियुगीं** ॥१९२

या कलियुगाचें कालांतर । चारलक्ष सव्वीस हजार ।
अधिक नऊशें चाळीस संवत्सर । इतुकें शिल्लक राहिलें ॥१९३

या वैवस्वत मन्वंतरीं । सहा भूपति भारतांतरीं ।
गाजले शककर्ते मुद्राधारी । ऐसें विद्वद्वचन असे ॥१९४

धर्मराज, शालिवाहन । विक्रम, आणि नागार्जुन ।
तैसे कल्किराज, विजयाभिनंदन । नामेंप्रसिद्धले छत्रधारी ॥१९५

ऐशा नृपतींच्या राज्यांत । काळ लोटला सदाचरणांत ।
लाभलें स्थैर्य भारतांत । शत्रुनाश त्वरित जाहला ॥१९६

जगतों नांदण्या सौख्यसमाधान । धर्म, अर्थ, काम, मोक्षसाधन ।
ऐशा पुरुषार्थांचें रक्षण । केलें पाहिजे सर्वदा ॥१९७

परि राज्यसत्ता होवोनि बेभान । जेधवा उठे भय तुफान ।
प्रजाजन होती अति हैराण । किंकर्तव्यमूढ होवोनिया ॥१९८

ऐशा काळीं जन्मती महापुरुष । आचरती बुद्धिज्ञान-तपास ।
नवधर्म देतीं जगतास । **थोर पंथ-तत्त्वें** प्रतिपादिती ॥१९९

हिंदुधर्म अतिप्राचीन । आकलनीं झाला गहन ।
त्यामाजीं वर्णभेद प्रतिपादन । कारणें असमाधान माजलें ॥२००
ऐशा काळीं भारतांत । महावीरें स्थापुनि जैनपंथ ।
तैसाच बुद्धानें बौद्धपंथ । सत्य, अहिंसा प्रचारिली ॥२०१
ला-ओत्से, कनफ्यूशियस । लाभले धर्मदाते चीन देशास ।
तद्वत् ग्रीसदेशीं सॉक्रेटीस । महातत्त्वज्ञ लाभला ॥२०२
झरतुष्ट्रें स्थापिला पारशीधर्म । येशूनें प्रस्थापिला ख्रिस्तीधर्म ।
महंमद पैगंबरें यवनीधर्म । देशोदेशीं सत्कर्मार्थ ॥२०३
ऐसे नाना धर्म निर्मिले । तरी एकमेव तत्त्व स्थापिलें ।
शुद्धाचरण व्रत स्तविलें । उन्नती व्हावया सर्वांगीण ॥२०४
जितुक्या व्यक्ति तितुक्या प्रकृति । ज्ञानी, अज्ञानी अनेक जाती
सर्व एकेश्वर न भजती । कारणें देवसंख्या वाढली ॥२०५
तद्वत् वाढले धर्मोपदेशक । नाना देवांचे उपासक ।
सद्वर्तनाचार दर्शक । शिष्यसंप्रदाय वाढवोनि ॥२०६
**अज्ञान्यांचें जावया अज्ञान । नाना पंथांचें करण्या कल्याण ।**
**जयांनीं दिधलें आपुलें जीवन । ऐसे उद्धारक ऐकावे** ॥२०७
आतां सांगणें असें उचित । माझें ज्ञान अति संकुचित ।
माझें जन्मगेह महाराष्ट्रांत । अभ्यासही पूर्ण नसे ॥२०८
म्हणोनि माझ्या कथनांत । विभूति न येती असंख्यात ।
सांठविल्या ज्या भक्तिश्रद्धेंत । परि त्या आतां ऐकाव्या ॥२०९
एकनाथगुरु जनार्दनस्वामी । रमले सदा जे दत्तनामीं ।
जयांचे योगें कांहीं न कमी । पडलें तयांच्या शिष्यांना ॥२१०
स्वामिमहाराज अक्कलकोट । नीनगूर-स्वामी बंकट ।
सदा निवारिती संकट । शिष्या सुबोध देवोनिया ॥२११
रत्नागिरीचे चंद्रशेखर । आळंदीक्षेत्रीं रामदास कबीर ।
वल्लभाचार्य, उपासनी थोर । हेही उपदेशक गाजले ॥२१२

... ग्रंथ सं... , ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम .............. वि: ..............
क्रमांक .............................. नों: दि: ..............


सिद्धारूढ हुबळीनगरीं । गोविंदमहाराज सोनगिरीं ।
शिष्यांचे सत्य कैवारी । झाले ख्यात सद्‌गुरु ॥२१३

शिरोडेंग्रामीं बापूमहाराज । भिलोरीगांवीं उद्धवमहाराज ।
शिरडीक्षेत्रीं साईमहाराज । आजही स्तविती शिष्यगण ॥२१४

जंगमांचे अवधूत । त्र्यंबकक्षेत्रीं निवृत्तिनाथ ।
पैठणीं एकनाथ । हेही सदुपदेशक महशूर ॥२१५

माणगांवीं वासुदेवानंदसरस्वती । रत्नागिरीं स्वामी आनंदमूर्ति ।
भगवान रमणमहर्षिही स्मरती । तयांचे शिष्य भक्तीनें ॥२१६

नारायणमहाराज केडगांवीं । सांवतामाळी अरणग्रामीं ।
नानामहाराज श्रीगोंदेस्थळीं । ख्यात जाहले ईशभक्त ॥२१७

वडमेरीं सिताराम स्मरती । पालघरीं पद्मनाभ नमिती ।
श्रीवर्धनीं फकीरबावा स्तविती । तयांचे शिष्य आजही ॥२१८

दादामहाराज पाटगांवीं । चंडीराम खेडग्रामीं ।
विठोअण्णा जांबगांवीं । प्रसिद्ध झाले सत्पुरुष ॥२१९

वब्यींत परांजपे भजती । हुमणाबादीं माणिकप्रभु गाती ।
गाडगेसंत कीर्तनीं वंदिती । आदरें तयांचे भक्तगण ॥२२०

चिंचवडीं गोसावी मोरया । जाणोनि प्रत्यक्ष ईश्वरी दया ।
असंख्य भक्त पडतीं पायां । तयांच्या समाधीस अत्यादरें ॥२२१

चौंडेबोवांचें गोपालन । संत तुकडोजींचें साधुसंमीलन ।
गोंदवलेकरांचें संतजीवन । संतांमाजीं अमोल असे ॥२२२

जयांचा शिष्यसांप्रदाय अपार। ऐसें नृसिंहसरस्वति गुरुचरित्रकार ।
साकरे तयाचे सुलभ रचनाकार। स्तविती आजही भाविक ॥२२३

यवतमाळीं योगीराज । राक्षसभुवनीं दत्तमहाराज ।
बाळेकुंद्रीं पंतमहाराज । दर्शविती ईश्वरी दिव्य भक्तगणां ॥२२४

संत दाजीबा टाकळीमाजीं । स्वामी रंगनाथ जालन्यामाजीं ।
साधुब्रह्मचारी लिंब्यामाजीं । मानले ईश्वरी अंश शिष्यांनीं ॥२२५

नंदलाल धामणग्रामीं । टेंभेस्वामी नृसिंहवाडी ।
मेहेरबाबा मेहराबादी । ईश्वरी उपदेशक प्रसिद्धलें ॥२२६
ऐसे अनेक असती संत । नाना प्रांतीं नामवंत ।
मुक्तीचे विविधपंथ । दाविती आपुल्या शिष्यवर्गी ॥२२७
कांहींची ख्यात मठस्थापना । कांहींची सिद्ध शिष्यसंघटना ।
कांहींचे गुरुमंत्र सेवकांना । देती चित्तीं समाधान ॥२२८
परहितार्थ ऐसे साधु । मानवतेचे सर्व बंधु ।
अत्यादरें तयां वंदूं । राष्ट्रसेवक म्हणोनिया ॥२२९
विशेष धरावें चित्तांत । मानव नसे सर्वगुणपरिप्लुत ।
कारणें थोर विभूती जगतांत । नसती परिपूर्ण सर्वगुणीं ॥२३०
साधूचें न पहावें पूर्वचरित । तयांचा न पहावा वेष विचित्र ।
लावावें एकभावें स्वचित्त । तयांच्या सदुपदेश-ग्रहणांत ॥२३१
साधूंचे ओळखावे सद्‌गुण । गुणांस मानावें पूजास्थान ।
तद्वत् करोनि आचरण । समाधान मेळवावें अंतर्यामीं ॥२३२
**साधूंच्या सद्‌गुणांत ईश्वर । खास जाणावा निरंतर ।**
**तोच आत्मा अमर । हृदयांतरीं वसे मानवाच्या** ॥२३३
थोरांचें ऐकतां सुवचन । दुर्वृत्तीचें होय निर्दालन ।
तैसें गुरूपदेशें दुःखहरण । अनेकांचें होतसे संसारीं ॥२३४
सोलापुरीं **रामजोशी** ब्राह्मण । असोनि कवि बुद्धिमान ।
होई तमासगीर हीन । शृंगारविलासी काव्य करी ॥ २३५
तयाची काव्यशक्ति पाहून । तयाचें थोर कुळ अवलोकून ।
गेले कवि मोरोपंत द्रवून । तया सद्वर्तनीं करावया ॥२३६
कविवर्यें दिधला उपदेश । रामजोशी टाकोनि स्व-वेष ।
जाहला ज्ञानी; भजे परमेश । ख्यात कीर्तनकार होवोनी ॥२३७
**कवि अनंतफंदी** ब्राह्मण । तमासगिरांमाजीं रममाण ।
पेशवाईंत तनमन । लावी लावण्या रचावया ॥२३८

तयाचें ग्राम संगमनेर । तेथ येतां अहल्या होळकर ।
धार्मिकतेची देवता थोर । पाहुनी कष्टली तयास ॥२३९

तिनें दिधला सदुपदेश । प्रशंसिलें तयाच्या बुद्धीस ।
उपदेशपर काव्यरचनेस । स्फूर्ति तयां देवोनिया ॥२४०

तयानें आज्ञा मानून । फटके, कटाव, नव रचून ।
केलें संस्कृतिरक्षण । नामवंत कवि होवोनिया ॥२४१

ऐशी असे सज्जनसंगती । तयांच्या सद्‌गुणें मिळे सुगति ।
शांति, सौख्य, समाधान, अति । विस्मरण होवोनी आपदांचें॥२४२

**ज्या योगें घडे दुःखहरण । ऐसे अलौकिक देवता गुण ।**
**सद्‌गुणांठायीं ये देवपण । ऐसें निश्चित जाणावें ॥२४३**

ज्ञानेशांच्या ओवीरचनेंत । तुकोबाच्या अभंगवाणींत ।
वामनाच्या श्लोककाव्यांत । सत्य नारायण वसतसे ॥२४४

मोरोपंतांच्या आर्याकौशल्यांत । भर्तृहरीच्या नीतिशतकांत ।
रघुनाथपंडिताच्या आख्यानांत । ईश्वरी अंश खास वसे ॥२४५

नेवासें ग्रामीं ज्ञानेश्वर । सांगती ज्ञानेश्वरी कर्मयोगपर ।
ऐसा महाराष्ट्रभाषाअलंकार । लिहिला सच्चिदानंदानें ॥२४६

जी स्रवली ज्ञानेश्वर मुखांतुनी । ती सच्चिदानंदलेखनीं ।
अवतरली ज्ञानेश्वरी सर्वजनीं । ईश्वरी वरदान गीतार्थाचें ॥२४७

**ऐशा महाराष्ट्राच्या कर्मभूमींत । अनेक गुणवंत ख्यात ।**
तयांच्या विविध गुणदर्शनांत । इच्छित देव भेटतसे ॥२४८

किर्लोस्कर, देवल, खाडिलकर । गडकरी, केळकर, वरेरकर ।
यांच्या नाटचलेखनीं अमर । परमेश्वरी अंश प्रकटतसे ॥२४९

सानेगुरुजी, सावरकर । फडके, अत्रे, खांडेकर ।
ललित लेखणीचे भूषणालंकार । दर्शविती ईश्वर प्रतिभेंत ॥२५०

हरी नारायणांचें कादंबरीलेखन । दिवाकरांचें नाटचछटा लिखाण ।
केशवसुतांचें काव्यरचनासाधन । दैवी अलौकिकत्व दर्शवी ॥२५१

संजीवनीच्या काव्यभावनेंत । यशवंतांच्या यशोगीतांत ।
माडगूळकर-गीतरामायणांत । काव्यदेवता प्रसन्न असे ॥२५२

तानसेनाच्या स्वर्गीय आलापांत । जैसें प्रकटे ईश्वरी संगीत ।
तैसा उदयशंकर नृत्यसाधनेंत । प्रकटे शिवनृत्येश्वर ॥२५३

होनाच्या अमरभूपाळींत । साधु वस्वानींच्या गीताधर्मप्रसारांत ।
निजामपूरकरांच्या हरिकीर्तनांत । ईश्वरी तपश्चर्या सिद्ध असे ॥२५४

पुंडलीकाच्या मातृपितृभक्तींत । तानाजीच्या स्वामिनिष्ठेंत ।
भानुदासांच्या पांडुरंगभक्तींत । ईश्वरी श्रद्धा प्रकट दिसे ॥२५५

हेडगेवारांच्या राष्ट्रसेनासंघटनेंत । केतकरांच्या ज्ञानकोशकार्यांत ।
रविवर्म्यांच्या भारतीय चित्रकलेंत । प्रकटे ईश्वर तत्त्वता ॥२५६

पांगारकरांच्या संतवाङमयांत ।दांडेकरांच्या ज्ञानेश्वरी प्रवचनांत।
वाळशास्त्र्यांच्या धर्मस्वाध्यायांत । ईश्वरी दिव्यता सिद्धते ॥२५७

राजहंसांच्या नाट्याभिनयांत । गायनहिराच्या शास्त्रसंगीतांत ।
लताकोकिळेच्या स्वरमाधुर्यांत । वरदान ईश्वरी शोभतसे ॥२५८

दुर्गातारकेच्या चित्र-अभिनयांत । शांतारामांच्या पटदिग्दर्शनांत ।
सी. रामचंद्रांच्या पार्श्ववाद्यवृंदांत । ईश्वरी कला खास असे ॥२५९

अली अकबरांच्या सरोदवादनांत । रविशंकरांच्या सतारवादनांत ।
बिसमिल्लांच्या सनईवादनांत । कौशल्य ईश्वरी वर्ततसे ॥२६०

जोशी-पार्सेकर वायोलिनांत । महमदहुसेन सारंगींत ।
तिरखवा तबलावाद्यांत । वाद्यांचा देव अमर वसे ॥२६१

टेंबे यांचें पेटीवादन । पन्नालाल घोष बांसरीवादन ।
मंगळवेढेकर मृदुंगवादन । दैवी कौशल्य दर्शवितसे ॥२६२

**ऐशा अनेक कलावंतांत । कलेच्या निराकार स्वरूपांत ।**
**असे शक्ति ईश्वरदत्त । तेथेंच ईश्वर जाणावा ॥२६३**

स्वदेशाच्या उन्नतीस । अनेक देती आपुला हात ।
कष्ट घेती अपरिमित । तयांच्या कष्टांत ईश्वर वसे ॥२६४

सरदेसाई, राजवाडे, पोतदार । जाहले इतिहाससंशोधक थोर ।
तयांच्या शोधकबुद्धींत परमेश्वर । प्रकट सिद्ध होतसे ॥२६५
राष्ट्रास देण्या औद्योगिक वर । झटती कूपर-किर्लोस्कर ।
तयांच्या सुयशांतही ईश्वर । अमरत्वानें खास दिसे ॥२६६
असो, ऐका राष्ट्रसंतजन । ऐसे वर्तती ईश्वरी गुण ।
या भारतीं पूर्वीपासून । हेंच त्रिवार विश्वासावें ॥२६७
मी असे अज्ञान, अजाण । कारणें केलें थोडें निर्देशन ।
राहून गेले कित्येकजण । सद्‌गुण वर्णन करण्याचे ॥२६८
तरी क्षमा करावी अत्यंत । व्हावें ईश्वरी कृपावंत ।
हेंच मनोगत दर्शवीत । वंदितों तुम्हां सर्वांप्रती ॥२६९
ऐका आतां वाचकजन । ऐसें करितां महाराष्ट्रस्तवन ।
आचार्य वदले तया उद्देशून । ऐक सात्त्विक वचन मम ॥२७०
तव संकलित भक्तिकथनांत । आहे अभिमान सत्य-स्फुरित ।
कारणें ऐशा महाराष्ट्रनिष्ठेंत । ईश्वरी अंश दिसे श्रोतियां ॥२७१
ऐकतां ऐसें आचार्य-वचन । श्रोतियांनीं सद्‌भावना स्मरून ।
टाळयांचा गजर कडकडून । जयजयकार केला महाराष्ट्राचा ॥२७२
ऐशा विभूति प्रांतोप्रांतीं । असतां अपुल्या राष्ट्रभारतीं ।
आचरोनि सदा समाधान वृत्ती । राष्ट्रोत्कर्षी झटावें ॥२७३
सेवाश्रमीं उजाडे दुजा दिन । निरोप घेती सर्व संतजन ।
तैसें प्रशंसिती भारतरत्नस्तवन । हृदयीं श्रद्धा ठेवोनिया ॥२७४
ऐसा अध्याय वाचकजन । मनीं धरा आदरें करून ।
तेणें लाभो, स्फूर्ति ज्ञान । ईश्वरी देशभक्ति लाभण्या ॥२७५
पुढती वाचतां पूर्ण ग्रंथ । इहजन्माचा सत्य अर्थ ।
कळोन टळेल कुस्वार्थ । लाभोनि दिव्यत्व हृदयांतरीं ॥२७६
**ऐशी दिव्यता मेळवोन । करावा भारत प्रसादचिन्ह ।**
**सुसिद्ध अर्पाया सद्धर्मदान । भूमंडळींच्या अन्य राष्ट्रां ॥२७७**

इति श्रीभारत-दीप ग्रंथाचा । भारतरत्नस्तवनभक्तीचा ।
सतसज्जन सुदर्शनाचा । आठवा अध्याय संपूर्ण असे ।।२७८

★ ★

# अध्याय नववा
# भारत सद्धर्म-साधन

ॐ श्रीगणेशाय नमः ।

स्मरतां तव विनायक मूर्ति । संसारयातना मुळीं नुरती ।
चिर सुखमय ये शाश्वती । सत्त्वगुण अंगीं येवोनिया ।।१
तूंच दाविसी परमार्थसाधन । मद, मत्सर अति भीषण ।
तैसें नाना शत्रूंचें कंदन । तव कृपें करोनिया ।।२
या नरदेहामाजीं येऊन । सदाचार सत्य आचरून ।
सार्थकीं लावण्या तनमनधन । तुजला शरण आलोंसे ।।३
तव कृपा अति उपजली । मातृभू-सुसंस्कृति दाविली ।
जी इतिहासीं अखंड विलसली । भूमंडळीं उच्चतम ।।४
आतां द्यावी स्फूर्ति थोर । वर्णाया सद्धर्म आचार ।
जेणें लाभे श्रीहरिहर । इहजन्मीं या कलियुगीं ।।५
कर जोडोनि विनवितों । अनन्यभावें तुज प्रार्थितों ।
विश्वासोनि चरणीं बैसतों निश्चयफळ मिळविण्या ।।६
संसार जाणोनि अखिल जग । जगतीं लाभण्या तेजोमार्ग ।
कित्येक थोर महाभाग । भजती तुज विनायका ।।७

तैसेच धर्ममार्तंड अनेक । करोनि दर्शन **अष्टविनायक** ।
सकळसिद्धि अधिनायक । म्हणोनि तुजला वंदिती ॥८
मोरगांवीं मयूरेश्वर । पालीग्रामीं बल्लाळेश्वर ।
गांवों ओझर श्रीविघ्नेश्वर । गणेश रूपें पाहती तुज ॥९
सिद्धटेकीं सिद्धिविनायक । मढग्रामीं श्रीविनायक ।
लेण्याद्रीं गिरिजात्मक । आत्मभावें पूजिती ॥१०
थेऊरग्रामीं चिंतामणि श्रेष्ठ । रांजणगांवीं श्रीगणपती ज्येष्ठ ।
ऐसें अष्टविनायक-दर्शन इष्ट । म्हणोनि धांवती तुजकडे ॥११
जे जे असती शिवोपासक । वदती पहावा महाशक्तिदायक ।
म्हणोनि जाती पौराणिक । **ज्योतिर्लिंगें बारा** पहावया ॥१२
रामेश्वर, मल्लिकार्जुन, काशीविश्वनाथ । त्र्यंबकराज, भीमाशंकर वैजनाथ ।
केदार, महंकाळेश्वर, सोमनाथ । ऐशा स्थळीं स्तविती शिवशंकर ॥१३
ॐकारेश्वर, घृष्णेश्वर, नागेश्वर । ऐशीं हीं स्थळें पहाती पुण्यपर ।
बारा **ज्योतिर्लिंग** यात्रा निर्धार । पूर्ण व्हावया नियोजित ॥१४
द्वारका, पुरी, काशी, रामेश्वर । ऐशी यात्रा धाम चार ।
करण्या घेतां कष्ट अपार । सर्वां शांति न लाभते ॥१५
कर्ज काढिती यात्रेसाठीं । लागोनि पुण्याईचे पाठीं ।
तयां येतसे आडकाठी । पुण्यसंचय करतांना ॥१६
जेथें तेथें धोंडा पाणी । ऐशी असतां रामदासवाणी ।
क्षेत्रोक्षेत्रीं उगाच भटकणीं । कष्टविती देह मोक्षार्थी ॥१७
**"ठायींच बैसोनि करा एकचित्त" । हेंच वदती तुकाराम संत ।**
**पवित्र-आचार शुद्ध देहांत । पहा ईश्वर मोक्षदाता ॥१८**
या कारणें गुणेश गजवदना । तुवां निर्मिलें संस्कृति आश्रमांना ।
तेथ धाडिलें राष्ट्रगुरुवर्यांना । सदुपदेश अर्पाया भक्तजनां ॥१९
ऐसाच दावोनि मज आश्रम । ऐकविलीं सुवचनें अनुपम ।
जेथ **सद्धर्माचारकर्म** । वर्णिलें आचार्यें कल्याणप्रद ॥२०

तेंच कथितों वाचकजन । जेणें लाभे दिव्यवरदान ।
ईश्वरी कृपा पूर्ण अनुभवून । जीवन लागेल सार्थकीं ॥२१
आमुच्या भारतसेवा-आश्रमांत । राहे एक वेदोक्त धर्म पाळीत ।
मनीं राष्ट्रसेवा इच्छित । झाला शिष्य आश्रमीं ॥२२
त्रिकाळ संध्या, पूजा आचरीत । ग्रंथ पोथ्या, पुराणें, वाचीत ।
रुद्राक्षमाळा धारण गळ्यांत । करीतसे ईश्वर प्राप्तीसाठीं ॥२३
स्वसंसारा मारूनि लाथ । टाकोनि पत्नीपोरें रडत ।
देशसेवा आचारव्रतांत । रत होऊं इच्छितसे ॥२४
तयाचें पाहून आचरण । आचार्यें तया पाचारून ।
दिधलें जें व्यवहारज्ञान । तेंच ऐका वाचक ॥२५
सांप्रतच्या सुधारणायुगांत । भारताचें स्थान निश्चित ।
आदर्श व्हावें सुसंस्कृत । ऐसें वदती राष्ट्रभक्त ॥२६
**कारणें स्वीकारून नवधर्माचरण । सत्संगतीचें करोनि पालन ।**
**पुराणमतवाद त्यजून । धारण करावें नवजीवन ॥२७**
आचार-विचारांचें संक्रमण । करणें नव्हे अधर्माचरण ।
ऐसें मनीं पूर्ण जाणून । वर्तन करावें इहजन्मीं ॥२८
कलियुगाच्या नवराज्यांत । आचारविचारांच्या गोंधळांत ।
सुशिक्षित तैसे अशिक्षित । होती मूढ भारतीं ॥२९
पाश्चात्यांच्या सुधारणावादांत । आधुनिकतेच्या समाजशास्त्रांत ।
नाना राष्ट्रांच्या नीतितत्त्वांत । गोंधळ माजे हरघडीं ॥३०
**साम्राज्यशाही-भांडवलशाही । जुलमी द्वाड हुकूमशाही ।**
**तैशी साम्यवाद राजकशाही । ऐसे राज्यप्रकार उद्भवले ॥३१**
ऐशा जुलुमी कारभारांत । भरडलीं राष्ट्रें दुर्दैवांत ।
सौख्यसमाधान पावलें अंत । दैना जाहली भारतीं ॥३२
कोणी म्हणती जयभारत । कोणी गर्जती जयजगत ।
कांहीं पुकारती अण्वस्त्रांत । मानव विजयी होतसे ॥३३

कोणास आवडे निधार्मिकता । कोणास आवडे विश्वधार्मिकता ।
जाणा ही सर्व दांभिकता । लक्षण आत्मनाशाचें ॥३४

ऐशा जागतिक असमाधानांत । उपजले राजकारणी बुद्धिवंत ।
समाजवादी लोकशाहींत । श्रेष्ठता स्थापिली नाना राष्ट्रीं ॥३५

**समाजवाद कल्याणकारी** । उच्चनीच विषमता वैरी ।
जेणें संतोषतील कामकरी । सर्वांगीण प्रगति होवोनिया ॥३६

ऐसा समाजवाद अंगीकारुन । नवराष्ट्र व्हावया निर्माण ।
भारतीं केलें नियोजन । नाना योजना सर्वोदयी ॥३७

सत्य उपजण्या कल्याणोदय । व्हावी आत्मोन्नती तन्मय ।
नागरिक धर्म सत्यमय । आचरला पाहिजे तत्त्वता ॥३८

कारणें नसावा तत्त्वगोंधळ । नाना धर्मांची नसावी भेसळ ।
सुधारक म्हणोनि उच्छृंखल । कदापि न वर्तावें जीवनीं ॥३९

नष्ट झाली धर्म-नीति । पाश्चात्य-आचरणीं जडे प्रीति ।
कारणें वाटे चिंता, भीति । सर्वनाश नजीक येवोनिया ॥४०

रशिया-अमेरिका दुर्लक्षून । समाजोन्नति ध्येय अनुलक्षून ।
व्यक्तिशः सद्धर्म आचरून । चिरसौख्य मेळवावें ॥४१

प्राचीन जाणावे चार आश्रम । सुधारकी तत्त्वें जीं सर्वोत्तम ।
तयांचाही करोनि अभ्यासक्रम । सुधारावी दैनिक दिनचर्या ॥४२

जीवनीं मेळवाया संतुष्टता । समाजीं लाभाया सौख्यशांतता ।
आचरणीं पाहिजे सद्धार्मिकता । ऐसें अनुभवी सिद्ध असे ॥४३

**धर्म करी** समाजधारण । धर्म धरी दैनिक आचरण ।
धर्म करी संकटहरण । ऐसें महत्त्व धर्माचें ॥४४

धर्म माना परमेश्वर । देतसे जो इच्छित वर ।
धर्म निवारी अनाचार । राष्ट्रास राष्ट्रत्व देवोनिया ॥४५

निराकार विश्वीं पंचमहाभूतें । आचरती विश्वधर्मकर्मातें ।
जाणोनियां निसर्गनियमातें । नरें आचरावा मानवधर्म ॥४६

नराचा होई नारायण । ऐसें सद्धर्मव्रतपालन ।
तेथ लाभे अमरपण । ब्रह्मानंदही तेथ असे ॥४७
सद्धर्में लाभती चारी पुरुषार्थ । धर्म न जाणे कुस्वार्थ ।
भारतसंस्कृति-संरक्षणार्थ । धर्माश्रमतप आचरावें ॥४८
चौऱ्यायशी कोटि योनींत । मानवजन्म अपूर्व अभूत ।
ऐसें जाणोनि निश्चित । ऐका आतां सद्धर्मकर्म ॥४९
शुद्ध बीजाचे पोटीं । फळें निपजतीं रसाळ गोमटीं ।
ऐशा साधुवचन सिद्धतेपोटीं । **मातापिता असावे सद्धर्मी** ॥५०
जैशी खाण तैशी माती । मातापितरें असतां दुर्मती ।
तयांपासोन खास उपजतीं । कपाळकरंटीं बाळकें ॥५१
पुरुष सूक्ष्म बीजांतून । स्त्रीगर्भी होतें नवजीवजनन ।
मातृप्रेमें तेथ सुरक्षण । नवमास होई बालकाचें ॥५२
पचमहाभूतांची ठेव । उपजतां जन्माची हाव ।
त्वरित घे जगतीं धाव । अर्भकरूप घेवोनी ॥५३
होतांक्षणीं जन्म तयाचा । क्लेशस्वर उपजे रुदनाचा ।
जणों उद्देश गर्जण्याचा । जीवन जगतीं दुःखमय ॥५४
कोणी वदती ' कोऽहं ' पुसतें । कोणी म्हणती ' सोऽहं ' कथितें ।
स्वयं ब्रह्म ऐसें वदतें । बाळ येतां जन्मक्षणीं ॥५५
कैसेंही वदो तें बालक । परि जाणा हें निश्चयात्मक ।
जगतीं जीवन क्लेशदायक । असे जन्मापासोन ॥५६
बालकाचा टळण्या क्लेशताप । तया जाणोनिया निष्पाप ।
मातृहृदयीं थरकाप । भरतसे अनंत मातृप्रेमें ॥५७
धरोनि बाळा हृदयीं घट्ट । स्वदुग्धें करी संतुष्ट ।
व्हावया सर्वापदा नष्ट । प्राणापरी जपतसे ॥५८
**आर्य माता भारतीय प्राचीन । जाणोनि सशास्त्र बाळरक्षण ।**
**आचरित होत्या क्रमवर्तन । अतिधार्मिक श्रद्धेनें** ॥५९

घडतां दीर्घ कालांतर । पूर्वपश्चिम भिन्न आचार ।
एकत्र येवोनि निरंतर । गोंधळ उपजला आचरणीं ॥६०
निघालीं विविध प्रसूतिगृहें । तेणें भरे मन मोहें ।
परि बाजार सत्य तेथ आहे । ऐसें निश्चित जाणावें ॥६१
करितां होवोनि विचारवंत । सुप्रसूति करावी स्वगृहांत ।
हेंही होतां अशक्य कोटींत । ख्यात सूतिकागृह निवडावें ॥६२
सांप्रतच्या अन्नधान्य-टंचाईंत । सकसता नसे अन्नांत ।
तैशीच दही, दुग्ध, तुपांत । भेसळ असे नानाविध ॥६३
कारणें ऐशा उपासमारींत । पौष्टिकतेची पडोनि भ्रांत ।
नवमाता असती अशक्त । जणों शाप कलियुगाचा ॥६४
मातेनें असावें सदा शांत । गहन ऐशा वित्तस्थितींत ।
कष्टतां देह काळजींत । बालक अशक्त वाढतें ॥६५
**मातेनें असावें व्रतस्थ । काम-क्रोधादि आवरत ।**
**तैसेंच सुपथ्य आचरित । स्वास्थ्याप्रीत्यर्थ बालकांच्या** ॥६६
बाळाचें कौतुक करीत । झेलिती तयां अनेक ।
बसती दीर्घकाल चुंबत । तेणें हाल होती बालकांचे ॥६७
मातेनें न सोडावें बाळ । ममत्वें करावा प्रतिपाळ ।
तयाची होते अति आबाळ । सोपवितां तें सुइणीवरी ॥६८
बाळ वाढतां करिती लाड । खावया देती गोडधोड ।
तेणें बालक खादाड । आणि हट्टी वाढतसे ॥६९
**लाड असावे मातृप्रीतीचे । आयुरारोग्यबुद्धिवाढीचे ।**
**मातापित्यांच्या सद्वर्तनाचे । बालक जेधवा-वाढतसे** ॥७०
बाळास फुटतां मंगल वाचा । अवधान देवोनि त्याच्या वचा ।
शुद्धवाणी-शिक्षणाच्या । प्रयत्ना त्वरें लागावें ॥७१
तयाचे देखत शिवीगाळ । तैसें वर्तन अवखळ ।
आणि वाचा अमंगळ । कदापि न करावी तत्त्वता ॥७२

काळ जातां पुढें पुढें । बाळबुद्धि तैशी वाढे ।
**जैसें जैसें भोंवतीं** घडे । तैसं वर्ततें बालक ।।७३

जाणावें हें पुरतेपणीं । तयाभोंवतीं वातावरणीं ।
मोद भरावा, द्यावीं खेळणीं । वात्सल्यें धाक लावोनिया ।।७४

होतां बाळ पांच वर्षांचें । बालविकास शिक्षणाचे ।
**घडे द्यावया शिशुमंदिराचे** । द्वार दाविती कित्येक ।।७५

आजकालचीं शिशुमंदिरें । जाणों डांसाचिलटांचीं विवरें ।
असतीं अनारोग्यतेचीं द्वारें । तेथ कैचा विकास हो ।।७६

बहुत शिशुविकास-निकेतनें । असतीं वित्तप्राप्तीचीं साधनें ।
बाजारीं मांडलेलीं ऐशीं स्थानें । विश्वासूं नये शिक्षितांनीं ।।७७

कोणी म्हणती माँटेसरी । बालविकास दे अंतरीं ।
येथ श्रीमंतांचीं दिवाळखोरी । चालतसे सत्य जाणावें ।।७८

पूर्व-परीक्षा नीट करून । घ्यावें शिशुगृह तपासून ।
तेथ प्रमुखाचें ज्ञानलक्षण । तेंही परीक्षावें चाणाक्षपणें ।।७९

मातापित्यांनीं परमधर्म । जाणोनि बालकांचा शिक्षणक्रम ।
आचरावें सत्-शिक्षकाचें पुण्यकर्म । हाच मार्ग सर्वोत्तम ।।८०

**गृहशिक्षिका खरी माता** । शतशिक्षकांहून तत्त्वता ।
असोन बालशिक्षणाची पूर्तता । करितसे आदर्श हें सत्य असे ।।८१

तिन्हीसांजा दिवे लागणीं । छोटीं बाळें जवळ घेऊनी ।
तयांचें सुलभ ईशस्तवनीं । रमवावें पवित्र मानस ।।८२

श्रीगणेशा लेखनसुरुवात । तैसेच पाढे सोपें गणित ।
रामायण, भारत, कथा सांगत । शिक्षण द्यावें अतिप्रेमें ।।८३

देतां ऐसें सुलभ शिक्षण । बालमनीं उपजे थोरपण ।
तयांचें तदनंतर **शालाशिक्षण** । सांस्कृतिक विकासीं जातसे ।।८४

शालागृहीं जातां बालक । स्वच्छता अभ्यास ठाकठीक ।
यांचें होवोनि समीक्षक । तयाचें पाळावें सुवर्तन ।।८५

प्रातःकाळीं स्नानादि आचार । तदनंतर प्राणायाम, सूर्यनमस्कार ।
पश्चात् अध्ययनादि कर्तव्य व्यवहार । ऐसा दिनक्रम शिकवावा ॥८६

बालकां शिकवावें राष्ट्रगीत । सुलभ पठण संस्कृत ।
परभाषा शब्दज्ञान किंचित् । हेंही सांगणें योग्य असे ॥८७

ऐसा चालतां शालाध्ययनक्रम । सहज उपजे **ब्रह्मचर्याश्रम** ।
प्राचीन गुरुशिष्य उपक्रम । अति पवित्र जो मानला ॥८८

ऐशा आश्रमीं वर्तणें कठीण । असतां संस्कृति दीन हीन ।
ऐसे पातले कलियुगीं दिन । सुधारकांच्या जगतांत ॥८९

शिक्षकां न राहिला मान । गोंधळाचें झालें विद्यादान ।
विद्यार्थ्यां लागलें आकर्षण । भोंवतींच्या तमाशांचें ॥९०

राजकारणीं नाना पक्ष । वेधिती विद्यार्थ्यांचें लक्ष ।
तेणें होई पूर्ण दुर्लक्ष । विद्यार्जन-कर्तव्यीं ॥९१

तैशीं निघालीं विविध मंडळें । भोंदू संस्कृतीचीं स्थळें ।
वदती येथ धाडा बाळें । सर्वांगीण प्रगतीसाठीं ॥९२

विश्रांतिगृहें, नाटयगृहें, चित्रमंदिरें । आंग्लविलासचित्रें वैचित्र्यें ।
तैशी प्रणयध्वनिमुद्रिका स्वरें । आकर्षितीं मनें कुमारांचीं ॥९३

ऐशा अनीतीच्या वातावरणीं । मित्रपरिवार लाभतां दुर्गुणी ।
अध्ययनाचें होवोनि पाणी । दुर्वृत्त होती विद्यार्थीगण ॥९४

कारणें चित्त ठेवावें वर्तनावर । विद्यालय न धरितां जबाबदार ।
मातापित्यांनीं सदाचार । अपार बोधावा पाल्यांना ॥९५

लक्ष लावोनि सुशिक्षणाकडे । करवोनि घ्यावे दैनिक धडे ।
जरी दुर्लक्षें ऐसें न घडे । तरी शून्याकार होतसे अध्ययन ॥९६

विद्यार्थी व्हावया सुवर्तनी । **बालवीर सुवृत्त संघटनीं** ।
तयांच्या नामांची नोंदणी । करोनि व्हावें निश्चित ॥९७

ऐशी संघटना अति थोर । तेथ कायावाचामनावर ।
घडती शिस्तीचे सुसंस्कार । गुरुजनांच्या वात्सल्यगुणें ॥९८

सत्यप्रतिष्ठा, स्वदेशनिष्ठा । परसुखार्थ घेणें कष्टां ।
जातिभेदरहित विश्वबंधुता । ऐसा न्याय तेथ असे ॥९९
सकळ प्राणिमात्रीं सदयता । स्ववर्तनीं अति सभ्यता ।
आज्ञाधारकता, सुहास्यता । वर्तनक्रम ऐसा तेथ असे ॥१००
मितव्ययाची आदर्शता । कायावाचा मनशुद्धता ।
सत्शील आचार मुख्यत: । तेथ शिकविती प्रेमानें ॥१०१
ऐसे सद्गुण नागरिकत्वाचे । सत्य ध्येय बालवीर संस्थेचें ।
नियोजित असेतां तेथ कैचें । भय निष्पन्नते बालकां ? ॥१०२
पोहणें, खेळणें, स्वयंपाक करणें । रुग्णसेवा, प्रथमोपचार जाणणें।
विविध हस्तकला संपादणें । हेंही शिक्षण तेथ असे ॥१०३
वननिवासा जाउनि निसर्गांत । पशुपक्षिजीवन अभ्यासत ।
निसर्गदेवतेच्या सान्निध्यांत । मुलें फुलांसम सुशोभती ॥१०४
जातिभेदरहित संघटना । असे ही निधर्मी जाणा ।
तरी देशहितार्थ देती प्राणा । सभासद या संस्थेचे ॥१०५
बालवीरां मिळतें सुदिग्दर्शन । शालेय विषयांचें विद्यादान ।
तयांच्या पितृतुल्य आचार्यांकडून । हेंही वैशिष्टय येथ असे॥१०६
**'सन्नद्धोभव'** या ध्येयापोटीं । तयांमाजीं उपजे शक्ति मोठी ।
सर्वापदां झुंजण्यासाठीं । ऐसें सर्वत्र मान्य असे ॥१०७
प्रतिदिनीं सत्कृत्य आचरिती । हीच तयांची धर्मरीती ।
येथ सिद्धते विश्वप्रीति । ऐशी संस्था अपूर्व ही ॥१०८
ऐसें शिक्षण सर्वांगीण । बालबालिकां सर्वां देऊन ।
तयांचें होण्या अति कल्याण । झटावें मातापितरांनीं ॥१०९
बालवीरसंघटना-प्रचार । येथ नसे हा विचार ।
परि जो सिद्धला सदाचार । तोचि येथ वर्णिलासे ॥११०
कारणें बहि:शाल सर्वोन्नतीसाठीं । परीक्षावी संस्था योग्य मोठी ।
ना तरी शिक्षणाची हाकाटी । खास उपजते बालकांच्या ॥१११

सोळा वर्षें होतां वय । देहीं उपजे तारुण्य, प्रणय ।
क्रीडाविलासीं होती तन्मय । निसर्गधर्में विद्यार्थी ॥११२

वर्तनावरी मुलांमुलींच्या । लक्ष ठेवोनि बिघडण्याच्या ।
काळीं ऐशा संक्रमणाच्या । तयां सुरक्षावें शिस्तीनें ॥११३

पाश्चात्यांच्या संगतींत । आंग्ल सुधारकी उदोउदोंत ।
मुलांमुलींच्या सहशिक्षणांत । तारुण्यवृत्ति बळावते ॥११४

कोंवळीं पोरें आणि पोरी । मैत्री करोनिया अंतरीं ।
एकत्र खिदळतीं बाजारीं । अनिष्ट ऐशी प्रथा असे ॥११५

न जाणतां वय, जबाबदारी । निवडोनि आपली सहचरी ।
रंगवोनी प्रणयस्वप्नें नानापरी । रंगतीं जीवनीं मूर्खपणें ॥११६

नसे जबाबदार शालाशिक्षण । परि मातापित्यांचें दुर्लक्षपण ।
जया वदती आधुनिक । सर्वनाशी परिणामीं ॥११७

**विद्यार्थीसद्धर्म विद्यार्जन । ऐसें आदर्श ध्येय ठरवून ।**
**अति आदरावे गुरुजन । विद्याधन प्राप्त व्हावया** ॥११८

**विद्येची महती** आजवर । विद्वज्जनें वर्णिली अपार ।
तेथ काय मी पामर । वर्णू विद्यामृत-अपूर्वता ॥११९

विद्या मानावा ईश्वर । जो प्रसन्न होण्या खरोखर ।
कसावी लागते कंबर । विद्यार्जन उग्र तप जाणोनिया ॥१२०

टाकीचे घाव सोसतां । लाभे देव-आकारपूर्तता ।
विद्येस येण्या साकारता । कष्ट घ्यावे तरुण वयीं ॥१२१

प्रवृत्तिभाव-प्रकृतिधर्म । योग्य परीक्षावें बुद्धिवर्म ।
पश्चात् निश्चितावें अध्ययनकर्म । यश लाभण्या संपूर्णसे ॥१२२

अनेक विषयांचें थोडें ज्ञान । एका विषयाचें पूर्ण अध्ययन ।
येणें करोनि अष्टपैलूपण । मेळवावें विद्याध्ययनीं ॥१२३

विद्यार्जन करावें ज्ञानासाठीं । परीक्षेच्या नसावें पाठीं ।
ज्ञानपूर्तता होण्यापोटीं । उत्तीर्ण होतसे परीक्षा ॥१२४

परीक्षेचा धरोनि ध्यास । जे आचरिती अति अभ्यास ।
तयांचा बुद्धिवैभव ऱ्हास । खास होतसे जाणावें ।।१२५
बुद्धीचें वाढतां वैभव । संपत्ति, कीर्ति, सुयशास्तव ।
न भजावा लागे देव । दैवें सुदैव लाभतसे ।।१२६
कारणें चित्त ठेवोनि गंभीर । राजकारणीं न व्हावें चूर ।
विद्यार्जनीं जेणें अस्थिर । सुबुद्धही होती सांप्रत ।।१२७
ऐसा काळ शालाध्ययनाचा । जाणोनि उज्ज्वल जीवनाचा ।
पाया, आचरावा सत्प्रवृत्तीचा । दैनंदिनीं कार्यक्रम ।।१२८
वावळा विद्यार्थीवेष नसावा । सभ्य, नीटनेटका असावा ।
अंतरीं नसावा दुष्ट कावा । परहानीचा स्वार्थासाठीं ।।१२९
बाजूस ठेवोनि पाठ्यपुस्तक । दीपिका, टिपणें, मार्गदर्शक ।
वाचिती विद्यार्थी अनेक । जेणें उथळ ज्ञान लाभतसे ।।१३०
अनेक शिक्षकां लांच देती । चोरून उत्तरें अनेक लिहिती ।
ऐशी उपजतां चित्तीं दुर्मती । विद्यापावित्र्य डागाळतें ।।१३१
चालू असतां विद्याध्ययन । करावें शक्य तें द्रव्यार्जन ।
तेणें उपजतें विशेष ज्ञान । धनप्राप्तीच्या तत्त्वांचें ।।१३२
ऐसें मिळवितां स्व-कष्टें धन । माता-पित्यां लाभे समाधान ।
पाल्याचा मानिती अभिमान । कौतुक करून तयांचें ।।१३३
**थोर वंदिती तीन माता । स्वमाता, भूमाता, गोमाता ।**
पूजकां ज्या पूर्ण पावतां । जीवन होई अति धन्य ।।१३४
जन्मदात्री अपुली माता । दिधली जिनें जगीं सदेहता ।
ऐशी तियेची अपूर्वता । जाणोनि पूजावी देवतेसम ।।१३५
स्वमाता असतां अशिक्षित । तिज म्हणों नये अर्धवट ।
मनोभावें मातृसेवाव्रत । आचरावें सर्वत्र भक्तीनें ।।१३६
तैशीच पूजनीय गोमाता । दुग्ध पुरवून मानव-जगता ।
देतसे देहा अन्नपूर्णता । ऐसें जाणोनि आदरावी ।।१३७

करितां राष्ट्रीं गो-संवर्धन । वाढे बल, ऐश्वर्य, स्वसंरक्षण ।
सुसिद्ध जाणोनि हें सुलक्षण । गोमाता वंदावी विश्वासें ॥१३८

भूमाता अर्पिते जल-धान्य । जेणें भूलोकीं लाभे जीवन ।
भूमाता मातृभू जाणोन । स्वदेश-पूजन आचरावें ॥१३९

ऐशा त्रिमातांचें पूजन । तैसेंच तयांचें प्रतिपालन ।
जे अभ्यासिती विद्यार्थीगण । अतिथोर तयांचें भवितव्य ॥१४०

**मातृदेवो भव, पितृदेवो भव । आचार्यदेवो भव, अतिथिदेवो भव ।**
**राष्ट्रदेवो भव, धर्मवचनें एव । ऐशा सुसंस्कृति विराजते ॥१४१**

**सत्यं वद, धर्म चर । ऐशा सुतत्त्वींही सदाचार ।**
**दर्शविलासे जनहितपर । भारतीय संस्कृतींत ॥१४२**

**ऐसे सद्गुण आचरून । करितां लेखन-पठण-वाचन ।**
**विद्यार्जनीं दतां तनमन । विद्यादेवी प्रसन्नते ॥१४३**

ऐसें विद्यादेवी-आराधन । करितां सुवृत्त तपाचरण ।
संपूर्ण होतें शालाजीवन । ब्रह्मचर्याश्रम प्रथम भाग ॥१४४

ब्रह्मचर्याचा प्रथम भाग । पूर्ण होतां मागोमाग ।
सहज उपजे मनीं जाग । काय करावें म्हणोनियां ॥१४५

निर्धन शोधिती कामधंदा । तो न मिळतां नाना फंदा ।
**धरिती ते कुमार्गी छंदा । नाश जे करिती जीवनाचा ॥१४६**

करण्यापायीं उदरंभरण । अनेक विस्मरती सदाचरण ।
तैसें व्हावया बेकारी-निवारण । आचरिती अनंत चौर्यकर्म ॥१४७

अनेक घुमती मित्रांकडे । खावया भिकेचे तुकडे ।
जैशी दरवेशाचीं माकडें । नाचती देखतां अन्नग्रास ॥१४८

नाना व्यसनीं अनेक पडती । पैशासाठीं खिसे कापती ।
चौर्यधन तैसे उधळितीं । सट्टे, रेस, जुगारांत ॥१४९

दोस्तांसवें विश्रांतिगृहीं । चहापानीं रमती कांहीं ।
गर्वें देती सर्वां ग्वाही । आम्ही शिष्ट म्हणोनियां ॥१५०

ऐसें होतां व्यतीत जीवन । षड्रिपूंचें वाढे प्रबळपण ।
अंगीं येवोनि उद्दामपण । शिव्या देती नातलगां ॥१५१

ऐसा न करावा आत्मनाश । बेकारस्थितींतही अभ्यास ।
करोनि धरावा निजध्यास । हस्तगत करावया हस्तकला ॥१५२

अथवा करावी उमेदवारी । नम्रत्वें मेळवावे व्यापारी ।
स्वीकारावी तयांची सेवाचाकरी । भावी उत्कर्ष व्हावया ॥१५३

अनुभवें येईल शहाणपण । कामधंद्याचें लाभेल ज्ञान ।
तेणें धनप्राप्ति-साधन । सहज उपजेल मानसीं ॥१५४

आळस कामाचा खरा वैरी । जाणावें हें अंतरीं ।
उमजा दीर्घोद्योग्याचे घरीं । लक्ष्मी पाणी भरितसे ॥१५५

**कष्टांत नसे उच्चनीचता । नोकरीधंद्यांतही तत्त्वता ।**
**परी अंगीं पाहिजे सत्वशीलता । यशस्वी जीवन व्हावया ॥१५६**

बेकारास नसे जगीं मान । न जाणतां हा अपमान ।
धरावा अंतरीं अभिमान । स्वकष्टें धन मिळवण्या ॥१५७

निरुद्योगी खिदळिती, बसती । दुजाची करिती नालस्ती ।
तिन्ही काळ घरचें खाती । निर्लज्जपणें परियेसा ॥१५८

**सेवाव्रताची धरितां कांस । स्वकष्टाचा मिळे घांस ।**
कारणें न भितां जननिंदेस । स्वकष्टें अन्न मेळवावें ॥१५९

फेडण्या अन्नदात्याचें ऋण । स्वार्थासि जाणोनि तृण ।
तयांचा सेवाधर्म आचरून । उपकार स्मरावे सर्वदा ॥१६०

जैसें लिहिलें नशिबांत । तैसें होईल भविष्यांत ।
ऐसें मूढपणें वदत । स्वस्थ बसती निरुद्योगी ॥१६१

निसर्ग जाणा परिस्थिती । सभोंवतींची वस्तुस्थिति ।
क्वचित्प्रसंगीं निसर्गकृति । ऐसें वदती विचारवंत ॥१६२

**द्याव्या टकरा परिस्थितीशीं । झुंज द्यावी नशिबाशीं ।**
**तेणें उपजेल ललाटरेषीं । सुदैव खास परियेसा ॥१६३**

जाणावी स्वतःची पात्रता । कामधंद्याची योग्यता ।
अतिप्राप्तीची संपन्नता । मनीं नसावी आरंभीं ॥१६४
मिळे न धंदा शहरांत । जावें त्वरित खेड्यांत ।
तेथ गरिबांच्या सेवेंत । जीवन वेचावें नम्रपणें ॥१६५
गहन सेवाव्रत आचरितां । खेडुतांच्या मनीं सदयता ।
उपजेल सेवक देखतां । तेणें लाभेल अन्नोदक ॥१६६
**दारिद्र्यांत जगतीं जन्मले । स्वकष्टें धनवंत झाले ।**
**ऐसे अनेक जगीं गाजले । झाले आदर्श भूमंडळीं ॥१६७**
सद्यःस्थिति असे समस्यांची । वाढ होतसे बेकारांची ।
नसावी वृत्ती भिकाऱ्यांची । जिणें जेणें लाजिरवाणें ॥१६८
चणे खावे लोखंडाचे । तेव्हां ब्रह्मपदीं नाचे ।
कारणें योग्य कामधंद्याचें । ज्ञान घेण्या कष्टावें ॥१६९
ऐसें आचरितां अन्नघांस । मिळेल दैनिक हमखास ।
तोचि देईल सुबुद्धीस । धनप्राप्ती-मार्गाच्या ॥१७०
निर्धनांनीं संघ स्थापावा । सहकार्यें धंदा मेळवावा ।
दारोदार माल विकावा । विश्वासू वृत्ति धरूनिया ॥१७१
निर्धनांची ऐशी स्थिति । हीन असे हो सांप्रतीं ।
तयांना अन्नवस्त्रप्राप्ति । धनिकांनी करावी औदार्यें ॥१७२
आतां ऐका श्रीमतांचीं । पोरें शाळाक्रम संपतांचि ।
वाट धरिती महाविद्यालयांची । स्वपात्रता न जाणतां ॥१७३
**उच्च शिक्षण अभ्यासक्रम । असे गहन तपश्चर्यासम ।**
**नसे चैन विलास-आश्रम । महाविद्यालय हें जाणा ॥१७४**
पालक करिती काबाडकष्ट । पाल्यां लाभण्या विद्या श्रेष्ठ ।
देवोनि धनसंपदा संतुष्ट । होती, स्वकर्तव्य आचरोनी ॥१७५
परि पाल्य भटके इकडे तिकडे । शृंगार-विलासीं सदा सांपडे ।
प्रणयासाठीं मरे तडफडे । गद्धेपंचविशी उपजतां ॥१७६

गद्धेपंचविशीचें वय । सदा अविचार कृतिमय ।
जेधवा नाना वासना-संचय । उद्‌भवे मत्त यौवनांत ॥१७७
नाटय-चित्रपट-तमाशे । चित्त यांच्या मोहें नासे ।
तरुण खातीं अंडीं, मासे । खास परदेशी खाद्यभुवनीं ॥१७८
कित्येक आळविती भावगीतें । नटती, खिदळती मनसोक्तें ।
तंबाखू ओढिती स्वमतें । व्यक्तिस्वातंत्र्य म्हणोनिया ॥१७९
ऐसें अनुभवीत स्वातंत्र्य । सहज होती परतंत्र ।
राजकारण पक्ष मंत्र । तयां मुग्ध करीतसे ॥१८०
कोणी होती साम्यवादी । अनेक बनती समाजवादी ।
अन्य मिळविती तैशी गादी । पक्षपुढारी होवोनियां ॥१८१
राजकारणी नाना पक्ष । ठेवोनि युवकांवरी लक्ष ।
करण्या प्रबळ आपुला पक्ष । आमिषें दाविती तरुणांना ॥१८२
जया न उमजे राजकारण । तया तत्त्वज्ञान विनाकारण ।
गहन अजब कथन करून । शासकांविरुद्ध उठविती ॥१८३
राज्ययंत्र करूं खिळखिळें । उकरूं शासकांचीं पाळेंमुळें ।
ऐशा गर्विष्ट वल्गनांमुळें । बहकती विद्यार्थी पशूसम ॥१८४
कोणी वदती प्रांत जोडा । कोणी पुकारिती धर्म तोडा ।
अनेक गर्जती कायदे मोडा । लाभण्या राज्य स्वपक्षाला ॥१८५
ऐशीं ढोंगें आचरून । न कळे किंचित् राजकारण ।
दुर्लक्षून विद्यातपाचरण । बेशिस्त बनती विद्यार्थी ॥१८६
महाविद्यालय-आवारांत । नानापरी घोषणा करीत ।
खिडक्या, दारें, दिवे फोडीत । दंगा करती मस्तपणें ॥१८७
मजूरराज्य झिंदाबाद । भांडवलशाही करूं बर्बाद ।
जयजय बोला साम्यवाद । ऐशा गर्जती गर्वोक्ति ॥१८८
पक्षध्वज घेऊनी हातीं । झिंदाबाद ऐसें गर्जती ।
सत्य नोहे ही सुसंस्कृति । विद्याध्ययन-आश्रमीं ॥१८९

विद्येविना मर्कटचेष्टांत । अश्लील ऐशा वर्तनांत ।
जयांचें जडे चित्त उन्मत्त । तयांचा बुद्धिनाश अटळ असे ॥१९०

वर्तती ज्या वर्गभगिनी । तयांवरी नयनबाण रोखुनी ।
आणि शृंगारचेष्टा आचरूनी । अनेक रंगती विद्यार्थी ॥१९१

नाना व्यसनीं जडतां चित्त । शरीर झडतें जातें वित्त ।
विद्याभ्यास उरे निमित्त । नाश व्हावया जीवनाचा ॥१९२

वर्ष जाई चकाट्या पिटतां । नभोवाणी वाद्यवृंद ऐकतां ।
नटतां, भटकतां, स्वैर खिदळतां । तेथ कैचें विद्यार्जन ॥१९३

उत्सव, सभा, प्रदर्शन । येथ जाती विद्यार्थीगण ।
तेथ युवतींशीं खेटून । आचरिती असभ्यता पाशवी ॥१९४

कारणें स्वहितदक्ष होऊन । करोनि दूर अनीति आचरण ।
तैसेंच दूर राजकारण । चित्त उच्च शिक्षणीं लावावें ॥१९५

विद्येचें वय व्यर्थ जातां । पदरीं लाभे कर्मदरिद्रता ।
पशुतुल्य जिणें जगतां । मृत्यु येतसे श्वानापरी ॥१९६

विषय-महत्त्व जाणोन । नीट अभ्यासावें राजकारण ।
जेणें उपजेल स्वराष्ट्राभिमान । देशोन्नति करावया ॥१९७

जीवनीं येतां स्थैर्यपण । संपतां पूर्ण विद्याध्ययन ।
खुशाल घ्यावें पुढारीपण । सुयोग्य पक्षप्रणालीचें ॥१९८

अग्रणी व्हावे विद्यार्थीगणांत । व्हावे अति मान्य अध्यापकांत ।
व्हावे पुढारी अध्ययनांत । शिष्यवृत्ती मिळवूनी ॥१९९

पाळावे सभ्य शिष्टाचार । भगिनीवर्गास अत्यादर ।
देऊन तोपवावा सत्वर । ईश्वर अंतःकरणींचा ॥२००

श्रमदान, वित्तदान, विद्यादान । यांत घालवावे विश्रांतिदिन ।
येणें साधावें समाजकल्याण । उच्चाध्ययन आश्रमीं ॥२०१

पाश्चात्य ग्रंथ अभ्यासावे । तेणें उच्च तंत्रज्ञान जाणावें ।
तैशीच अंतःकरणीं धरावी । उद्योगोन्नति स्वदेशाची ॥२०२

महाविद्यालयीन जीवनांत । अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांत ।
विधज्ञान सुधारणा-युगांत । सहजरीत्या लाभतसे ॥२०३
विनीताचे सशास्त्र कार्यक्रम । ऐकतां प्रवीणांचे मनोरम ।
म्हणजे स्वर्गीय संगीतसम । भारतीय परंपरा गायनाची ॥२०४
नाटकें, व्याख्यानें, प्रदर्शनें । नभोवाणी विद्वज्जन-संभाषणें ।
ऐशा अनेक उपक्रमानें । सुयोग्य ज्ञानवर्धन होतसे ॥२०५
ऐसे कार्यक्रम पारखून । विलासभोगात्मक टाळून ।
बुद्धिवर्धनात्मक अभ्यासून । सर्वांगीण ज्ञान मेळवावें ॥२०६
**शक्तितेजवर्धन मुख्य काम । ऐसें जाणोनि घ्यावा व्यायाम ।**
**शरीर करावें बलभीमासम । पंचविशीच्या तरुणपणीं ॥२०७**
उच्चाध्ययनवय अपूर्व असे । जीवनोत्कर्षध्येय तेथ वसे ।
नराचा नारायण होतसे । जगद्वंद्यता लाभोनिया ॥२०८
**न भूतो न भविष्यति । ऐशी मानवा हातीं मानवप्रगति ।**
**शास्त्रज्ञ जगतीं हेंच दर्शविती । सप्त आश्चर्यें निर्मूनिया ॥२०९**
कोहिनूर मानवें उत्खनिला । जगतीं अजोड सन्मानिला ।
भारतवैभवीं तेजाळला । आश्चर्य ठरला जगताचें ॥२१०
मानवें बांधिला ताजमहाल । बांधणी, रचनेंत अतिविशाल ।
तयाचें सौंदर्य त्रिकाल । ठरलें आश्चर्य भूतलाचें ॥२११
भोंवतीं चीन देशाच्या । बांधिल्या भिंती तटबंदीच्या ।
मानवकष्ट पराकोटीच्या । जगतीं आश्चर्यें गाजल्या २१२
'पिरॅमिड' थडगीं इजिप्तदेशीं । जणों त्रिकोणी डोंगरराशी ।
अतुल्य ख्यात सर्व देशीं । उभारलीं मानवें विस्मयकारी ॥२१३
प्रचंड उभारिले पहारेकरी । नाईल नदी तीरावरी ।
मात करोनि शिल्पशास्त्रावरी । करूनि सिद्धले महदाश्चर्य ॥२१४
पिसाचा मनोरा इटली देशीं । ढळता गुरुत्वमध्य भूप्रदेशाशीं ।
बांधोनि आव्हान स्थापत्याशीं । दिधले मानवें आश्चर्य हें ॥२१५

मुखवटे देशभक्तांचे अमेरिकेंत । अतिप्रचंड खोदून डोंगरांत ।
निर्मिलें आश्चर्य जगतांत । मानवें अतिकष्ट आचरुनी ॥२१६

ऐशीं सप्त आश्चर्यें निर्माण । करोनि पराभविलें तर्क-विज्ञान ।
ऐसें महाशक्तीचें प्रमाण । मानवी बुद्धिवैभव दावितें ॥२१७

पंचमहाभूतांचें विच्छेदन । तैसें अणुरेणूंचें विभाजन ।
करोनि लाभलें महाअस्त्रज्ञान । पाश्चात्य शास्त्रसंशोधकां ॥२१८

निसर्गशक्तीशीं लढा देऊन । मानव करी विश्वपरिभ्रमण ।
अंतराळीं नवग्रह स्थापन । करोनि होतसे विश्वंभर ॥२१९

लिंकन महासेवक अमेरिकेचा । हिटलर हुकुमशहा जर्मनीचा ।
स्टालिन सत्ताधारी रशियाचा । स्वकष्टें उच्चपदीं विराजले ॥२२०

अनेक दारिद्र्यांत जन्मले । कष्टाभ्यासें परमपद पावले ।
भूलोकीं आदर्श सिद्धले । ऐसा नरदेह अपूर्व असे ॥२२१

ऐशीं चरित्रें आदर्श ठेवून । सर्वोच्चपदप्राप्ति ध्येय ठरवून ।
अध्ययनीं लावावें सर्व तनमन । सन्मान लाभण्या जगतांत ॥२२२

आजकालच्या शिक्षणक्रमांत । नाना विद्यापीठांच्या गोंधळांत ।
खंडोगणती छात्र उत्तीर्ण होत । पदव्या मिळविती नानाविध ॥२२३

ऐशा पदवीधरां नसे मान । धंद्यापाठीं भटकता विपण्ण मन ।
होई अवलोकितां स्थिति दारुण । चाकरी कोठें न लाभतां ॥२२४

जया ज्ञान उच्च श्रेणीचें । तया निमंत्रण उच्चाधिकाराचें ।
तसेंच पाचारण सुखसमृद्धीचें । सांप्रत नवयुगीं लाभतसे ॥२२५

विद्याप्राप्तीत जेथ श्रेष्ठत्व । तेथ लाभे व्यवहारीं ज्येष्ठत्व ।
हाच सत्य न्याय, हेंच सत्तत्त्व । ऐसें ओळखावें निश्चित ॥ २२६

कारणें श्रेष्ठत्व प्राप्त व्हावया । लाथाडोनि सर्व भोग, माया ।
रात्रंदिन अर्पावी काया । प्रसन्न होण्या विद्यादेवता ॥२२७

प्राप्त होतां ऐसें विद्याधन । वंदावें माता, पिता, गुरुजन ।
तयांचा आशीर्वाद मिळवून । संपवावा ब्रह्मचर्याश्रम ॥२२८

मराठी ग्रंथ ... ठाणे ... स्थळक्रमांक
वि: ...

ब्रह्मचर्याश्रमाचे नियम । जाणा षड्‌रिपूंचा संयम ।
जो आचरितां विद्याक्रम । पूर्ण होई तेजोमय ॥२२९
ऐसा आश्रम पूर्ण होतां । ये अधिकारपद-पात्रता ।
राज्यशासनीं उच्चत्व लाभतां । फलप्राप्ति हो कष्टांची ॥२३०
कलियुगाच्या जग-संभ्रमणांत । विद्यावंतही बेकार राहात ।
इच्छा तेथ मार्ग आक्रमीत । परि धनप्राप्ति करिती बुद्धिबळें॥२३१
कष्टबळांतीं लाभे महाफळ । धनसौख्यलाभ होईल अचल ।
हृदयांतरीं तेजाळे निश्चळ । समाजसेवा महाव्रत ॥२३२
ऐसें थोर विद्वत्तालक्षण । श्रोतियां केलें म्यां कथन ।
करावें सुशांतवृत्तीनें चिंतन । ऐशी विनवणी सेवाश्रमाची ॥२३३
आतां ऐका वाचकजन । आचार्यें ऐसें महत्-प्रवचन ।
करोनि केलें सर्वां वंदन । श्रोतृवृंदां आदराचें ॥२३४
अध्यायारंभींचा समाजसेवक । होता जो स्वकुटुंबभेदक ।
व्हावया राष्ट्रसेवाश्रमीं उपासक । होतां ऐकत आचार्यबोध॥२३५
तयाचें कैचें समाधान । जाहलें जाणण्या सुबुद्धजन ।
पुढतीं अध्याय संपूर्ण । वाचा अतिश्रद्धेनें ॥२३६
असो, श्रोते गर्जले जय भारत । मुखीं विराजलें देशसेवाव्रत ।
सिद्ध तेंचि भूलोकीं अमृत । अमरत्व देई मानवां ॥२३७
कारणें सद्धर्मव्रतें आचरावीं । हीच ब्रह्मचर्याश्रम थोरवी ।
जेणें मातृभू संतोषवावी । भूमंडळीं दिव्य विराजण्या ॥२३८
इति श्रीभारत-दीप ग्रंथाचा । भारतसद्धर्म कथनाचा ।
ब्रह्मचर्याश्रमज्ञान विभागाचा । नववा अध्याय संपूर्ण हा ॥२३९

# अध्याय दहावा

## गृहस्थाश्रम-वानप्रस्थाश्रम
## (आधुनिक आचरण)

श्रीगणेशाय नमः ॥

श्रीमंगलमूर्ति गजानन । उपजतां तव कृपेचे किरण ।
ये बुद्धीस नवचेतन । अनारोग्य-विस्मरण होवोनिया ॥१
कारणें ग्रंथलेखन होण्यासाठीं । कदापि न दूर लोटी ।
आशीर्वाद असावा मजपाठीं । ऐसें प्रार्थी दीनवत्सला ॥२
काळ भासे अति विक्राळ । डंखूं पाहे तिन्ही त्रिकाळ ।
तारक तूंच एक केवळ । मजला मंगलदायका ॥३
अलभ्य असे नरदेहप्राप्ती । पुनश्च न लाभे कल्पांतीं ।
ऐसें पूर्ण जाणोनि चित्तीं । परमार्थसाधन योजिलें ॥४
परमार्थ-आचार अति गहन । असे उग्र तपसाधन ।
अनारोग्यें अपात्र जाणोन । जाहलों मूढ क्षणभरीं ॥५
परि सद्गुरु तुज जाणिलें । तव चरणीं तन वाहिलें ।
तत्क्षणीं मन संतोषलें । तव कृपादृष्टि लाभोनिया ॥६
आज मिळालें तें फळ । लिहिले नऊ अध्याय निश्चळ ।
तुवां दिधलें मज बळ । पुढतीं ग्रंथलेखना ॥७
हीच माझी देशसेवा । येथ नसे स्वहित कावा ।
सद्भाव मम पुरवावा । दीपग्रंथ पूर्ण करोनिया ॥८
पुढतीं ऐका वाचकजन । होतां शुभ प्रभातदर्शन ।
तेजाळले सुवर्णकिरण । सेवाश्रमीं रविदेवाचे ॥९

आज महत्त्वाचा दिन । आचार्य करणार कथन ।
गृहस्थाश्रमयोग-विवेचन । म्हणुनी आतुरले सर्व सेवक ॥१०
येतां प्रवचनाची वेळ । सर्व श्रोते झाले अचल ।
शोभे औदुंबरवृक्षतळ । तयांच्या वर्तुळाकृति आसनांनीं ॥११
होतां मुख्याचार्य उपस्थित । सर्वत्रांनीं दिधलें चित्त ।
सर्वां वंदूनि सस्मित । गुरुजी सांगू लागले ॥१२
आजच्या आधुनिक जीवनांत । महाविद्यालयशिक्षणांत ।
सुसंबद्धता होतां प्राप्त । एकता उद्भवे ज्ञानग्रहणाची ॥१३
अनेक विद्यापीठें राष्ट्रीं वर्ततां । तैशी अध्ययनक्रमाची भिन्नता ।
येतसे ज्ञानबुद्धिकुशाग्रता । वेगवेगळ्या श्रेणींची ॥१४
पदाधिकारनाम एक असतां । वर्ततां विषयांची भिन्नता ।
उद्भवे पात्रतेची अभावता । जीं व्यवहारीं नडतसे ॥१५
भिन्न प्रांतीं भिन्न शिक्षण । तेणें प्रांतोप्रांतीं भांडण ।
तेथ ज्ञानार्जनीं उच्चपण । कैचें लाभे शिष्यवर्गा ॥१६
**सर्व राष्ट्रीं एक शिक्षण । हेंचि एकता-लक्षण ।**
**ऐसें पूर्ण जाणोन । नियोजावा अभ्यास तज्ज्ञांनीं ॥१७**
**एक विद्यापीठ राष्ट्रीं असावें । मध्यवर्ती तया संबोधावें ।**
**प्रांतिक पीठांनीं पाळावे । अधिकृत नियम मध्यवर्तीचे ॥१८**
एकच परीक्षा एका श्रेणीची । असावी भिन्न प्रांतीं सर्व राष्ट्राची ।
सुयोजित पाठ्यपुस्तकांची । वाद टळण्या पात्रतेचा ॥१९
ऐशा होतां नाना परीक्षा । पूर्णता पावतील आकांक्षा ।
वाढेल उद्योगाधिकार-कक्षा । बेकारी नष्ट होवोनिया ॥२०
धंदा नसावा विद्यापीठस्थापन । पवित्र कर्तव्य विद्यादान ।
ऐसें जाणोनि छात्र-कल्याण । करावें विद्याधिकाऱ्यांनीं ॥२१
**शाळा आणि महाविद्यालयांत । विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमांत ।**
**किंचित् भिन्नता विषयांत । असावी हेंच योग्य असे ॥२२**

विज्ञान-साहित्य-शास्त्र शिकतां । लाभते बुद्धीस कुशाग्रता ।
परि गृहिणीकर्तव्य कमतरता । उरतसे सांप्रत स्त्रीशिक्षणीं ।।२३
चालू असतां ग्रंथज्ञानार्जन । विद्यार्थिनींना द्यावें गृहशास्त्र-शिक्षण ।
जेणें लाभेल सर्वांगीण । शिक्षण भारतीं युवतींना ।।२४
स्वच्छता, टापटीप, शिवणकाम । पाकशास्त्र, प्रथमोचार-ज्ञान ।
तैसें महत्त्वाचें रुग्णसेवाचरण । ऐसे विषय शिकवावे ।।२५
रांगोळी, भरतकाम, विणकाम । शिशुसंगोपन मातेसम ।
वेषसौंदर्यज्ञान अनुपम । हेंही शिकवावें युवतींना ।।२६
नृत्य-गायन-वादनकला । इत्यादि शिकवितां ललितकला ।
माधुर्य लाभे स्त्रीजीवनाला । ऐसें निश्चित समजावें ।।२७
युवतींना यावें जलतरण । चित्रकलादि रंगचित्रण ।
तयांनीं गाजवावें क्रीडामैदान । विविध खेळ खेळूनिया ।।२८
ललनांना यावी लाठी-बोथाटी । उपयुक्त जी स्वसंरक्षणासाठीं ।
ना तरी तयांचे सदा पाठीं । अबलापण लागेल जन्मभर ।।२९
असो; येथ जरी विषयांतर । झालें तरी तें हितकर ।
जाणोनि सुयोग्य भिन्नतेवर । लक्ष असावें महिला-शिक्षणीं ।।३०
सांप्रतच्या सहशिक्षण-युगांत । सभासंमेलनादि महत्प्रसंगांत ।
सहवास उद्भवे युवकयुवतींत । परिणामीं प्रणय येवोनिया ।।३१
**ब्रह्मदेवाच्या निर्मितींतून । प्रेमभावना उद्भवली ॐकारांतून ।**
**तेणें जाहलें विश्व निर्माण । ऐसें प्रेम पवित्र असे ।।३२**
परम पवित्र देवदेवतांनीं । पवित्र प्रणय आचरोनि ।
रूढीसंकेत दूर करोनि । मीलनानंद अनुभविला ।।३३
ऋषिमुनि तपाचरणीं । स्त्रीस्वरूपास संमोहूनी ।
गाजले प्रणयाग्रणी पुराणीं । ऐसें प्रेम निसर्ग असे ।।३४
प्रकृति-पुरुष एकीकरण । जाणा लक्ष्मीनारायण ।
शरीर आत्मा एकीकरण । विना संजीवन अशक्य असे ।।३५

अंतरात्म्याच्या शांतीसाठीं । शरीरस्वास्थ्याच्या सुखासाठीं ॥
निसर्गशुद्ध जीवनासाठीं । शुद्ध प्रेम पाप नोहे ॥३६
कारणें तारुण्यीं प्रणय नैसर्गिक । परि अंतीं ठरण्या उपकारक ॥
बुडों नये प्रणयपंकांत । हाच सर्वोत्तम मार्ग असे ॥३७
ऐसी अशक्यता उद्‌भवतां । युवकांनीं घ्यावें विशेष चित्ता ।
**प्रणयीं नसावी अश्लीलता । जिकावीं मनें सेवाबळें ॥३८**
प्रेमांत पडती प्रथमदर्शनीं । तयांची होत बुद्धिहानी ।
तयांच्या ध्यानीं, मनीं स्वप्नीं । भोग अवस्था खास असे ॥३९
प्रेम ऐसें पाशवी निश्चित । नसे जें पूर्वपरीक्षित ।
जें न जाणे कुळ-वय-जात । ठरे घातुक दोन्ही कुळां ४०
नसतां एकता संस्कृतीची । नसावी आंस अंतरीची ।
यशस्वितेच्या सहजीवनाची । पतिपत्नी होवोनि भवितव्यांत ॥४१
कारणें प्रथमदर्शन प्रेम दांभिकता। आचरून न करावी इच्छापूर्तता।
वदती बुद्ध ज्या पशुतुल्यता। महाकलंक संस्कृतीचा ॥४२
**प्रणयीं असावा सेवाधर्म । आवरोनि धरावा कायाधर्म ।**
**निष्कामवृत्तीचें परम कर्म । ऐसें प्रेम स्वर्गीय ॥४३**
प्रेम असतां पूर्वपरिचित । करावें ठाऊक उभय कुळांत ।
समानधर्मी कुळाचारांत । प्रेमविजय सौख्य दे ॥४४
प्रेमांत असावी एकनिष्ठता । दोन आत्म्यांची प्रबलता ।
ऐशी असतां एकतत्त्वता । अमरत्व लाभे प्रीतीला ॥४५
**अधिकार लागे प्रणयाला । अगोदर लागावें धनप्राप्तीला ।**
**अन्न मेळवावें उदरंभरणाला । योग्यता यावया प्रियकराची ॥४६**
मातापित्याचें पालन-पोषण । तैसे कनिष्ठांचें हितसाधन ।
जाणावें प्रथम कर्तव्याचरण । धनप्राप्तीच्या प्रारंभीं ॥४७
पश्चात् ध्येय योजावें जीवनाचें। गृहस्थाश्रमाचें वा अविवाहिताचें।
ठरतां तेंही देशसेवाहिताचें । अविवाहित रहावें जन्मभर ॥४८

अथवा आचारोनि जगरहाटी । स्वकुटुंबीं रत होण्यासाठीं ।
लागावें वधूसंशोधनाचे पाठीं । अभिनव सौख्य लाभण्या ॥४९

असतां वधू पूर्वपरिचित । ज्ञात असे जात-कुळ-गोत ।
जाणावा ऐसा सुदैवांत । सुयोग सत्य सौख्याचा ॥५०

वधू नियोजितां स्वसंस्कृतीची । कुलाचार-धर्म-पालनाची ।
निश्चिती येवोनि परम सुखाची । प्राप्ती विवाहोत्तर होतसे ॥५१

ऐशा वधूस स्वकुळीं मान । देवोनि आदरिती सुगृहिणीसमान ।
करिती कौतुक लाड पूरवून । समस्त कुटुंबीय अत्यादरें ॥५२

वधू असावी सोज्जळ सुशिक्षित। सुवेषधारिणी, सभ्यता वांच्छित।
अर्धांगी शोभावी स्व-स्वरूपांत । स्वगृहीं नांदण्या सहचारिणी॥५३

आपुला वरपक्ष जाणोन । जे आचरिती वरचढपण ।
वृत्ती तयांची खास हीन । ऐसें जाणावें निश्चित ॥५४

हुंड्यासाठीं कांहीं अडती । वधूस्वरूपीं निंदा करिती !
ऐशांची आचाररीति भाती । दुष्मनासमान जाणावी ॥५५

कारणें चिकित्सेंत नसावी अतिशयोक्ति। वधूकुळा द्यावी सत्प्रवृत्ती ।
ना तरी अति तेथें खास माती । होवोनि पश्चात्ताप पावेल ॥५६

सुयोग्य वधसंशोधन । **होतां करावें धार्मिक पाणिग्रहण ।**
**विवाह असे पवित्र संतर्पण** । गृहस्थाश्रम-प्राप्तीचें ॥५७

आधुनिक पाश्चात्य संगतींत । विवाहविधीच्या धार्मिकतेंत ।
सुधारक क्रांति करीत । नोंदणी पद्धत स्वीकारिती ॥५८

वधूवर जाती कचेरींत । तेथ लेख-करार करीत ।
जणों व्यापारी व्यवहार आचरीत । विवाहविधी आटोपिती ॥५९

तेथ न घडे सुसंस्कार । तेथ न विधिमंत्रोच्चार ।
तेथ असे करार-मदार । ऐसा विवाह अग्राह्य ॥६०

महत्त्व जाणोनि लग्न-विधीचें । तेथ आचारावे धार्मिकतेचे ।
आवश्यक विधि मितव्ययाचें । आजच्या निर्धन समाजांत ॥६१

विवाहांत नसावा गोंगाट । तेथ नसावा लखलखाट ।
वित्तउधळच्या खादाड थाट । त्यजोनि दान आचरावें ॥६२

उभयपक्षीं एकत्र भोजन । करोनि प्रमोदावें विवाहसदन ।
एकत्र मेळवावे वधूवरजन । सनईच्या शुभ स्वरांमाजीं ॥६३

वधूवरांनीं करावें ईशपूजन । करावें परस्परां आत्मसमर्पण ।
एकमेकां करावें भक्तिवंदन । आशिर्वाद मिळवोनि विद्वज्जनांचा ॥६४

वधूवरां न मिरवावें रस्त्यांतून । तयांपुढें नसोवें ताशावादन ।
नसावें बाजारी प्रदर्शन । वधूवर असतां प्रौढवयी ॥६५

पतिगृहीं वधू येतां । दृष्ट काढोनिया तत्त्वता ।
जाणावी तिज गृहदेवता । गृहसौख्याची अधिष्ठात्री ॥६६

अनेक वृद्ध मातापिता । नवकन्या सदनीं येतां ।
जाणोनि तिज परदुहिता । छळिती तिजला अनेकपरी ॥६७

उठतां बसतां अपमान । दावोनि करिती दुराचरण ।
ऐशानें दु:स्थिति दारुण । ओढवे घरांत सदोदित ॥६८

सुनेचा करितां सन्मान । फुलतें गृहीं समाधान ।
गृह जें वर्ततें गृहिणीहीन । भुताटकीसम भयप्रद ॥६९

**वधूवरां येतां अहेरधन** । तें पतिपत्नीचें जाणोन ।
इतरें न करावें दुष्टपण । अहेरीं मालकी सांगोनिया ॥७०

वधूपित्यानें अर्पिलें धन । तयाचें करावें योग्य रक्षण ।
पेढींत करोनि सांठवण । नोंदवून नांवें वधूच्याच ॥७१

वधूस सुवर्णालंकार लाभतां । ऐशा अलंकारांस मान्यता ।
स्त्रीधन म्हणोनिया देतां । कुटुंब सुसंस्कृत जाणावें ॥७२

विवाहीं जें मिळे धन । तें विवाहोत्सवीं उधळोन ।
जे आचरिती चंगळचैन । दिवाळखोर ऐसे जाणावे ॥७३

जे विवाहार्थ कर्ज काढिती । कर्जातचि पंचपक्वान्नें झोडिती ।
विवाहोत्तर दशदिशीं पसरिती । ऐसे कुटुंबीय अति नीच ॥७४

वधूवरें घालाव्या अटी । सर्व मितव्यय करण्यासाठीं ।
आप्तांची न करण्या दाटी । कर्जबाजार टाळावया ॥७५
झोडण्याऐवजीं पंचपक्वान्नें । गोरगरिबां साधीं जेवणें ।
देवोनि तोपवावीं अंतःकरणें । भुकेल्या दीन बंधूंचीं ॥७६
**दोन कुटुंबें एक होतीं । सहकार्यें वधूवर नांदती ।**
**उभय कुळांचें हित पाहती । ऐसा विवाह आदर्श** ॥७७
दोन कुटुंबें वधूवरांचीं । विसरोनि भावना द्विपक्षीची ।
पूजा करिती अद्वैताची । तेथ परमार्थप्राप्ती वधूवरां ॥७८
आजकालचे वधूवर । पाळोनि पाश्चात्य शिष्टाचार ।
**तोडूनि सद्धर्म सदाचार । विभक्त थाटती स्वसंसारा** ॥७९
विवाह होतां शोधिती कारणें । वर्तती बाजारीं स्वच्छंदपणें ।
तेणें माजती कुटुंबीं रणें । आणि विभक्त होती स्वार्थार्थ ॥८०
सर्व कुटुंबियां लाथाडून । मद, मोह, गर्व, आवरून ।
संसारीं सवता सुभा उभारून । स्वातंत्र्य उपभोगिती स्वछंदें॥८१
जेणें स्वकुटुंबीय दुरावती । स्वमातापिता दुखविती ।
ऐशा स्वतंत्रतेची प्राप्ती । त्याज्य जाणा संसारीं ॥८२
विवाह प्रकृति-पुरुषमीलन । धर्म, अर्थ, काम, मोक्ष-साधन ।
जेणें सर्व कुंटुंबीं समाधान । ऐशी सद्भावना धरावी ॥८३
**एकत्र कुटुंबपद्धति हितकर** । सहकार्य प्रेमदायी निरंतर ।
जेणें अनंत आपदा दूर । होवोनि फुले गृहस्थाश्रम ॥८४
उभय कुळीं मातापितर । सगेसोयरे बांधव इतर ।
सर्व सुखवावे जेणें संसार । आदर्श होई उभय-कुळीं । ८५
पतीनें कथावें पत्नीला । उभय सांभाळूं दोन्ही कुळां ।
मेळवूं तयांच्या आशिर्वादाला । मितव्ययें राहोनी ॥८६
जितुक्या व्यक्ति तितुक्या प्रकृत्ती । ऐशी निसर्ग-नियमांची व्याप्ती ।
तरी सुवर्णमध्यमापनवृत्ती । आचरोनि त्यजावा दुराग्रह ॥८७

दुराग्रहें पाप बळावतें । सहकार्यें प्रेम लाभतें ।
अतिप्रेमें शत्रुत्व नष्टतें । ऐसें सुतत्त्व आचरावें ॥८८

पतीचा असतां दृढभाव । पत्नीचा बदले स्वभाव ।
कारणें कदापि नसावी हाव । आहारीं भार्येच्या जाण्याची ॥८९

**क्षमा असावी खरें कथितों । आधुनिक स्त्रीवर्ग दर्शवितो ।**
**दुरभिमान जो स्फुरतो । तयांना आधुनिक शिक्षणें ॥९०**

आपुला पति, आपुला संसार । इतुकाच स्वानंद-सागर ।
इतर कुटुंबीय उगाच भार । ऐसें दृढ समजती ॥९१

पतीस मानिती बरोबरीचा । नसे ज्या गुण श्रेष्ठत्वाचा ।
जाणोनि एकेरी संबोधण्याचा । हक्क गाजविती गर्वानें ॥९२

नाना आज्ञा तयास देती । नाना प्रकारें अवमानिती ।
ऐशी तयांची हीन वृत्ती । नाश करी स्त्रीगुणांचा ॥९३

ईशानें निर्मिलें अबलांना । सौंदर्य दिधलें तयांना ।
दया, क्षमा, सौजन्याला । देवोनि निर्मिल्या देवतारूपीं ॥९४

तयां सुकुमार देहयष्टि । देवोनि केली अमृतवृष्टि ।
तयांवर, म्हणोनि तयां कष्टी । न कदापि करिती सज्जन ॥९५

**स्त्रियांचें कार्यक्षेत्र भिन्न असे । जेणें गृहिणी-पदप्राप्ति लाभतसे ।**
कोमलत्वें शौर्यबल पूर्ण नसे । तुलना करितां पुरुषांशीं ॥९६

जेथ जेथ लागे शौर्य । जेथ जेथ लागे क्रौर्य ।
जेथ उपजे लढाऊ कार्य । तेथ नियोजिती पुरुषांना ॥९७

युद्धनौका, अण्वस्त्र, विमान । सैन्यबल, रणगाडाचलन ।
जेणें निष्पन्नतें स्वदेशरक्षण । तेथ पुरुषां निवडिती ॥९८

कारणें हट्ट न धरावा ललनांनीं । सौजन्यें गृहकृत्यें आचरोनी ।
पतिहृदय सदा जिंकोनी । फुलवावें जीवन द्वयांचें ॥९९

श्वशुरगृहींचे आप्तइष्ट । सदा करावे अति संतुष्ट ।
लागों न द्यावी दुष्ट दृष्ट । सोनियाच्या स्वसंसारा ॥१००

पाहुण्यांचें करावें स्वागत । तयां सन्मानावें जैशी ऐपत ।
विपदावस्थेंतही सस्मित । सदा रहावें सुगृहिणीनें ॥१०१
आठ्या कपाळीं येतां अनंत । कदापि न उपजे आपदा-अंत ।
तदर्थ सुमधुर हास्यांत । झुंजावें संकटीं गृहिणीनें ॥१०२
पतीस लाभतां अल्प धन । करावें थोडें द्रव्यार्जन ।
सुयोग्यतेचे मार्ग आचरून । गृहिणी कर्तव्य हेंच असे ॥१०३
सुशिक्षित गृहिणीपद लाभतां । पतीस दावावी अत्यादरता ।
धर्मकुळाचारां द्यावी मान्यता । पावित्र्य रक्षण्या स्वकुळाचें ॥१०४
**वेष आचारांत असावी सभ्यता** । दैनिक आचरणांत आधुनिकता ।
आधुनिकता नसे विलासीनता । शास्त्रशुद्धता तीच असे ॥१०५
अहल्या, द्रौपदी, सीता । तारा, मंदोदरी यांची पौराणिकता ।
त्याज्य पूर्ण न समजतां । तयांची पतिलीनता आचरावी ॥१०६
या पंचकन्यांचे दोष । सिद्ध करण्यांत संतोष ।
मानिती आधुनिक आणोनि त्वेष । तयांचे सद्‌गुण विस्मरोनी ॥१०७
तयांचे गुण आदर्श जाणोन । सौजन्यें तयां अनुसरून ।
**सावित्री आदर्श स्त्री संबोधून । तद्वत् संसार फुलवावा** ॥१०८
स्वकुलांतील अंतर्दोष । कथन न करा दुसऱ्यांस ।
वट्टा न लावावा स्वकुळास । निंदूनियां स्वजन सर्वदा ॥१०९
काया-वाचा मनाची शुद्धता । येणें लाभे कुटुंबीं उच्चता ।
गेहास लाभे शांति सौख्यता । गृहिणी गृहदेवता शोभते ॥११०
**ऐशी सुगृहिणी लाभतां । पतीनें द्यावी सहकारिता ।**
**तैशीच अर्धांगी मान्यता । सर्वाधिकारिणीची स्वगृहीं** ॥१११
तिजला द्यावा प्राप्तधनभाग । गृहीं स्वतंत्रता मागोमाग ।
अंतरीं नसावी तगमग । 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' इति ॥११२
जागतिक सुधारणावादांत । स्त्रीस्वातंत्र्याच्या उदोउदोंत ।
आधुनिक नारी स्वच्छंदांत । वर्तती उद्दाम वृत्तीनें ॥११३

काहीं भटकती गांवांत । कांहीं रमती मित्रमंडळींत ।
अनेक विलसती रंगभूमींत । नाट्यविलास प्रेक्षकां दावोनी ॥११४
तयांच्या वेषीं न सभ्यता । वचनीं न सुजनता ।
न किंचित् पापभीरुता । ऐशी वृत्ती विनाशकारी ॥११५
**पाश्चात्य स्त्रीजीवनांत । पतिपत्नी संसारसुखांत ।**
**सर्व देवघेवीच्या व्यवहारांत । प्रकटे भोगवृत्ती विशेष ॥११६**
दोघेंही कुटुंबविभक्त राहत । धनार्जन करिती स्वतंत्र ।
भोजन घेती खाणावळींत । एकत्र येती निशासमयीं ॥११७
ऐशा स्वातंत्र्याचीं अनेक अंगें । उपभोगिती सुधारकी अनुषंगें ।
परि तेणें कुटुंबभाव भंगे । संसारा बाजारपण येवोनि ॥११८
तयांचें करोनि अनुकरण । सुधारणावादी स्त्रीजन .
त्यजिती भारतीय संस्कृतिधन । जें अद्वैतानंद देतसे ॥११९
कारणें सुशिक्षित स्त्रीपुरुषांनीं । एकमेकां सर्वस्व अर्पण करूनी ।
सुसंस्कृताचार रक्षोनी । संसार करावा संयमें ॥१२०
**संयमें करितां सौख्याचरण । सहज उपजे संततिनियमन ।**
**जेणें सर्वां निवारा, वस्त्र, अन्न । लाभे सांप्रत काठिण्यांत ॥१२१**
खंडोगणती पोरें होतां । संत्रस्त होती मातापिता ।
नंतर होती शरणागता । देवा तार म्हणोनिया ॥१२२
तेथ ईश्वर कोपतसे । करावें तैसें भरावें वदतसे ।
शास्त्रही तेंच दावितसे । मानवीसुख मानवाहातीं ॥१२३
व्यक्तिस्वातंत्र्य नसे विलासांत । सत् स्वातंत्र्य असे विकासांत ।
स्वार्थ त्यजून परमार्थांत । संसार फुलवावा इहलोकीं ॥१२४
**पत्नीस जाणावी ज्ञानमाला । आत्मपूजा अर्पावी तिजला ।**
**जेथ नारी पावती सन्मानतेला । तेथ रमती सिद्धिदेवता ॥१२५**
पत्नी असतां अशिक्षित । तिजला करावी सुशिक्षित ।
अशक्य जरी ऐसें होत । तिचें उणेपण काढूं नये ॥१२६

पत्नीस घरांत ठेवोन । मैत्रिणी सवें घेवोन ।
मिरविती अनेक विवाहित तरुण । ऐसे पुरुष निंद्य जाणा ॥१२७

पति असतां गृहीं आजारी । पत्नी तयाची भटके बाजारीं ।
तयास औषधें पाजिती शेजारी । ऐशी भार्या त्याज्य असे ॥१२८

निंदण्या वंदण्याचे प्रकार । जगतीं एक ना हजार ।
जेणें जळे वा फुले संसार । पतिपत्नीच्या गृहस्थाश्रमीं ॥१२९

कित्येक युगुलें विवाहोत्तर । कुटुंबापासोन राहोनि दूर ।
छळिती पितृगृह अनावर । हक्क सांगोनि वस्तूंवरी ॥१३०

वधूच्या नथेंतून तीर । कांहीं मारिती भेकड वर ।
तयां वाटे वधूचें घर । आपुलेंच आहे स्वार्थार्थ ॥१३१

वधूस माहेरीं पाठवून । सासुरवाडच्या घरांतून ।
भांडींकुंडीं सर्व लुटून । तिच्यातर्फे आणविती ॥१३२

भिक्षांदेहीचें हें लक्षण । असे त्याज्य अति हीन ।
तेणें प्रकटे दुबळेपण । पतिकुळा कलंक लागोनिया ॥१३३

कांहीं मित्रांकडे जाती । तेथ स्वकुटुंबीय निंदिती ।
स्वकुळाभिमान विस्मरती । ऐसा आचार निंद्य होय ॥१३४

निंद्य तें सर्व टाकावें । वंद्य तें सर्व आचरावें ।
जगतीं प्रेमें फुलवावें । नंदनवन स्वसंसारीं ॥१३५

**संसारीं आचरावें पंचशील । दुजा कुटुंबीं न पेटवावा जाळ ।
निंदा त्यजुनी सकळ । सद्भक्त स्वपरिवारीं ॥१३६**

स्वतः असतां घरमालक । व्हावें बिऱ्हाडकरूंचे रक्षक ।
निर्धनावस्था सदा जाचक । ऐसें जाणोनि अंतरीं ॥१३७

बिऱ्हाडकरूंना न छळावें । सर्वतोपरी सहकार्य द्यावें ।
परि शिस्तीनें तयां दरारावें । संस्कृति-धर्म आचरोनी ॥१३८

स्वतः बिऱ्हाडकरू असतां । पाळावी सर्व नियमबद्धता ।
अंगीकारावी अल्प लीनता । भाडें देवोनि नियमित ॥१३९

गृहिणीनें करावें विद्यादान । अशिक्षित भगिनी जमवून ।
तैसेंच द्यावें नारीधर्मशिक्षण । सुगृहिणी व्हावया मैत्रिणी ।।१४०
दुपार होतां कित्येकजणी । चकाटचा पिटती एकत्र जमुनी ।
अमूल्य वेळाचें चौर्य करोनी । आयुष्य घालविती परनिंदेंत।।१४१
घरांत असतां थोडें अंगण । तेथ करावी फुलझाड-पेरण ।
अथवा फळभाज्यांचें वर्धन । जागा मिळतां सुयोग्यशी ।।१४२
**गार्गी-मैत्रेयींचें वेदविद्यार्जन । राणी लक्ष्मीचें शौर्य प्रकटीकरण ।**
**विजयालक्ष्मीचें अधिकारग्रहण । कौतुकें कथावें भगिनींना ।।१४३**
जरि न पटतें कुटुंबियांत । सुधारणांच्या भिन्न मनोवृत्तींत ।
तरी स्वतंत्र राहण्यांत । सुजाणता मानावी ।।१४४
ऐशी येतां विभक्तता । न मानावी तेथ शत्रुता ।
द्यावी पूर्ण सहकारिता । ईतरेजनां कुटुंबींच्या ।।१४५
मुलें पाठवितां शाळेंत । झालें स्वकर्तव्य मानीत ।
तयांच्या विद्यार्जनांत । दुर्लक्ष करिती अनेक जन ।।१४६
कारणें मुलांच्या वृत्तीवरी । तयांच्या दैनिक आचरणावरी ।
लक्ष असावें खरोखरी । शिस्तवार होण्या विद्यार्जन ।।१४७
**रंगभूमि असे हें भू-जगत । तेथ मानव जन्म प्रवेश होत ।**
**भिन्न भिन्न भूमिका घेत । आचरी जीवन आपुलें ।।१४८**
कुणाची भूमिका दारिद्र्यांत । कांहींची खुले धनवैपुल्यांत ।
कांहीं वर्तती मध्यम स्थितींत । ऐशीं पात्रें रंगती ।।१४९
कुणा रंग मिळे काळा । कुणाचा वेष वावळा ।
कुणी गौरवर्णी वेगळा । नाचे जीवन-प्रवेशांत ।।१५०
कुणीं बनती ग्रामव्यापारी । कुणा लाभे कारखानदारी ।
कुणा लाभे सरकारी नोकरी । प्रपञ्च चालण्या दैनिक ।।१५१
ऐशा भूमिका अनेक । नरें व्हावें शूर नायक ।
न व्हावें दुष्ट हिंसक । खलनायकासम संसारीं ।।१५२

भूमिका यशस्वी होण्यासाठीं । करावी ईशोपासना मोठी ।
जीवनीं आणावी अति तुष्टि । नागरी धर्म आचरोनी ॥१५३

**नागरी धर्माचा आचार । हाच गृहस्थाश्रम थोर ।**
**जो असे निरंतर मनोहर । समाजसेवा करावया ॥१५४**

गृहे गृहस्थः तिष्ठति । कुटुंबसौख्य देई अती ।
जयाची सदा दृढ मति । असे स्वजनहितार्थ ॥१५५

स्वजनांचें हित करितां । सहज उपजे समाजकल्याणता ।
तदनंतर लाभे अभ्युदयता । स्वराष्ट्राची अनुपम ॥१५६

**जनहितार्थ त्यजावा स्वार्थ । नागरिकत्वाचा सत्य अर्थ ।**
**अभ्यासून साधावा परार्थ । पुरुषोत्तमपद लाभण्या ॥१५७**

अन्न-वस्त्र-निवारा प्राप्त । सर्वां होण्या लढावें सांप्रत ।
व्हावे पुढारी स्वनगरांत । जनसेवा करोनिया ॥१५८

प्रतिनिधी व्हावे जनतेचे । ध्येय ठेवावें लोकहिताचें ।
प्रेम मेळवावें शासकांचें । निर्दालन समस्यांचें व्हावया ॥१५९

अस्पृश्यां करावे जवळ । तयां द्यावें शिक्षण बळ ।
तयां करावें शुद्ध निर्मळ । स्पृश्यता लाभण्या या जगीं ॥१६०

सूक्ष्म अभ्यासावें राज्यतंत्र । उमजण्या सर्व शासनयंत्र ।
समाजा द्यावा सुलभ मंत्र । शासकीय महातत्त्वांचा ॥१६१

समजून घ्यावी राज्यघटना । लोकसभा विधिमंडळरचना ।
करोनि पूर्ण विवेचना । गुणदोष घ्यावे जाणोनि ॥१६२

गुणदोष वृत्तपत्रीं मांडावे । न्याय-निवाड्यास्तव भांडावें ।
तैसेंच न्याय्य तें मेळवावें । सुशांततेच्या मार्गानें ॥१६३

राजपक्षांचीं अंगें नाना । सूक्ष्म अभ्यास देवोनि मना ।
अति योग्य करोनि खंडना । निवडावा पक्ष राष्ट्रकल्याणी ॥१६४

आपुला पक्ष प्रबळ करावा । सर्व समाज स्वपक्षीं आणावा ।
पक्षा उच्चाधिकार मेळवावा । राष्ट्रशासन करण्याचा ॥१६५

ऐसें गृहस्थ-कर्तव्य करतां । शिष्टाचार पाळावे तत्त्वता ।
मेळवावी अखंड सहकारिता । पुरुषश्रेष्ठ होण्या राष्ट्रांत ॥१६६

फेडावें स्वकुटुंबाचें ऋण । तयांच्या सुखा करावें अर्पण ।
सकल तन-मन-धन । स्वार्थ निरंतर त्यजोनिया ॥१६७

लिहावीं पत्रोत्तरें निर्मळ । कळवावें आप्तेष्टां कुशल ।
इच्छावें उत्सवीं शुभ सकळ । विवाहसमयीं आप्तमित्रांच्या ॥१६८

**कित्येकां मिळती शुभ क्षण । तैसें सत्कृत्य करण्याचे दिन ।**
**परि आलस्ये संधी दवडून । अनेक बनती दुर्दैवी ॥१६९**

तदनंतर उपजतां पश्चात्ताप । तया अंगीं ये थरकांप ।
उभें टाकतें समोर पाप । सैतानासम सतावत ॥१७०

ऐसे नंतर होती भ्रमिष्ट । विश्वासिती भूत-भविष्यांत ।
**काळ दवडिती ज्योतिषश्रवणांत** । कपाळीं हात मारोनिया ॥१७१

ज्योतिष जरी असे शास्त्र । अल्प जाणिती तें सशास्त्र ।
थापाथापी करिती मात्र । अनेक पोट भरावया ॥१७२

व्हायचेंच जें होणार तें । जरी आगाऊ तें उमजतें ।
तरी सुखद तें कैचें ठरतें । हेंही कळेना मानसीं ॥१७३

भवितव्यीं असतां दुर्दैव अती । आगाऊ उमगतां ग्रासे भीति ।
तेणें यशाची होते माती । कारणें ज्योतिषनाद त्यजावा ॥१७४

**भूतकाळचीं कृष्णकृत्यें । होतीं वर्तमानीं भयाण भूतें ।**
**जेणें तन, मन मरुनि जातें । मृत्युकाळीं वेदनांत ॥१७५**

मानव सोडितो धर्माचार । अंगीकारतो राक्षसी आचार ।
ज्याचें नाम हिंसा-दुराचार । करोनि गृहस्थवृत्ति कलंकित ॥१७६

अनेकजण गृह लाथाडिती । नाना व्यसनांमाजीं पडती ।
बाहेरख्याली खुशाल बनती । कुटुंबनाश करोनिया ॥१७७

आहार-निद्रा-विलास अती । आचरती जीवनीं उद्धट मती ।
तयांचे हाल कुत्रे न खाती । ऐसे मरती उकिरड्यांत ॥१७८

दारिद्र्यें रडती वायकापोरें । कुटुंबमुख्या येवोनि वारें ।
देशसेवाव्रत न्यारें । ऐसें समजे तो मूर्ख ॥१७९

उपाशी ठेवोनि पोरें घरीं । जो बाजारी भाजे भाकरी ।
आणि जनसेवेचे दंभ करी । तो खास मूर्ख होय ॥१८०

वृद्ध होतां माता-पिता । तयां न मुळीं आदरतां ।
जो ठेवी उपाशी तत्त्वता । ऐसा गृहस्थ मूर्ख जाणा ॥१८१

घरांत कोणी रुग्ण असतां । स्नान-संध्या, पूजा करितां ।
बडवी घंटा मिळण्या शांतता । ऐसा पूजक होय मूर्ख ॥१८२

कामधंद्याची असतां वेळ । जमवोनि भोंवतीं मित्र कुटाळ ।
टवाळींत जो घालवी काळ । तो मूर्ख जाणा व्यापारी ॥१८३

असतां नोकरी सरकारी । जो आलस्यें गमजा करी ।
न उमजे जया जबाबदारी । ऐसा अधिकारी खास मूर्ख ॥१८४

आळशासम राहे बेकारींत । भार्येस धाडी नोकरींत ।
ऐसा मूढ संसारांत । सिद्ध मूर्ख जाणावा ॥१८५

जया नाहीं देव-धर्म । सदा काढी दुजाचें वर्म ।
तयाचें जीवन शुष्क चर्म । कारणें जाणा तो महामूर्ख ॥१८६

स्वत.ची न करी उन्नति । चिंतितो सदा स्वजन-अवनती ।
समाजाची ऐसी उपाधी । शोभोन उपजे पूर्ण मूर्ख ॥१८७

अपराध असतां गृहिणीचा । तिला ताडण करण्याचा ।
हक्क बजावी जो क्रूरतेचा । ऐसा पति मूर्ख जाणा ॥१८८

रस्त्यानें जातां येतां । न आचरे मार्ग शांततेचा ।
अवलंबी जो खिदळण्याचा । ऐसा गृहस्थ मूर्ख जाणा ॥१८९

कोणी शेजारीं होतां मृत । दारें खिडक्या लावुनी घेत ।
कांहीं रमती भोजनांत । ऐसे जन जाणा मूर्ख ॥१९०

दीनदुबळे येतां घरीं । तयांचें आतिथ्य जो न करी ।
परि स्वमुखें शिवीगाळ करी । ऐसा गृहस्थ मूर्ख होय ॥१९१

स्वधर्माची निंदा करी । स्तुति परधर्माची करी ।
परि एकही धर्म जो न आचरी । ऐसा नर महामूर्ख ॥१९२
कुटुंबरक्षण प्रथम करावें । पश्चात् देशसेवाव्रत घ्यावें ।
तदर्थ सेवाधर्म-अध्ययन करावें । स्वकुटुंब ठेवोनि सुरक्षित ॥१९३
**नागरी धर्म-आचार सुलभ असे । अंगीकार मात्र गहन असे ।**
**जेथ सदाचार अखंड वसे । तोच शोभे नागरिक ॥१९४**
सत्य वाणी, देशनिष्ठा, सहृदयता । समता, मित्रता, स्त्रीदाक्षिण्यता ।
स्वधर्मपरायणता, मितव्ययता । हेच सद्गुण नागरिकाचे ॥१९५
ऐसे सद्गुण नागरिकत्वाचे । अंगीकारोन गृहस्थाश्रमाचे ।
सार्थक करावें स्वकुटुंबहिताचें । जेणें लाभे परमशांति ॥१९६
ऐसें ऐकतां निरूपण । झाला ओशाळा सेवक तरुण ।
साश्रु झाले तयाचे नयन । अधोवदन जाहला क्षणभरी ॥१९७
परि ठाकला आचार्यांसमोर । वदला, लाथाडला म्यां संसार ।
टाकली गृहिणी-मुलें खरोखर । देशसेवा-छंद घेवोनिया ॥१९८
आतां रुद्राक्षमाळा फेकतों । देशसेवा फोल झाडितों ।
स्वकुटुंबीं परत जातो । सुरक्षाया कुटुंबीय ॥१९९
तयांची सुव्यवस्था लावोन । ठेवोनि गृहीं पुरतें धन ।
भार्येस समाधान देऊन । परत येईन आश्रमीं ॥२००
यथायोग्य उचित वचन । खरोखर शोभे तव जाण ।
ऐसे उत्तरले गुरुजी हसून । निरोप देत त्या नवशिष्या ॥२०१
ऐसा प्रसंग, ऐसें प्रवचन । उद्बोधक अति दर्शवून ।
शोभला सेवाश्रम करून रक्षण । सद्धर्माचार सर्वथा ॥२०२
वदले आचार्य पुनश्च वळून । जरी केलें म्यां गृहस्थाश्रम कथन ।
त्यांत नसे सुसंबद्धता गुण । पूर्णत्वें हें जाणावें ॥२०३
जैसे जैसे उपजले विचार । तैसे तैसे झाले शब्दोच्चार ।
मनही गोंधळलें अनिवार । जगतीं असंबद्धता देखोन ॥२०४

कारणें मन्मन गोंधळलें । परि मानसीं सत्य प्रदीप्तलें ।
तें आत्मभावें स्यां कथिलें । सत्यं-शिवं-सुंदरम् ॥२०५
तोंच उठला एक सेवक । जाहला विचारवंत पृच्छक ।
अत्यादरें प्रश्न एक । विचारूं लागला नम्रत्वें ॥२०६
वदे गृहस्थाश्रम आचरितां । **सौभाग्यवती दिवंगत होतां ।**
**स्वजीवन ऐसें फाटतां । कैचें वर्तावें निरूपावें** ॥२०७
ऐकोनि तयाच्या शंकेला । आचार्य वदले तयाला ।
तव शंकानिरसनाला । नेतों तुजला योग्य स्थळीं ॥२०८
ऐशा वाक्यें गृहस्थाश्रमकथन । संपवून, श्रोतियां अभिवादन ।
करूनि, निघाले आचार्यसज्जन । सवें घेवोनि पृच्छका ॥२०९
मार्गीं असतां दोघेजण । गुरुजी वदले ऐक, जाण ।
तव शंकानिरसनाचें ठिकाण । अति सुयोग्य वर्ततसे ॥२१०
असे एक सेवाश्रम अंतरावर । तेथील प्रमुख त्यजोनि संसार ।
आचरती **वानप्रस्थाश्रम** थोर । भार्या तयांची मृत असे ॥२११
जगतीं क्षणभंगुर असे जीवन । न उमजे कैचा उपजे क्षण ।
जेधवा निघून जाई प्राण । शरीर काष्ठवत् होतसे ॥२१२
विवाहीं पतिपत्नी दोघेंजण । स्वीकारती धार्मिक लग्नबंधन ।
एकजीव होण्या पूज्य ब्राह्मण । करिती वेदोक्त मंत्रोच्चार ॥२१३
ऐशा भावना असतां मंगल । काळ जाई घडे अमंगल ।
अचानक येई मृत्युकाल । दोघांमाजीं एकाचा ॥२१४
देवाज्ञा होई कधीं पतीला । कधी कैलासवास घडे पत्नीला ।
ऐशा समयीं कालचक्राला । शरण यावें मानवें ॥२१५
अल्पकाल शोक करावा । गांभीर्यें अंत्यविधी उरकावा ।
परि धीर कधीं न सोडावा । जीवन जगण्या सुयशाचें ॥२१६
ऐसें चालतां आचार्य-कथन । आलें वानप्रस्थाश्रमस्थान ।
आश्रम शांत ज्योतिसमान । दिसूं लागला गुरुशिष्यां ॥२१७

पृच्छक शिष्या आश्रमीं नेलें । आचार्यं प्रमुखां विदित केलें ।
शंका-प्रश्न जे शिष्यें विचारिले । तयांच्या केंद्राश्रमीं ॥२१८
तेथें स्वीकारोनि फलाहार । मुख्याचार्य परतले सत्वर ।
स्वस्थानीं जेथ औंदुबर । शोभला प्रतीक सेवेचें ॥२१९
वानप्रस्थाश्रमाचें मनोहर स्थान । जेथ चाले सेवाज्ञानकथन ।
तेथ वैसले प्रमुख घेऊन । नवपृच्छक सेवका ॥२२०
वदले सत्‌शिष्या लक्ष देऊन । ऐक, शंका तव गहन ।
कारणें मम निरसन । असे अति महत्त्वाचें ॥२२१
सांगतों तुजला भाव सुप्त । जे चिर असती हृदयांत ।
माझी भाग्यश्री दिवंगत । होवोनि गेलीं दशवर्षें ॥२२२
उघडा पडला सर्व संसार । चित्तीं उफाळला शोक-सागर ।
चित्त झालें अस्थिर । निराशा निष्पन्नली जीवनीं २२३
ऐशा भर निराशेंत । भेटले गुरुवर्य सुदैवांत ।
तयांनीं राष्ट्रसेवाश्रम स्थापित । मजला दिधला सदुपदेश ॥२२४
उपदेश असे बहुमोल । जेणें मायामोह पार जळेल ।
जीवन परमार्थी तेजाळेल । कारणें कथितों बा शिष्या ॥२२५
पत्नी मृत होतां तारुण्यांत । अज्ञान बालकें संसारांत ।
उघडीं पडोनि अति हालांत । वाढतीं ऐसें योग्य नोहे ॥२२६
ऐशा दुर्दैवी आपत्तींत । अनेक पडती व्यसनांत ।
आणि स्वैर बाहेरख्यालींत । काळ दवडती घुवडासम ॥२२७
ऐशी विधुरावस्था अति कठीण । सारा भावबंध तेथ तुटोन ।
देह मानसीं उपजे अवगुण । नरकाप्रति नेणारा ॥२२८
कारणें सुयोग्य सहचरी शोधून । विशेषतः गतधवा पाहून ।
घ्यावें विवाहबंधन उरकून । न करितां विशेषोत्सव ॥२२९
**ऐशा द्वितीय विवाहानें** । पुनश्च स्वजीवन उत्साहानें ।
तैसें अबलेच्या भावपूजनानें । संसारीं करावें सुखमय ॥२३०

अल्पवयी वधू नसावी । कुमारिकाहि न वरावी ।
अनुरूप पूर्ण असावी । वयोमाना साजेशी ॥२३१
आकांक्षा नव कुमारिकेच्या । वर्तती तेजस्वी संसाराच्या ।
त्याच दुर्दैवी विधुराच्या । न जुळती पूर्णत्वें ॥२३२
प्रथम संसाराचीं मुलेंबाळें । जरी खेळतीं लडिवाळें ।
तरी तयांशीं कैशी खेळे । नवमाता ममत्वानें ॥२३३
समदु:खी उभयतां असतां । संसारीं दोघे एकत्र येतां ।
तयांची जुळे सहकारिता । नवजीवन होण्या सौख्याचें ॥२३४
स्त्रीचें सौभाग्य हरपतां । वैधव्य उमेदींत कोसळतां ।
निराशवृत्ति न धरितां । पुनर्विवाहित होणें श्रेयाचें ॥२३५
निवडावा समवयस्क विधुर । असावा अनुभवी पुरेपूर ।
तयास नियोजून सहचर । जीवन अर्पावें तयाला ॥२३६
समाजीं वैधव्या मान नसे । वैधव्यावस्था दुर्दैव असे ।
जेथ बेअब्रूचें भय वसे । तेथ संरक्षक आवश्यक ॥२३७
सुधारणेच्या सांप्रत युगांत । निराधारिते न व्हावें कलंकित ।
पुराण शृंखला तोडुनी टाकीत । शोधावें सौख्य नवसंसारीं ॥२३८
करावें स्वजीवन उज्ज्वलित । संयमें आचरावें नव जगांत ।
संसारीं कुटुंबसेवा करीत । फुलवावें जीवन शांतिसौख्यें ॥२३९
आतां ऐक बा एक नवल । जें आचरितां लाभे निश्चल ।
परमसुखद यशोबल । दृढनिश्चय असतां मानसीं ॥२४०
भूमंडळीं संसार दु:खमय । दशदिशीं यमयातनांचें भय ।
अनंत आपदा छेदिती हृदय । तेथ कैची ईश्वरप्राप्ती ॥२४१
संसार करावा नेटका । ऐसा संतांचा अमृत-घुटका ।
ठरे व्यर्थ मिळतां फटका । आजच्या युगीं आपदांचा ॥२४२
यास्तव स्वभार्या मृत होतां । नवविवाहबंध न आचरितां ।
अल्पवयीं बालकें न त्यजितां । **समाजसेवाव्रत धरावें** ॥२४३

स्वकुटुंबीं दृढभाव असावा । वृद्धांचा ऋणबंध न तोडावा ।
तैसाच पुत्रादिकां आधार द्यावा । जोंवरी असती अजाण ते ।।२४४
परि अति लंपटता नसावी । कुटुंबीं त्यागवृत्ती धरावी ।
समाजसुधारणा हातीं घ्यावी । घराबाहेर राहून तत्त्वता ।।२४५
साठीचें होतां वयोमान । घालावी कामक्रोधास वेसण ।
पत्नीचें होतां देहावसान । स्वीकारावा वानप्रस्थाश्रम ।। २४६
पत्नीस असतां गृहलक्ष्मीपण । तियेचें करोनि भावपूजन ।
वळवोनि तियेचें पूर्ण मन । जावें वानप्रस्थाश्रमीं ।।२४७
तियेवरि सोपवोनी संसारभार । राखोनि धन भरपूर ।
वा पुत्रपौत्रां योजोनि जबाबदार । करावा संसारत्याग सेवार्थ।।२४८
वृद्धा नारी गृहांत असतां । कुटुंबीं वर्धते सत्कीर्तिता ।
तैशी उजळते धर्मपरायणता । गृहवैभव वाढोनि सत्त्वगुणें ।।२४९
त्यागवृत्ति ऐशी स्वीकारतां । जरी भार्या होई दुःखिता ।
वानप्रस्थाश्रमाची अपूर्वता । तिजला कथावी अनुपम ।।२५०
कथावें तूंही बरोबर । चलावें आचरण्या उपकार ।
मार्गे टाकोनि घरदार । स्वीकार करूं सेवाधर्माचा ।।२५१
झाला सुखाचा संसार । आतां पुरे ही घरघर ।
वयोमान झालें कांतर । आतां कुटुंबछंद आवरूं ।।२५२
भवसागर तरण्याचें साधन । परमार्थप्राप्तीचे सत्त्वगुण ।
जाणावे देणें मन-तन । वानप्रस्थाश्रमीं देशहितार्थ ।।२५३
समाजसेविकाव्रत स्वीकारून । रंजल्या गांजल्या अत्यंत आदरून ।
दीनसेवा ईश्वर जाणून । पैलतीर गांठी आत्मानंदें ।।२५४
ऐशीं महातत्त्वें समजावून । अर्धांगीचें मन वळवून ।
उभयें वानप्रस्थाश्रमीं जाऊन । सार्थक करावें वृद्धपणीं ।।२५५
आजच्या नवसंक्रमणयुगांत । पतिपत्नींच्या विचारवैचित्र्यांत ।
अनंत संघर्ष भांडणें उपजत । शेवटीं होतो घटस्फोट ।।२५६

दोघें आचरिती सौभाग्यछेदन । उभयतां तोडिती लग्नबंधन ।
विस्मरती एकात्मता मंत्रोच्चारण। पाठ दावोनि एकमेकां ।।२५६
येथ कैचें सुसंस्कृतपण । परि माजतां पतिपत्नीरण ।
उभयें न ठेवितां बुद्धि गहाण । विभक्त रहावें सुवृत्तपणें ।।२५७
ऐशी विभक्तता प्राप्त होतां । तैशांत वयोमान होतां ।
अंगिकारावी संसारनिवृत्तता । वानप्रस्थाश्रम स्वीकारोनी ।।२५८
कांहीं वृद्ध माता-पिता । साठीचेंही वय होतां ।
न त्यजितां अहंमन्यता । मिळवित्या पुत्रा सताविती ।।२५९
तया न करिती अधिकारदान । सदा वर्तती हुकुमशहासमान ।
वेळप्रसंगीं धरिती कान । तयाचें कुटुंबीयांसमक्ष ।।२६०
ऐसा करितां अपमान । गृहाचें तापतें वातावरण ।
क्रोध-मत्सराचें प्रस्थान । निपजे गृहदाहक ।।२६१
चार दिवस असती सासूचे । पश्चात् साम्राज्य स्नुषेचें ।
ऐसें परिवर्तन अगत्याचें । निसर्गनियमीं सिद्धतें ।।२६२
**कारणें वृद्धांनीं करावा अधिकारत्याग।** संसारीं सर्व विलासभोग ।
वारसा अर्पावा सर्व भाग । कुटुंबरक्षणाधिकाराचा ।।२६३
**साठीचें वयोमान येतां** । उपजे वदती बुद्धिभ्रष्टता ।
सत्य हेंचि रत होतां । विलासोपभोगीं उतारवयीं ।।२६४
परि वानप्रस्थाश्रम अंगिकारतां । उपजे उच्च बुद्धिस्थिरता ।
राष्ट्रसेवाव्रतसश्रद्ध धरितां । स्थितप्रज्ञता लाभतसे ।।२६५
स्वगृहीं खावे दोन घास । न करावें किंचित् गृहभेदास ।
लागों नये सुधारणावादास । सुशांत राहोनि मानसीं ।।२६६
जयांनीं आपणां वर्धिलें । स्वकष्टेंही प्रतिपाळिलें ।
**ऐसे पालक अति आदरले । पाहिजेत संसारीं युगुलांनीं** ।।२६७
वृद्धांना द्यावें पुरें भोजन । तयां अर्पावें निवारा, वस्त्र, धन ।
मेळवावें तयांचें आशिर्वचन । संसारीं सौख्य लाभण्या ।।२६८

ऐशा सुवृत्त जीवनांत । कुटुंब वर्ततें पूर्ण सौख्यांत ।
वृद्ध न होतां तप्त । स्वीकारिती वानप्रस्थाश्रम ॥२६९

ऋषिमुनींच्या प्राचीनकाळीं । गृहस्थाश्रमाच्या उत्तरकाळीं ।
सज्जन देती मोदें टाळी । वानप्रस्थाश्रम घ्यावया ॥२७०

गृहत्याग स्वमतें करावा । वनांतरीं आश्रम स्थापावा ।
वनांतरीं आत्मानंद घ्यावा । ऐसें चाले त्या काळीं ॥२७१

प्रपंच सारा मागें टाकुनी । कुटुंबियां सुखी ठेवोनी ।
संसारनिवृत्ती पत्करोनी । वननिवासी होती गृहस्थगण ॥२७२

ऐसे गृहस्थ होवोनी ज्ञानी । तेथ राज्याधिकाऱ्या पाचारोनी ।
तयां सल्लामसलत देवोनी । राष्ट्रोन्नति साधिती ॥२७३

द्वैपायन महाभारतकाळीं । राहोनि दूर युद्धवेळीं ।
जणों राहिला पांडवांजवळीं । युद्धनीति देत तयां ॥२७४

वानप्रस्थाश्रमी अनेक ऋषिजन । अर्पिती नानाविद्यादान ।
आश्रमीं शिष्यां प्रतिपाळून । जीवन सार्थकीं लावण्या ॥२७५

अनेक करविती वेदपठण । शिष्यां शिकविती यज्ञज्ञान ।
तयां पढविती निःस्वार्थकर्मगुण । ऋषींचें ध्येय हेंचि असे ॥२७६

कांहीं आचरिती तपाचरण । चित्तीं धरोनि विश्वकल्याण ।
मुखीं जपती ॐ नारायण । विश्वशांति लाभण्या चराचरां ॥२७७

येणेंपरी चाले विश्वसेवा । वानप्रस्थाश्रमीं अमूल्य ठेवा ।
जनसेवेचा लाभे; ये अनुभवा । ईश्वराची प्रसन्नता ॥२७८

कालचक्र पुढतीं फिरतां । जीवनीं उपजली अशांतता ।
भूतलीं प्रकटिल्या अनंत चिंता । विस्मरला मानव कर्तव्या ॥२७९

परि आजच्या परिवर्तनांत । पुनश्च संस्कृतीच्या उदयांत ।
जन अभ्यासिती नागरिकत्व । भारतसेवा करावया ॥२८०

**आतां ऐका सावधपणें । वानप्रस्थाश्रम अतुल्य जिणें ।**
**जणों शोभे ईश्वरी लेणें । अमरत्व मिळण्या मृत्युलोकीं ॥२८१**

ऐशा आश्रमीं अति थोर । लागे मानस हळुवार ।
जेथ मानवसेवा, धर्माचार । फुलतसे आत्मानंद देवोनिया ।।२८२

ऐसा आत्मानंद मेळवोन । अर्पिलें थोरांनीं आत्मजीवन ।
जेथ मानवताधर्म आचरून । ऐसे सेवाश्रम ऐक बा ।।२८३

**महात्माजींचें अमर सेवाग्राम । महर्षि कर्व्यांचा अनाथमहिलाश्रम ।**
**रवींद्रगुरूंचा विश्वभारती आश्रम । ख्यात जगतीं हीं सेवाकेंद्रे** ।।२८४

अरविंद घोषांचें पांडिचेरी धाम । कुवलयानंदाचें कैवल्यधाम ।
सेवकसेवानंदाचें दीनसेवाधाम । ख्यात स्थळें सेवायोगाचीं ।।२८५

संयमें संसार संपवोनि । अनेकांनीं सेवाव्रत जीवनीं ।
स्वीकारोनि, अनेक मार्गांनीं । नवजीवन दिधलें दुःखितां ।।२८६

कित्येक आचरिती गोपालन । कित्येक रुग्णसेवा आचरण ।
अनेक अस्पृश्यता-निवारण । हींच कर्तव्यें वानप्रस्थाश्रमीं ।।२८७

वैद्यकीय ज्ञान मेळवोन । अनेक करिती रोग-निवारण ।
ऐसें स्थळ उरुळी-कांचन । जाणावा वानप्रस्थाश्रम सेवकांचा ।।२८८

**अपंगांचें करावें संरक्षण । तळमळून आचरावे प्राणिक्लेशनिवारण ।**
**दीन बालकां अर्पावें दुग्धदान । हींच व्रतें सुवृत्त वानप्रस्थाश्रमीं** ।।२८९

तुरुंगीं भेटावें स्थानबद्धांस । करावें तयां सदुपदेशास ।
जेणें उपजेल पश्चात्तापास । दुष्कर्म तयांना स्मरोनिया ।।२९०

**बापूजींचें जीवन स्मरतां । आठवावी कस्तुरबांची पतिसहकारिता ।**
**महादेवभाईंची स्वामिनिष्ठता । वानप्रस्थाश्रम स्वीकारिता** ।।२९१

भारतभर अखंड हिंडून । आचार्य विनोबा घेती भूदान ।
हें दान करिती सर्वार्पण । भूमिहीन खेडुतां ।।२९२

ऐशी सेवा खेडुतांची । जाहली ध्येय-ठेव जगताची ।
देतसे प्रचीति अमृतानुभवाची । वानप्रस्थाश्रमीं विनोबांना ।।२९३

सांप्रतच्या निर्धन समाजांत । वानप्रस्थाश्रम स्वीकारण्यांत ।
नसे त्राण एकट्या वृद्धांत । कारणें उपाय ऐक बा ।।२९४

**एकत्रित व्हावें वृद्धांनीं** । खेड्यांत जावें एकत्र मिळुनी ।
तेथ सेवाश्रम-स्थापन करूनि । आचरावा वानप्रस्थाश्रम ॥२९५
न उभारितां नवीं मंदिरें । जीर्णोद्धारावीं जुनीं सत्वरें ।
जेणें शोभतील ग्रामें, नगरें । ईश्वरोपासना करावया ॥२९६
जमवावें मंदिरीं खेडुत । तयां विविध वार्ता देत ।
उद्बोधावें आजचें जगत । कैचें पुढें जातसे ॥२९७
खेडुत-बालकां द्यावें शिक्षण । खेडुत-भगिनींना आरोग्यज्ञान ।
निरक्षरां शिकवावें सुलभ वाचन । मिळाल्या घ्यावा मोबदला।२९८
धन घ्यावें वा धान्य घ्यावें । फळें, भाजी, वस्त्र स्वीकारावें ।
जें जें मिळेल तें तें खावें । खेडुतांसमवेत नम्रत्वें ॥२९९
तयांना शिकवावें हरिकीर्तन । तयां उपदेशावें स्वधर्मथोरपण ।
जेणें टळेल भयद आक्रमण । परधर्मीयांचें आगंतुक ॥३००
**परधर्म-स्वीकृतांचें शुद्धीकरण** । करण्या स्मरावें हिंदुत्वप्रसारण ।
बापट सेनापतींचें स्वधर्मरक्षण । वृद्धाश्रमींचें ध्येय जें ॥३०१
**कर्मवीर पाटलांचें रयतशिक्षण। महात्मा फुल्यांचें स्त्रीशिक्षणदान ।**
**रमाबाई रानड्यांचें सेवासदन। प्रतीकें शोभतीं वानप्रस्थाश्रमीं**॥३०२
फाटक हरीभाऊंचें वृक्षारोपण । तैसें तयांचें नगरसफाईकरण ।
**आपटेगुरुजींचें** मृतकायादान । हींच प्रतीकें वानप्रस्थाश्रमींचीं ॥३०३
**दादा केतकरांचें** अनाथ छात्रशिक्षण । **हेडगेवारांचें** राष्ट्रसेवागण ।
**गोखल्यांचें** भारतसेवासमाज स्थापन। थोर प्रतीकें सेवाधर्मीं॥३०४
नातू-जोशीचें बालवीरसंघटन। शिवादामल्यांचें महाराष्ट्र सेनाकरण।
शाहीर आफळ्यांचें वेदसंस्कृति रक्षण । प्रतीकें राष्ट्रसेवेचीं ॥३०५
ऐशा संस्थांमाजी प्रवेशून । सत्कार्य करावें विनावेतन ।
हेंच जाणावें वानप्रस्थाश्रमजीवन । आजच्या युगांत आदर्श ॥३०६
राष्ट्रीं येतीं अनेक आपत्ती । महापूर, दुष्काळ, रोग उद्भवती ।
ऐशा समयीं करावी सत्कृति । आपदा नष्ट व्हावया ॥३०७

घरोघरीं दिनभर हिंडावें । धन, वस्त्र, धान्य मागावें ।
आपद्ग्रस्तां सर्व अर्पावें । हेंच कार्य वानप्रस्थाश्रमीयांचें ॥३०८

**वानप्रस्थाश्रम स्वीकारून । वृद्ध महिलांना एकत्र आणून ।**
नाना सेवामंदिरें स्थापून । महिलोद्धार साधावा ॥३०९

परित्यक्तां द्यावें सदुपदेशज्ञान । तयां शिकवावें कताई धनसाधन ।
जेणें तयां लाभे स्वतंत्र जीवन । आत्मोद्धार करावया ॥३१०

महिलांचें करोनि संघटन । तयां करावें राष्ट्रप्रगति वाचन ।
द्यावें नाना विकासज्ञान । स्वराष्ट्राभिमान उपजण्या ॥३११

करण्या वानप्रस्थाश्रम स्वीकार । नसे स्वगृहत्याग जरूर ।
अंतरीं तळमळ अति थोर । पाहिजे परार्थसाधनाची ॥३१२

महिलांनीं परिचारिकाव्रत धरावें । तदर्थ रुग्णालयीं नांव नोंदवावें ।
भगिनीप्रेमें रुग्णां तोषवावें । तयां उपचार देवोनियां ॥३१३

आसपास असती अनेक दलित । नाना व्याधींनीं पीडित ।
तैसे अन्नाविना दीन क्षुधित । तयांची सेवा सुलभ असे ॥३१४

राहोनिया घरच्या घरीं । खावोनिया मीठ-भाकरी ।
रत न होतां स्व-संसारीं । ऐशाची सेवा आचरावी ॥३१५

साधी रहाणी, उच्च विचार । जनसेवेचा मनीं ईश्वर ।
ऐसा निश्चळ सदाचार । शांति देतसे वानप्रस्थाश्रमीं ॥३१६

उदईक जाऊं अंधशाळेंत । तेथ चाले दीनदुबळ्यांत ।
तयांच्या सेवेचें अखंड व्रत । तयां लाभण्या नवचैतन्य ॥३१७

नजीक आहे अंधशाळा । तेथ पाहतां उमाळा ।
येवोनि वदतील धर्म वेगळा । नसे दुःखितसेवेविण ॥३१८

दुःखितांचें दुःख जाण्याचा । ऐसा धर्म वानप्रस्थाश्रमाचा ।
तोच निर्धार आचरण्याचा । निश्चयें म्यां केला असे ॥३१९

यास्तव या स्थळीं राहोन । करीतसे मी ग्रंथलेखन ।
दीनां समक्ष पाहून । स्वानुभवें लिहितों "दीनसेवा ग्रंथ" ॥३२०

ऐसें सत्कार्य भावें करितां । ऐसेंही येतें मम चित्ता ।
वृद्धांनीं धरावा हाच कित्ता । वानप्रस्थाश्रम-स्वीकाराचा ॥३२१
बहु जनांनीं आचरावें हेंच व्रत । जेणें उन्नति पावेल भारत ।
करावा स्वदेश उपास्य-दैवत । जेणें लाभेल अमरपद ॥३२२
वानप्रस्थाश्रम आचरितां । अंगीं असावी कर्तृत्वता ।
नसावी क्रियाशून्य वाचाळता । जी दांभिकता दर्शवी ॥३२३
**मुख्यत्वें फलनिरपेक्षितता । शांतता प्रसन्नता-सुबुद्धता ।**
**तैशीच प्रसिद्धिविमुखता । ऐते गुण वानप्रस्थाश्रमयोगाचे** ॥३२४
ऐशा पद्धती अनंत रीती । ऐशीं सत्कृत्यें सुज्ञ जाणती ।
वानप्रस्थाश्रमाची फलश्रुति । सिद्ध अमर पुण्यप्रद ॥३२५
ऐक शिष्योत्तमा माझे वच । माझें सांगणें तुला एकच ।
आतां विवेचन संपतांच । होईल निरसन तव शंका ॥३२६
असो, ऐका वाचकजन । संपवितां आचार्यें विवेचन ।
होवोनि शंकेचें निरसन । धन्य जाहला पृच्छक ॥३२७
ऐशी धन्यता मेळवावी । ग्रंथीं या श्रद्धा वाळगावी ।
पूर्ण वाचनीं प्राप्त करावी । ईश्वरस्वरूपीं ऐक्यता ॥३२८
इति श्रीभारतदीप ग्रंथाचा । गृहस्थाश्रम-वानप्रस्थाश्रम नामाचा ।
तयांच्या आधुनिक आचारज्ञानाचा । दहावा अध्याय पूर्ण हा ॥३२९

★ ★

# अध्याय अकरावा

## संन्यासाश्रम पुरुषोत्तमपद-प्राप्तियोग

॥ ॐ श्रीगणेशाय नमः ॥

श्रीमंगलमूर्ति गजानन । प्रथम तव संकीर्तन ।
आचरितां केलें तुज अर्पण । जीवनसर्वस्व भक्तीनें ॥१

आजवरी कृपावंत होऊन । दिधलें देवा मज चैतन्य ।
तैसेंच आरोग्य वरदान । लेखन व्हावया येथवरी ॥२

सत्य संकल्पाचा तूंच दाता । ऐसें ज्ञान मज होतां ।
पूर्ण करी मम मनोरथा । संपूर्ण ग्रंथलेखनाच्या ॥३

ग्रंथलेखनीं मन तोषलें । दिवसानंतर दिवस गेले ।
वाटलें परब्रह्म हातीं आलें । भारतदीप लिहितांना ॥४

आलीं अनेक विघ्नें नाना । परि तव कृपा उपजतांना ।
दृढनिश्चय आला मना । विघ्ननाश जाहला ॥५

अनेकां दाविलें ग्रंथलेखन । तयांचीं स्तुतिवचनें ऐकोन ।
न गेलें मन्मन मोहून । बुद्धिस्थैर्य येवोनिया ॥६

ऐशी वृत्ति ऐशी शक्ति । ही तव कृपेची फलश्रुति ।
आतां अमर तुझीच भक्ति । ऐसा दृढसंकल्प जाहला ॥७

अमरत्व शब्दें उपजे विषय । तोच लेखना झाला निश्चय ।
जेणें पूर्ण ग्रंथ होईल दीप्तिमय । भारत-दीप तेजाळुनी ॥८

आतां ऐका वाचकगण । गताध्यायीं केलें कथन ।
वानप्रस्थज्ञान-संकलन । जें आचार्यें पृच्छका निवेदिलें ॥९

तदनंतरच्या काळांत । आमुच्या विविध सेवाकेंद्रांत ।
नाना प्रवचनें ऐकत । संतुष्ट जाहलों मानसीं ॥१०

तेथ ऐकोनि सद्धर्म-आचार । मनी प्रकटलें ऐसें अपार ।
ऐशी सेवा निर्विकार । करावी प्रत्येक भारतीयानें ॥११

जगतीं चाले कोलाहल । द्वेषाचें उफळे हलाहल ।
ऐशासमयीं चित्त निश्चळ । पाहिजे आत्मबलें राखिलें ॥१२

तेथ नाना तत्त्वें उकललीं । जीं ॐतत्सत्‌रूपीं विलसलीं ।
अनंत देशभक्तांनीं अंगीकारिलीं । साधोनिया आत्मोन्नति ॥१३

**साधकांनीं बोधग्रंथ लिहिले** । तेणें जगता उद्‌बोधिलें ।
आत्मशुद्धि-तेज दर्शविलें । ईश्वर आत्मनि समजावया ॥१४

**अहिंसा-शांति-अक्रोधत्व । त्याग, सौजन्य, सत्यतत्त्व ।**
**निर्भयत्व, निग्रह, दातृत्व । यांचा महिमा बोधिला** ॥१५

क्षमा-तेज-पवित्रता । स्वाध्याय-तप-विनम्रता ।
येणें लाभते उदात्तता । स्वधर्म-परायणता इति वर्णियेलें ॥१६

समजावोनि इंद्रियदमनाचा आचार । असे माफक आहार-विहार ।
जेणें लाभे सतेज संसार । ऐसा गीतासंदेश उद्‌बोधिला ॥१७

ऐशीं प्रवचनें श्रवण केलीं । परी मनीं शंका उपजली ।
ब्रह्म-माया मज न उमजली । अज्ञानत्वाकारणें ॥१८

म्यां न वाचिली ज्ञानेश्वरी । न अभ्यासिली गीता खरी ।
दासबोध तैसा सुबोधकारी । न कधीं अंतरीं उमगला ॥१९

न वाचितां इतिहास, बखरी । वा कथा, नाटक, कादंबरी ।
अनभ्यासें वर्तली आजवरीं । प्रकृतिदोषाकारणें ॥२०

तदर्थ मन्मन ओशाळिलें । मुख्याचार्यां एकांतीं गांठिलें ।
सर्व दुःख कथन केलें । घालोनिया लोटांगण ॥२१

वदलों स्वामियां आलों शरण । न सोडी आपुले पवित्र चरण ।
**मज अज्ञाना करावा कथन । सकळ मुक्तीचा सन्मार्ग** ॥२२

या सेवाकेंद्रीं येऊन । ऐकलीं प्रवचनें सुबोध कथन ।
परि शरीर जातां पूर्ण थकोन । काय करावें ऐकवा ॥२३

पैलतीरीं नेत्र लागतां । न स्थिरते मनीं शांतता ।
न घडे हातीं राष्ट्रकर्तव्यता । शरीरगात्रें सुकोनिया ॥२४
तव भावार्थ जाणोन । कथितों, ऐक तत्त्वाचार संकलन ।
**जेणें पैलतीर गांठिती अज्ञान । पुरुषोत्तमपद लाभोनियां ॥२५**
जरी जाहलें थोडें विषयांतर। तरी चित्त राखी अति स्थिर ।
जेणें प्रसन्नेल परमेश्वर । देण्या वरदान ध्रुवपदाचें ॥२६
ऐशाही तत्त्वांचें विवरण । केंद्राश्रमीं आचार्यें देऊन ।
केलें स्वयंसेवकां सज्ञान । राष्ट्रोद्धार करावया ॥२७
व्हावया राष्ट्राचें पुनरुज्जीवन । करावें धार्मिकोत्सवांचें पालन ।
जागोजाग ईश्वरमूर्ति स्थापून । श्रीगणेशधार्मिकोत्सवासम ॥२८
**ईश्वररूप सदा निराकार । तसें अपार निर्विकार ।**
**ब्रह्मही असे शून्याकार । ऐसें थोर तत्त्वज्ञ सांगती ॥२९**
ब्रह्म उपजलें शून्यातुनी । तोंच आकार तया मिळूनी ।
अंतींही तेथेंच जाऊनी । परब्रह्मरूप होणार ॥३०
ऐसें अज्ञानां कथन करूनी । टाकती तयांचें मन गोंधळोनी ।
ऐसे अगणित तत्त्वज्ञानी । अगम्य कांहीं निरोपिती ॥३१
अज्ञानां तें न कळे । सर्व होती भाविक भोळे ।
**ईश्वरब्रह्मस्वरूप घोटाळे । उकलणें तयां गहन असे ॥३२**
ऐशा वेळीं घेती गुरूपदेश । गुरु जाणती स्वयमेव ईश ।
भक्तां वदती सोडा क्लेश । शरणागत मज होवोनि ॥३३
भक्तां दाविती चमत्कार। माथां वाढविती जटासंभार ।
तैसेंच कथिती अगम्य अवडंबर । ब्रह्म सत्य म्हणोनिया ॥३४
जगन्मिथ्या ऐसें बोधिती । उत्पत्ति-स्थिति-लय दर्शविती ।
ॐ स्वरूप निराकार ब्रह्मस्थिती । ऐसें कथिती भक्तगणां ॥३५
परि अजाण सर्व भक्त । ‘ आ ’ पसरोनि बसती फक्त ।
तयां वाटे झालों मुक्त । ब्रह्मघोटाळा न कळतां ॥३६

कारणें समजावें सत्य चिर । **ब्रह्म नसे अगम्य अवडंबर ।**
जें कांहीं नसे तें ब्रह्म खरोखर । हेंच निराकार जाणावें ॥३७

आपण नव्हतों पूर्वी कधीं । नसूं कधीं भविष्यांतही ।
तैशीच जाणा नश्वर मही । नाश पावेल सर्वथा ॥३८

जें विश्वीं नाश पावतें । तें सत्यचि कांहीं नसतें ।
कारणें जीवन मिथ्या असतें । ऐसें तत्त्वज्ञ सुबोधिती ॥३९

**'अहं ब्रह्मास्मि' तत्त्व सांगतें । प्रत्येकाचें जीवन सरतें ।**
**ब्रह्मपदीं जें विलीन होतें । शून्याकार होवोनिया ॥४०**

पंचमहाभूतात्मक शरीर । नव्हतें-नसतें-नसेल अमर ।
जळून जाईल चितेवर । विझतां तयाची अंतर्ज्योत ॥४१

**अंतर्ज्योति हाच अमर आत्मा ।** हा देहींचा सत्य परमात्मा ।
विनाशकरी अंधत्वा । अंतरात्मा ईश्वर जाणता ॥४२

**अंतरात्मा जाणा दिव्यचैतन्य । तोचि सिद्ध सूर्यनारायण ।**
**ज्याचिया तेजापासोन । सर्व विश्व निर्मिलें ॥४३**

चैतन्यतत्त्व निराकार । निर्विकार सत्य अपार ।
टिके तेंच अमर निरंतर । तोच ईश्वर जाणावा ॥४४

चैतन्यें लाभे इच्छित वर । चैतन्यें चाले विश्वसंसार ।
चैतन्यें होई षड्रिपुसंहार । परमेश्वरप्राप्ति होवोनिया ॥४५

ऐसें तत्त्व निराकार । न कळे कारणें ईश्वर ।
भजावा करोनि साकार । देवोनि सोज्ज्वळ मूर्तिरूप ॥४६

भाव तैसा देव असे । कारणें भिन्न रूप वर्ततसे ।
बहुरूपीं देव दिसतसे । नाना धार्मिकोत्सवांत ॥४७

आतां एक उदाहरण । जन आचरिती गणेशपूजन ।
करिती गणेशोत्सव उपासन । शुद्ध चतुर्थी भाद्रपदीं ॥४८

मांडिती गणेश नाना आकारीं । कोणी बनविती शेतकरी ।
कोणी साकारिती राष्ट्रपुढारी । नाना वेष देवोनि ॥४९

कुणाचा गणेश कृष्णमुरारी । कुणाच्या शारदा शेजारीं ।
ऐसे नाना वेष बाजारीं । देवोनि करिती मूर्ति-विडंबन ।।५०

ऐशा मूर्ति स्थापिल्यानें । उत्सवीं तमाशे आचरिल्यानें ।
कलंकिती समाजाचीं मनें । बुद्धिनाश होवोनिया ।।५१

**यास्तव ईश्वर पावित्र्यमूर्ति । असावी ऐश्वर्यदर्शी शांत पुरती ।**
**स्वर्गीय चैतन्यरूप कीर्ति । जेणें स्थिरावेल मानसीं ।।५२**

उत्सवीं करावें मूर्तिपूजन । ईशाचें भजन-चिंतन ।
तैसेच कीर्तनीं ऐक्यसंवर्धन । राष्ट्रचैतन्य वाढण्यास्तव ।।५३

**ईश्वरीं मन होण्या स्थिर । साकार भजावा परमेश्वर ।**
**श्रद्धा असावी व्यक्तस्वरूपांवर** । तया उपास्यदैवत जाणोनी ।।५४

सोज्ज्वळ मूर्ती समोर असतां । अंतःकरणीं उपजे शुद्धता ।
तैशी येतसे वैराग्यता । ऐहिक विलासोपभोगांची ।।५५

चित्त करितां एकाग्र, तन्मय । अंतरीं आत्मिक बळ निश्चय ।
तेथ नुरतें काळ भय । हाच मृत्युवरी विजय असे ।।५६

**स्वदेशासाठीं-स्वधर्मासाठीं । सत्यासाठीं समाजोन्नतीसाठीं ।**
**स्वकुटुंबरक्षण-व्रतासाठीं । प्राण देई तो महात्मा ।।५७**

'भूमिह कर्मभूमि' वदतो । अनासक्त-कर्मयोग आचरितो ।
अहिंसा बंधुत्व जगतां देतो । तोच थोर महात्मा ।।५८

ऐसें वाढवावें आत्मज्ञान । असावें जीवनीं कर्मप्रधान ।
हेंच असे शिरोभूषण । परम पुरुषार्थ साधनाचें ।।५९

सुकर्तव्य करितां, आचरितां । जेधवा हो पंचमहाभूतीं एकता ।
जाणा तीच आध्यात्मिक पूर्णता । विलीनकाळीं देहाच्या ।।६०

देहींचें चैतन्य संपतां । मातीस माती मिळतां ।
वदती मरण ओढवितां । वैकुंठवासी झाला नर ।।६१

कोणी वदतो कैलासवासी । कांही म्हणती स्वर्गवासी ।
कोणी बोधिती परलोकवासी । कालवश होतां मानव ।।६२

परि वैकुठ-स्वर्ग-कैलास । जाणावा सर्व कल्पनाविलास ।
तेथ नसे सत्य विश्वास । परलोक सारा भ्रम असे ॥६३
तैसाच पाताळ यमलोक । जाणा खास भ्रमात्मक ।
सिद्धतो सर्व निःशंक । अंधश्रद्धांचा खेळ असा ॥६४
यमलोकीं यातना कठोर । स्वर्लोकीं विलास अपार ।
वैकुंठीं परब्रह्म ईश्वर । लाभतसे महंत वदतात ॥६५
**परि देहाची राख होतां । स्वर्लोक-प्राप्ति लाभतां ।**
**कोठें उरते उपभोगता । हेंच न कळे प्रबुद्ध अंतःकरणीं ॥६६**
**जीवनीं व्हावा सद्धर्म आचार । कदापि न व्हावा दुराचार ।**
यास्तव बोधिती संत थोर । जैसा आचार तैसें फळ ॥६७
पुण्यात्मा जातो स्वर्गलोकीं । पापात्मा जातो यमलोकीं ।
ऐसें निरूपिती भूलोकी । साधुजन शिष्यांना ॥६८
परि स्वर्लोक वा यमलोक । वर्ततो भूतळीं हा सद्विवेक ।
जाणोनि स्वर्ग करावा इहलोक । सदाचारसंपन्न होवोनी ॥६९
**सदाचरणीं लाभे ईश्वर । तयाचा घडे साक्षात्कार ।**
जो स्वयंसिद्ध हृदयीं चिरंतर । सुवृत्तांत मानव जन्मीं ॥७०
ऐशीं तत्त्वें पूर्ण उमगतां । बरेंवाईट हातीं घडतां ।
मानव न सोडी स्वार्थता । उपजतां सत्तरी वयोमानीं ॥७१
कारणें वानप्रस्थाश्रम संपतां । येतसे शरीरीं वृद्धता ।
**पाऊणशेंचें वयही होतां । लागतीं नेत्र पैलतीरीं ॥७२**
ऐशी दुर्बलता प्राप्त होतां । मनीं उपजते घोर चिंता ।
कुटुंबत्याग उपजे चित्ता । दारुण दुःख द्यावया ॥७३
कित्येकां ग्रासतो म्हातारचळ । बुद्धिभ्रम करी चंचल ।
कित्येक आणोनि उसनें बळ । छळिती आपुल्या कुटुंबियां ॥७४
ज्याच्या अंगीं नसे बळ । तो वडबडे सदा वायफळ ।
तयाची सदाच अडगळ । भासते कुटुंबीं सत्य हें ॥७५

कुटुंबी तयां कंटाळिती । तयाचें दर्शन टाळिती ।
नच अति ओशाळिती । काळ नेतां तयाला ।।७६

ऐशी वृद्धावस्था होतां प्राप्त । त्यजिती तया सर्व आप्त ।
कारणें धरावें संन्यासव्रत । निकट येतां अंतकाळ ।।७७

**प्राचीन काळीं संन्यासव्रत । थोर सज्जनांच्या आचरणांत ।**
**असे सर्वस्वी आत्मत्यागांत । ब्रह्मानंद मेळवाया ।।७८**

त्याग करोनि स्वसंसार । संपुष्टांत आणोनि वानप्रस्थाचार ।
जपती पवित्र ॐकाराक्षर । जेथ प्रयाण सिद्ध असे ।।७९

ऐशा महातपाच्या काळांत । न स्थिरती एका ग्रामांत ।
भ्रमती यात्रा स्थळांत । क्वचित् याचित 'भिक्षां देहि' ।।८०

भस्मांकित तन करोनि । दंड-कमंडलु घेवोनि ।
सर्व परित्याग आचरोनि । अंतकाळ साधिती समाधींत ।।८१

कोणी बुडती जलतत्त्वांत । कोणी जाती पंचतत्त्वांत ।
कुणाचा घडे देहान्त । श्रीरामनाम उच्चारितां ।।८२

जितुकें कथावें तितुकें थोडें । उगाच वळसा लांब पडे ।
कारणें जाऊं सुतत्त्वाकडे । आचरोनि संकलन ।।८३

आजकालच्या मन्वन्तरांत । कांहीं संन्यासी समाजांत ।
**ॐकार उच्चारित दांभिकतेंत । वर्तती भस्मांकित होवोनी ।** ८४

तीर्थक्षेत्रीं अथवा मंदिरीं । जमवोनि शिष्य नानापरी ।
मठस्थापना करोनी भारी । शठ उपजती स्वार्थार्थ ।।८५

तेथ नाना धंदे करिती । विलास, उपभोग आचरिती ।
असंख्य त्यांच्या दांभिक रीती । ऐसा संन्यास दुराचार ।।८६

पक्वान्नांचें लागे भोजन । यात्रेस लागे उच्च वाहन ।
रेशमीवस्त्र आवरण । ऐसा संन्यासी पापकर्मी ।।८७

डोळे मिटती नारी-दर्शनीं । विलासीं रंगती अंतःकरणीं ।
खुशाल पाय पसरुनी । 'सेवा करी गे' म्हणोनिया ।।८८

ऐशा संन्याशा 'बोका' वदती । मांजराची त्या मिळे दुर्गती ।
सारे त्या काठी हाणिती । निर्भर्त्सना करोनिया ॥८९

**संन्यासी असावा धर्मप्रचारक । अहिंसा, त्याग-प्रतिपालक ।**
**सच्चिदानंद ईश्वरोपासक** । अक्षय्यगति लाभाया ॥९०

आजकालच्या अनेक व्यक्ति । होतां वानप्रस्थाश्रम-समाप्ती ।
लाभण्या सुगति तैशी कीर्ति । आचरिती यज्ञकर्म श्रद्धेनें ॥९१

पौराणिक वैदिक आचाररीती । शास्त्री, पंडित अभ्यासिती ।
आणि यजमानां उपदेशिती । तैसा महायज्ञ करावया ॥९२

यज्ञ करितां स्वर्गप्राप्ती । लाभोनि मिळे अमर कीर्ति ।
तैशीच उपजे आत्मप्रचीति । पुरुषोत्तमपद-प्राप्तीची ॥९३

ऐसें नानापरी उद्बोधून । स्वयजमान-धन लुटोन ।
हिंसात्मक मार्ग दर्शवून । **यज्ञबळी** मारिती बुकलोनी ॥९४

यज्ञबळीचे होती हाल । दीनप्राणी बिचारा अबोल ।
कुणीही छेदा त्या खुशाल । बळीं जातो यज्ञासाठीं ॥९५

तयाचें रडणें ऐकोन । ज्याचें न द्रवे अंतःकरण ।
तयास कैचें लाभे पुण्य । यज्ञकर्म आचरितां ॥९६

आपणांस लाभण्या स्वर्गप्राप्ती । दुजा प्राणी जे कापिती ।
ऐशा क्रूरां कैची सद्गति । मिळे इहपरलोकांत ॥९७

**कारणें धर्मविधि आचरितां । राखावी पूर्ण अहिंसात्मकता ।**
जेणें लाभे परम शांतता । हेंच सात्त्विकतेचें बळ ॥९८

अनेक आचरिती सत्यनारायण । अनेक करिती होमहवन ।
अनेक धार्मिक अनुष्ठान । अन्नाहुति देती होमांत ॥९९

**ऐसा धर्म आचरितां । न जाणतां मितव्ययता ।**
**ज़ाळिती अन्नधान्य** तत्त्वता । हजारों राशी खरोखर ॥१००

**ऐसा करो नये अन्ननाश । स्वल्प ग्रास पुरे** अग्निनारायणास ।
अन्नदान करावें दुबळ्यांस । हेंच पुण्य अति थोर ॥१०१

धन राखावें कुटुंबपोषणास । उर्वरीत द्यावें अनाथ संस्थेस ।
आवरावें फलनिरपेक्ष-दानास । जेणें लाभे चिदानंद ॥१०२

न्याय-सचोटी-शेजारीपण । मैत्री सत्कार्य घेऊन ।
ज्यानें काढिलें आपुलें जीवन । तयाचें वृद्धत्व समाधानी ॥१०३

अंतकाळ येतां नजीक । पाचारावे समस्त नातेवाईक ।
आभार मानावे गोड वाणींत । सहकार्य ऋण वदोनिया ॥१०४

जातों आतां आमुच्या गांवा । आमुचा रामराम घ्यावा ।
ऐसा निरोप तयां द्यावा । अंतकाळीं शांततेनें ॥१०५

वृद्ध असतां रुग्णाईत । देहव्यथेनें अति कण्हत ।
तया करावें प्रेमें शांत । उपचार तया देवोनिया ॥१०६

वेधावें तयाचें त्रासित चित्त । रामभजन उच्चारित ।
वा भगवद्गीता-वाचनांत । जेथ परमशांति वसे ॥१०७

तयाच्या भोंवतीं जमून । करो नये व्याधि उच्चारण ।
तैसें दुःखाचें प्रदर्शन । नेत्रीं अश्रु गाळोनिया ॥१०८

ऐशीं कर्तव्यें आप्तेष्टांचीं । अनंत असतीं शांततेचीं ।
तैशींच समाधान द्यावयाचीं । मृत्युसमयीं वृद्धांच्या ॥१०९

कित्येक वृद्ध कंटाळती । तयां व्याधि अति त्रासिती ।
तदर्थ आत्मघातही करिती । अनेक घोर मार्गांनीं ॥११०

अति अयोग्य हें करणें । हिंसात्मक हें ऐसें मरणें ।
जें जें नशिबीं तेंच भोगणें । चित्त शांत राखावें ॥१११

जाता जातां मृत्युद्वारीं । मंत्र जपावा ॐ एकाक्षरी ।
वा उच्चारावा 'राम' द्विअक्षरीं । राम भेटण्या अंतकाळीं ॥११२

कोणी जपती विठ्ठल त्र्यक्षरीं । कोणी नारायण चार अक्षरीं ।
कोणी श्रीदत्तात्रय पंचाक्षरीं । ऐसे मंत्रही पुण्य देती ॥११३

ॐ नमःशिवाय षडाक्षरीं । श्री रामजयराम सप्ताक्षरीं ।
ऐसे मंत्र नानापरी । पुण्यवंत जपती शांत्यर्थ ॥११४

वानप्रस्थाश्रम सन्यासाश्रम । द्वयांचा पुण्यप्रद योगक्षेम ।
असे त्यागवृत्तिमय संयम । मोक्षसिद्धि लाभण्या स्त्री-पुरुषां ॥११५
कारणें आचरोनि सर्व त्याग । कोंडावा सर्व द्वारांचा भोग ।
मस्तकीं राखावा प्राणभाग । मुखीं ॐ उच्चारीत ॥११६
**ॐ राष्ट्रदेवो उच्चारावें । ॐ तत्सत् ब्रह्मार्पणमस्तु जपावें ।**
**मोक्षसिद्धीस अढळ मेळवावें । एकरूप होतां ब्रह्मस्वरूपीं ॥११७**
लाभतां नरदेह अनुपम । लाभे अमरधाम सर्वोत्तम ।
मिळे आचरितां विश्वकल्याणधर्म । तेजोमय पुरुषोत्तमपद ॥११८
ऐकतांच ऐसें अपूर्व ज्ञान । म्यां केलें मुख्याचार्यां वंदन ।
तयां घालोनि लोटांगण । सत्य आनंद होवोनिया ॥११९
वदलों तयां अति धन्य । जाहलों पाहिलें नंदनवन ।
सत्य शोभती राष्ट्रभूषण । आपुले सेवाश्रम भारतीं ॥१२०
येथ चाले संस्कृति-संरक्षण । आचार्य बोधिती संत-विवेचन ।
तैसें राष्ट्रपुरुष-कर्तव्य-कथन । भारत अमर व्हावया ॥१२१
जगतीं माजे कोलाहल । परि मानसीं उपजलें तेजोबल ।
जेणें लाभे परमपद निश्चळ । अखंड शांति लाभोनिया ॥१२२
वदले मुख्याचार्य उत्तरांत । जा बा परतुनी समाजांत ।
लिहूनिया प्रवचनें ग्रंथांत । उजळी 'भारत-दीप' स्व-अक्षरें ॥१२३
ऐकतांच ऐसे आचार्य शब्द । तत्क्षणीं जाहलों अतिस्तब्ध ।
तैसाच बनलों मंत्रमुग्ध । दिव्यता पाहोनि आश्रमांची ॥१२४
तेज पसरलें आसमंतांत । गर्जला ध्वनि 'जयभारत' ।
औदुंबरछायेंत दत्त अवधूत । देखिलें म्यां इहजन्मीं ॥१२५
संपला स्वप्नींचा साक्षात्कार । परि स्वप्न जाहलें साकार ।
ग्रंथ लिहिला निर्विकार । राष्ट्रोन्नति लाभण्या ॥१२६
रुग्णाइत शरीर झालें । सार्थक जन्मीं कांहीं न केलें ।
यास्तव नेत्रीं अश्रु ओघळले । मूढ झालों म्हणोनिया ॥१२७

मराठी ग्रंथ सं । । ग्रा । [illegible]
अनुक्रम ... दिः ...
क्रमांक ... नोंः दिः ...


मनीं राष्ट्रहित चिंतिलें । तें तें स्वप्नीं म्यां देखिलें ।
सर्व दृष्टान्तमय भासलें । ईश्वरी कृपा होवोनिया ॥१२८

ऐशा कृपेचें फळ लाभलें । अंगीं चैतन्यबळ उपजलें ।
तेणें ग्रंथलेखन पूर्ण झालें । स्वप्ना साकारतां येवोनी ॥१२९

तोच हा ' भारत-दीप ' ग्रंथ । ठेवोनिया बुद्धि संथ ।
वाचोनि धरावा सुपंथ । राष्ट्रसेवाकर्तव्याचा ॥१३०

मी नसे ख्यात लेखक । ग्रंथ नसे सुरस काव्यात्मक ।
जाणा मज अज्ञान सेवक । भारताचा निष्ठावंत ॥१३१

महाविद्यालयीं झालें विद्यार्जन । लाभले सुविद्य गुरुजन ।
तयांनीं केलें विद्यादान । अज्ञानत्व नष्टाया ॥१३२

लेलेशास्त्री, महोपाध्याय पोतदार । देवधर, सत्तिगिरी, नारळकर ।
तैसेच हरिभक्त दांडेकर । ऐसे गुरुवर्य लाभले ॥१३३

तयांच्या प्रसादें हृदयांतून । लिहिलें जें तें राष्ट्रार्पण ।
नाहीं वांच्छिलें कीर्तिधन । कारणें प्रसन्नला विनायक ॥१३४

ग्रंथारंभीं स्तविला गजानन । अध्ययारंभीं केलें पूजन ।
ग्रंथलेखन संपतां भक्तिध्यान । आचरितों तल्लीन श्रद्धेनें ॥१३५

ग्रंथाचें व्हावें प्रकाशन । सकळजनांनीं करावें वाचन ।
' भारत-दीप ' आदरून । हीच प्रार्थना मोरया ॥१३६

**सर्वेऽत्र सुखिनः सन्तु । सर्वे सन्तु निरामयाः ।**
**सर्वे भद्राणि पश्यन्तु । मा कश्चिद् दुःखमाप्नुयात् ॥१३७**

**ब्रह्मार्पणं ब्रह्महविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणाहुतम् ।**
**ब्रह्मैवतेनगन्तव्यं । ब्रह्मकर्मसमाधिना ॥१३८**

**इति श्रीभारतदीप ग्रंथाचा । श्रीगणेशकृपें ग्रंथपूर्तीचा ।**
**संन्यासाश्रम कर्तव्य बोधाचा । अकरावा अध्याय संपूर्ण ॥१३९**

**॥ श्रीरघुवीर समर्थ ॥**

★ ★

## आतां वाचकां सांगणें एक--

'भारत-दीप' ग्रंथलेखनास श्रीरामनवमीचे (शके १८८१) दुसरे दिवशीं सुरुवात करून सदर ग्रंथाचें हस्तलिखित अनंत चतुर्दशीस मीं पूर्ण केलें व अनेक विद्वानांना दाखविलें. सर्वांनीं ग्रंथाची प्रशंसा केली व विशेषतः गुरुवर्य महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार, ज्ञानेश्वरीभक्त प्रा. सोनोपंत दांडेकर, 'केसरी'चे संपादक श्री. ज. श्री. टिळक, पुणें विद्यापीठाचे संस्कृत वाङ्मयचिकित्सक डॉ. म. त्र्यं. सहस्रबुद्धे, विख्यात जर्मन भाषातज्ज्ञ प्रा. डॉ. न. का. घारपुरे, अनाथ विद्यार्थीगृहाच्या महाराष्ट्र विद्यालयाचे मुख्याध्यापक व प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ डॉ. ग. श्री. खैर, भारत सरकारचीं उच्च अधिकारपदें भूषविलेले श्री. भा. कृ. गोखले, आय्. सी. एस्. (सेवानिवृत्त), यांनीं ग्रंथावर अत्यंत अनुकूल असे विस्तृत अभिप्राय लिहून दिले. 'प्रसाद'चे संपादक सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. य. गो. जोशी यांनीं ग्रंथाबद्दल समाधान व्यक्त केलें. पुणें येथील लोकमान्य प्रवचनकार वेदज्ञ श्री. पंढरपुरेशास्त्री यांनीं ग्रंथावर संस्कृतांत शुभाशिर्वाद लिहून देऊन 'भारत-दीप' ग्रंथांतील प्रासादिक ओव्या आपल्या प्रवचनांसाठीं उपयोग करण्याचें ठरविलें असल्याचें सांगितलें.

माझ्या गेल्या वीस वर्षांच्या रुग्णावस्थेंत मला वारंवार उत्तेजन देऊन माझ्या अंगीं आत्मविश्वास, दीर्घोद्योग व सेवाधर्म यांची आवड उत्पन्न करणारे माझे बालवीर शिक्षक गुरुवर्य डॉ. आबासाहेब नातू यांनीं ग्रंथाला अनुरूप अशी प्रस्तावना लिहून दिली. सध्यांच्या महागाईच्या परिस्थितींतही माझे एक परमस्नेही म्हणजेच येथील नवहिंद मुद्रणालयाचे चालक श्री. अण्णासाहेब महाजन यांनीं

ग्रंथमुद्रण करून तेजल प्रकाशन संस्थेतर्फे प्रकाशन करण्याची जबाबदारी स्वीकारली. माझे धाकटे बंधु श्री. ग. म. गोखले, बी. ए., एलएल्. बी. यानीं ग्रंथ-प्रकाशनास अमोल मदत केली. शिवाय माझे अनेक विद्यार्थी व स्नेही यानीं प्रकाशनासाठीं मेहनत घेतली. वर निर्देश केलेल्या सर्व विद्वानांचे व थोर जनांचे मजवर कधींहि न फिटणारें ऋण व उपकार आहेत हें नमूद करून त्यांचे आभार मानतांना माझे मन अगदीं भारावून गेलें आहे.

'भारत-दीप' ग्रंथ लिहिण्याच्या संकल्पाचा दाता भगवानच होय. त्यानेंच माझा मनोरथ पूर्ण करून मला पूर्ण समाधानाचें वरदान दिलें आहे. माननीय वाचकांना इतकेंच सांगणें आहे. कीं सध्यांच्या अशान्त परिस्थितींत—

जयाचें निर्मळ अंतःकरण । तैसेंच पवित्र आचरण ।
तया सांभाळी नारायण । सर्वकाळीं निश्चित ॥

या तत्त्वावर विश्वास ठेवावा. आणि—

ग्रंथ हा मराठी पाहून । न सोडावा उपेक्षून ।
परि आत्मभावें परीक्षून । उजळावें स्वजीवन ॥

आणि सर्वांत महत्त्वाचें म्हणजे—

स्वजनांची सेवा । असो द्यावा धर्म ।
करावें सत्कर्म । हेंचि रोज ॥
प्रार्थावें भारता । अमर स्वातंत्र्य
आणिक ऐश्वर्य । ईशापाशीं ॥

जय भारत

११९५३
REFBK-0011953
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३१०८१८ वि: ८२७८४

# शुद्धिपत्रक

ग्रंथछपाईमध्यें कांहीं ठिकाणीं नजरचुकीमुळें दोष राहून गेले आहेत. त्यांतील महत्त्वाचे येथें दुरुस्त केले आहेत. बाकीचे सहज लक्षांत येण्यासारखे आहेत.

| पृष्ठांक | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २९ | | बसेतसे | बसतसे |
| ३५ | १३,१५,१९ | अेशा | अैशा |
| ३८ | १५ | निर्थंत्रित | नियंत्रित |
| ४० | २४ | डांबाबे | डांबावे |
| ४३ | २० | वाचवाचा | वाचनाचा |
| ५७ | ५ | विजयादमीचे | विजयादशमीचें |
| ५८ | २० | रघु ाज | रघुराज |
| ८५ | ४,६,९ | दुरितांशी | दलितांशीं-ना-नीं |
| ९१ | १ | राष्ट्रीय सुवर्ण | राष्ट्रीय सुवर्णदिन |
| ११८ | २२ | मळ आधार | मूळ आधार |
| १२६ | ११ | हिंदस्वराज्यार्य | हिंदस्वराज्यार्थ |
| १२६ | १२ | स्तव्र | स्तवूं |
| १२७ | ४ | स्तबन | स्तवन |
| १६१ | ३७ | वध संशोधन | वधू संशोधन |
| १६२ | ७ | नसोवें | नसावें |
| १६६ | १ | भरतदीप | भारतदीप |